# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY

OU_192730

UNIVERSAL LIBRARY

सुरस ग्रंथमाला : पुष्प ८९

# ओझरती नजर

लेखक

श्री. के. मा. नाईक

प्रथमावृत्ति

जून १९५०

किंमत ४ रुपये

प्रकाशक व मालक
राजेंद्र रावजी शहा
महाद्वार, पंढरपूर

* * *

संचालक
नवजीवन गौतमचंद व्होरा
केमिस्ट, सोलापूर

* * *

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुखपृष्ठ : चित्रकार श्री. मुळगांवकर

मुद्रक
द. रा. कानेगांवकर एम्. ए.
प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस,
२५२ नारायण पेठ, पुणे २.

४ एप्रिल १९४९

कलकत्ता, सोमवार.

" प्रिय बाळ,

ज्या ठिकाणीं आपल्या जीवनाची बरीचशीं वर्षे घालविलीं तें ठिकाण अेकाअेकीं सोडून देणें किती कठीण जातं नाहीं ? मग तें ठिकाण सहारासारखं रुक्ष कां असेना ! पण त्या ठिकाणींच आपण बाळपणच्या झऱ्याचं मधुर जळ प्यालेलों असतों ना ? तारुण्याच्या उन्मादांतील कांहीं दिवस व रात्रीं पाहिल्या असतात ना ! असं ठिकाण सोडायला जिवाला किती चुटपुट लागते म्हणून सांगू ? कारण,—कारण आपल्या बाळपणींच्या रम्य नि सुखद आणि तारुण्यांतील गोड नि मुग्ध अशा अनेक आठवणीमुळें त्या सहारा वाळ-वंटाला स्वर्गीय स्वरूप आलेलं असतं.

अन् बाळ ! ज्या ठिकाणीं आपलं कुणीही नाहीं तें ठिकाण आपलेसं करावयाचं देखील किती कठीण असतं ! अनोळखी खेळण्यामुळें लहान मुलांची मनोवृत्ती कशी भांबावून जाते तसंच कांहींसं झालं बघ माझं.

दोन्ही गोष्टी कठीण तर खऱ्याच! पण अनुभवामुळं तर त्या अधिकच कठीण होतात. गेल्या दोन दिवसांत ह्याचा पुरेपुर अनुभव मिळाला मला. तुम्हांला सोडलं मी. सारे बालमित्र दूर टाकले नि दूर दूर असलेल्या ह्या गावांत मी एकदा येऊन पडलों. तुटलेल्या तारकासारखं सबंध प्रवासांत मन सारखं हुरहुरलं. क्षणाक्षणाला वाटे कीं नको हा त्रास, पुन्हा यावं तुझ्याजवळ. मारावी तुझ्या गळ्याला मिठी नि सांगावं तुला. नाहीं बाळ! माझ्यानं नाहीं रे जाववत दूर!!

पण...

बोललेला शब्द नि सोडलेला बाण का कुठें परत येतात? इतका मी बुद्धिवादी! एवढा मी तत्त्ववादी!! खरंच केवढा अभिमान होता मला! वाटायचं कीं भावनेच्या आहारीं मी कध्धीं कध्धीं जाणार नाहीं. गाडींत माझ्या मनाला मी किती समजावलं. पण...कसं रे, बाळ, माझ्या मनानं माझं कांहींच ऐकलं नाहीं?

अन्.........अन्......कलकत्त्याला पहिल्याच दिवशीं माझ्या मनांतील दडलेल्या भावनांनीं एकाएकीं कळस गांठला. ध्यांनीं-मनीं-स्वप्नीं देखिल नव्हतं ते पहायला मिळालं मला. काय नि कसं सांगावं तुला हेंच कळत नाहीं मला. माझी बुद्धि कुठं गहाण पडलीय कुणास ठाऊक! किती विचित्र प्रसंग तो!

श्यामाला पाहिलं मी...नि माझं "मीत्व" पार विसरलों. खोटं! अगदीं खोटं वाटेल तुला तुझे ते शब्द.

'शरद! बुद्धीमुळं तुझा अगदीं पत्थर झालाय् पत्थर!'

अजूनही कानांत घुमताहेत माझ्या!

बाळ ! जे शक्य नव्हतं ते झालं खरं ! खरंच कारे, पत्थरालाही पाझर फोडणारं असं कांहीं तरी स्त्रियांच्या डोळ्यांत असतं ? जाऊं दे ते. श्यामाच्या नयनांत तरी मला ते दिसलं. ते मी पाहिलं. दिपवून टाकलं मला तिनं, अन्... अन्......पहिल्याच दिवशीं मी तिचा झालों. कसं ते सांगवत नाहीं. शब्द आठवत नाहींत. उत्सुकता असेल तर निघून ये. नि माझ्या शामालाच विचार तें.

शेवटचं एकच सांगतों.

शामा माझी झाली. परकं कलकत्ता माझं झालं. नि माझं जें होतं नव्हतं तें परकं झालं ! काय म्हणशील तूं बाळ ह्यास ?

तुझाच
शरद"

कसंतरी शरदनं पत्र पुरें केलं. आज सबंध दिवसभर पत्रांतील मजकूर त्यानं घुळवला. नव्हे पाठ केला. पण... पण... पत्र लिहावयास बसला तो अन् सारं विसरून गेला. शेवटीं पत्र लिहिलं त्यानं ते असं विचित्र...अपुरं नि तें टाकलं.

प्रीतीमुळं माणसाचं मोकळं मन चोरं बनतं हेंच खरं. वास्तविक ह्या दोन दिवसांत बाळला सांगण्यासारख्या कितीतरी घटना झाल्या होत्या. ते सारं सांगावं असंही त्याला वाटलं, पण...

माणसाची अिच्छा असूनही भागत नाहीं नुसतं. त्याशिवाय आणखीन् कांहींतरी लागतं. नाहींतर दोन पायांवर चालणारी अिच्छा लंगडी होते.

बाळला आपण फसवत तर नाहीं ? अशीही शंका आली त्याला. टाकूं का हें पत्र फाडून. नि दुसरं साद्यंत हकीकतीचं पाठवूं

का पत्र ? तो प्रसंग...

......मनाच्या विचित्र हुरहुरींतच तो स्टेशनावर उतरला. अनोळखी कलकत्त्याचं तोंड त्यानं पाहिलं. त्या विचित्र अनोळखी शहरांत आतां दोनचार वर्षं घालवावयाचीं या कल्पनेनं त्याचं अंग शहारलं. आज त्याचं मन त्याच्याच ताब्यांत नव्हतं. भावनेच्या आगींत बुद्धीची राखरांगोळी झाली होती. किती नवीन होता शरदला अनुभव ! अशी भावना, ती हुरहुर, त्याच्या मनाला कधींच शिवली नव्हती ? अन् शिरावी कशी ? तो बुद्धीवादी ना ! बुद्धीच्या साम्राज्यांत भावनेवर बलात्कार होतोच होतो ! शरदला का कळत नव्हतं हे ? पण...आज त्याचं मन त्याच्या ताब्यांत नव्हतं. मनाची ही पहिलीच बंडखोरी होती ! पहिलं युद्ध नि पहिलं प्रेम यशस्वी करणं का सोपी गोष्ट आहे ?

पण—तेहि शरदच्या नशीबांत आज लिहिलं होतं !

अगोदर ठरवून ठेवलेल्या खोलींत त्यानं प्रथम पाऊल टाकलं ते भुकेच्या आगींतच. विचाराच्या सागरांत गटांगळ्या खाऊन त्याचं मन तर थकलं होतच. पण आतां शरीरही थकलं.

नेहमीच्या संवयीप्रमाणं त्यानं खिशांतील सिगार—केस काढली नि सिगार शिलगावली. दोन झुरके घेउन त्यानं आपलं थकलं भागलेलं शरीर खुर्चींत भिरकावलं....नि हुश्श ! असा उसासा सोडला तोंच...बोर्डिंग हाऊसचा बॉय...जेवणाची वर्दी देण्यास आला. विश्वास नसलेल्या देवाचं त्यानं आभार मानले. सिगार संपली. नि मग तो उठला...त्याला आठवलं...हो ! आज आपण मांसाहारी बनणार नाहीं कां ? या आठवणीनींहि त्याच्या अंगावर रोमांच उभे केले, मांसाहारी म्हणजे काय ह्याची त्याला काडीचीही कल्पना नव्हती. शद्बच काय तो त्याच्या माहितीचा पण...

आतां विचार करून काय उपयोग. बोललेला शब्द नि सोडलेला बाण परत थोडाच घेतां येतो ? सोडतांनाच पुरा विचार करावा लागतो. अन् नेमकी हीच गोष्ट शरदला ठाऊक नव्हती. विचार म्हणून तो कधींच करीत नसे. मनाला वाटलं कीं ते करावयाचं. मग मागंपुढं पहावयाचं नाहीं, कीं कशाची पर्वा करावयाची नाहीं. हें त्याच्या स्वभावांतील विशेष होतं. प्रथम होईल थोडी फजीती ! असं स्वतःशींच पुटपुटून तो उठला. नि जिना चढूं लागला.

जेवण्याच्या खोलीजवळ तो आला. दारांत त्यानं पाऊल टाकलं तोंच......

काय आश्चर्य ! त्याचं पाऊल तिथंच खिळलं गेलं ! उच्लेनातच ते त्याला. पायांतील सारी शक्तिच जणुं हरपली होती. पायाप्रमाणेंच त्याचे डोळेही एका नवीन नि हंसऱ्या नयनावर खिळले होते. डोळे मिस्किलपणानें हंसत होते. नि शरदचे डोळे त्या डोळ्यांत जणुं कांहींतरी हरवलेली वस्तू शोधीत होते.

बेलगाम झालेल्या त्याच्या मनाचा हा दुसरा धक्का !

क्षण, दोन क्षणच ती नजरानजर. चट्कन् तो सावध झाला केसांवरून हात फिरवला, पुन्हा सिगार शिलगावली, नि तो खुर्चीवर येवून बसला· नोकरानं ठेवलेलं पाणी घटाघट तो प्याला. जणुं त्याच्या घश्याला न ओलावणारीच कोरड पडली होती !

समोर आणलेल्या जिनसांवर त्यानं नजर फिरवली. जन्मात त्यानं तसले पदार्थ पाहिले नव्हते. अन् आतां तर ते खावयाचे होते, पद्धत त्याला माहीत नव्हती. कसं सारं खावयाचं तेंही नव्हतं उमजत. केवढी फजिती ही ! कुठून मांसाहार मागितला असं त्याला होऊन गेलं. क्षणभर त्याचं मस्तक फिरूं लागलं. फजिती

होणार ती केवढी ! नि एका मुलीच्या समोर. अनोळखी मुलीच्या समोर! कुणाला कांहीं विचारावं म्हटलं तर तीहि सोय नाहीं. कारण ती दोघंजण तिथं. काय करावं हें समजेना.

अन् पोटांत तर आग भडकलेली !

पुन्हा एकदां पाण्याचा ग्लास त्याने तोंडाला लावला. अन् पाणी पितां पितां त्यानं कसला तरी निश्चय केला मनाशींच... पण ......हाही पुन्हा तिसरा अनुभव आला त्याला. जो निश्चय केला तो पार त्याला पाडतांच येईना. तोंडून एक अक्षर फुटेल तर शपथ. ओठ थरथरत, जीभ वळवळे. पण शब्दाचें नांव नाहीं. उलट कपाळावर घर्मबिंदू चमकूं लागले. छाती दम लागलेल्या माणसासारखी वरखालीं होवूं लागली. हे होतंय तरी काय आपल्याला ? हा प्रश्न त्यानं हजारदा विचारून पाहिला. पण उत्तराचें नांव नाही.

त्याच्या मुखावरील हे सारे भाव श्यामाच्या मिस्किल डोळ्यांनीं पाहिले. तिचें नयन होते खरे. तिला आपली आवडती वस्तू मिळाल्याचा आनंद झाला होता खरा. पण...

शेवटीं मनाचा हिय्या करून तिनंच विचारलं.

'आपण नवीनच आहांत वाटतं?'

शरदन एकवार पुन्हा तिच्याकडं पाहिलं नि नुसता हुंकार दिला.

"कुठून आलांत?"

"कां?"

त्याच्या "कां" नं श्यामा चमकली. पण ते त्याच्या लक्षांत नाहीं आलं. त्यानं पुन्हा एक सिगार शिलगावली. नि त्याचे झुरके घेत तो स्वस्थ बसला. श्यामानं जेवावयास सुरवात केली. निम्मं

जेवण तिचं संपलं देखील तरीही हा आपला स्तब्धच. हालचाल होई ती दुसरी सिगारेट पेटवण्यासाठींच.

' पुन्हां तिनं त्याला विचारलं.'

' जेवा ना. '

' कसं जेवूं ? '

' म्हणजे ? '

' मला तर ह्यांतील कांहींच माहिती नाहीं. '

त्यांच्या ह्या बोलण्यावर ती दिलखुलास हांसली. त्या हास्यानं शरद दचकला. " आपण कांहींतरी भ्रमिष्टासारखं तर नाहीं ना बोललों ? " असा संशय आला त्याला. अन् तो तिच्याकडं नि अन्नाकडं आळीपाळीनं पाहूं लागला.

तिनं आपलं हास्य थांबवलं. नि ती म्हणाली.

' मला तरी विचारावयाचं कीं नाहीं ?'

तिनं त्याला सारी माहिती करुन दिली. नी शेवटीं ती म्हणाली.

' आतां तरी जमेल ना ? '

' हो जमेल कीं. घास देवून सांगण्याची जरुरी नाहीं आतां?'

' आं ! '

आश्चर्य

आश्चर्यातिशयानं तिचं ओठ अलग झाले ! ह्या माणसाचं डोकं नाहीं ना ? असा प्रश्न तिनं मनाशीच विचारला. थोड्यावेळानं तिनं विचारलं.

' आज अेक विचित्र माणूस पाहातेय मी.

' म्हणजे ? '

" नाहींतर काय ? दोन मिनिटांच्या बोलाचालीवर ज्याची मजल घांस देण्याघेण्यापर्यन्त जाते....

'आ! सॉरी हं! चुकून झालं तसं. रागावला काय आपण!'

पुन्हां एकदां तिनं त्याच्याकडं निरखून पाहिलं. शरदच्या मुखावरील भाव अितका निष्पाप नि लहान मुलासारखा होता कीं ती मनांत म्हणाली.

'ह्या माणसावर कोणी का रागावेल?'
ती हंसली. नि विषयाला कलटाणी देवून म्हणाली.

'केव्हां आला?'

'हूं!'

'कुठून?'

'पुण्याहून."

'कशासाठीं?'

'सजरीसाठीं?'

'ह्यांत आश्चर्य कसलं वाटलं तुम्हांला?'

'सर्जरीपेक्षां प्रोफेसर झाला असतात तुम्ही तर...'

'तुम्हीही बरेच विचित्र दिसतां कीं.

'अं?'

'नाहींतर काय? इतक्यांत सल्ला मसलतही द्यावयास लागली की काय मला?

'मघाचं उट्टं काढलंत वाटतं?'

'छे:!'

'छान्! माझा अन्दाज चुकलाच वाटतं...'

'तो कसा?'

'मला वाटलं प्रोफेसर असाल तुम्ही, सांगताय् सर्जन म्हणून नि आहांत वकील.'

एवढं बोलून ती हंसूं लागली. तिचं ते मोहक हसणं भारी आवडलं त्याला. तिच्या त्या बोलण्याचा नि तश्या प्रकारें हंसण्याची गंमत वाटली त्याला. तिचा तो धीटपणा नि तिच्या स्वभावांतील अनुभवलेली ती सरलता तिच्या सौन्दर्यापेक्षांही सरस वाटली त्याला श्यामा सुन्दर तर होतीच होती. लाखांतील तिचं सौन्दर्य होतं, नि हा सरळ स्वभाव...

त्याच्या मनांतील मंदिरांत तिची मूर्ति ठसून राहिली.

संध्याकाळीं तर ह्याही पेक्षां विचित्र प्रसंग घडला होता.

शरद नुकताच झोंपून उठला होता. बिछान्यावर बसून आपल्या आवडत्या सिगारचे झुरके घेत होता. मनांत अजूनही त्याच्या विचार चाललेच होते, त्याचं मन सकाळच्या गोड अनुभवाचे पडसाद ऐकत होते. तिच्या हंसणाऱ्या लहरी अजूनही त्याच्या कर्णपटावर आदळत होत्या. त्या हंसऱ्या मधूर तारका त्याच्या डोळ्यांपुढून हलत नव्हत्या. मनांतून तो मांसाहारी भोजनाला धन्यवाद देत होता....

कोण असेल ती ? नांव काय असेल तिचं ? नांव देखील नाहीं विचारलं आपण ? काय करत असेल ती ? दिसायला तर आहे महाराष्ट्रीयनच, पण ते तिचं सौन्दर्य नि तो तिचा स्वभाव कुठला असेल ? ...

वगैरे नाना प्रकारच्या विचारानं त्याला भंडावून सोडलं होतं. शान्तपणें बिछान्यावर पडूनच सुखद अनुभवाचा आस्वाद चाखत होता तो. तोंच टक्-टक्-टक्...

त्याच्या दारावर वाजलेल्या टिचक्या त्याला ऐकूं आल्या.

'कम् इन्' एवढंच तो बोलला.

हळुच दार उघडलं कुणीतरी. नि हलक्या पावलानं कुणीतरी

प्रवेश केला खोलींत. तरीही शरदचं लक्ष नव्हतं. त्या चेडोळे झ कलेले होते...

'अय्या ! झोंपेंतच 'कम् इन्' म्हणालांत कीं काय ?'

ह्या शब्दांसरशीं तो धडपडून उठला. त्यानं पाहिलं.

ज्या दोन डोळ्यांनीं वेड लावलं होतं त्याला, तेच दोन डोळे त्याच्याकडं बघून हंसत होते. केवढं आश्चर्य होतं हे ! ती अशा रीतीनं खोलींत येईल हें त्याच्या ध्यानीं–मनीं देखील नव्हतं.

ती आश्चर्याची झाक श्यामानं पाहिली ...

'कसल्या स्वप्नांत होती स्वारी ' तिनं विचारलं.

'वाजले किती ?' त्यानं विषय बदलला.

तिनं आपलं मनगट त्याच्या डोळ्यासमोर धरलं. चटकन् ते हातांत धरावयाची अिच्छा झाली त्याला. पण...

'साडे सहा !' असं ओरडून तो उठलाच 'किती वेळ झोंपलों मीं हा !'

'अजूनही झोपलं तर नाहीं कां चालणार ?'

'अऽ हं !'

'कां ?'

'तुम्ही केली ना झोपमोड '

'असं काय ? आले तशी जातांही येतं मला. '

'पण मी सोडायला हवं कीं. '

'मी का कुणाची बान्धलेली आहे थोडीच ?'

'मग आलांत कशाला अिथं ? '

'वाटलं म्हणून. '

'तुम्ही अिथंच बसावं असं मलाहीं वाटलं तर... ? '

'अन् मला नाहीं वाटलं तर –?'

'असं बसवीन अिथं.'

'असं–म्हणून त्यानं तिच्या खांद्याला धरून बिछान्यावर बसवलं अन् तो म्हणाला.

'सारी हं! खुर्ची नाहीं अिथं.'

तिला बसवून तो उठला. नि तिला न विचारतांच निघूनही गेला खालीं. खोलीपाशीं येतांच त्याला स्टोव्हची घरघर ऐकूं आली.

दार उघडून तो आंत आला. त्यानं पाहिलं.

तो श्यामानं स्टोव्ह पेटवून आधणही ठेवलं होतं.

'फार भूक लागलीय वाटतं?'

'अंऽ हं.'

'मग?'

'तहान'

'स्टोव्ह पेटवून तहान कशी भागणार?'

'न भागायला काय झालं?'

'माझी तर नाहीं भागणार.'

'पण माझी भागेल की'

'झकास पाहुणा पोटाशीं नि मालक उपाशीं.

'असं होतं कधीं कधीं. नाहीं?'

तिनं त्याच्याकडे मान वळवून पाहिलं. तिच्या त्या वाक्याचा अर्थ त्याला कांहीं कळेना. असं होतं कधीं कधीं. किती विचित्र शब्द हे! कसा नि कुठें अर्थ लागणार याचा?

न बोलावतांच त्यानं सिगार पेटविली नि स्वस्थपणें तिच्या हालचालीकडं पाहात तो बसला.

राहून राहून त्याला आश्चर्य वाटत होतं ते तिच्या ह्या विचित्र धिटाअीचं. किती विचित्र मुलगी ही! तसं म्हणावं तर

ओळख देखील फारशी नाहीं, अन् असं असूनही ही माझ्या खोली-
वर येते काय स्टोव्ह पेटवून चहा करते काय...नि मला देते काय
सारंच आश्चर्य !

चहा घेतां घेतां तिनं विचारलं

'आतां पुढचा बेत ?'

'तुम्ही सांगाल तो

'मग घाला तर कपडे'

'कशासाठीं ?'

'फिरून येऊं या थोडं. चालेल ?'

मुकाट्यानें त्यानें कपडे घातले नि तिच्याबरोबर तो निघाला

सात वाजून गेले होते. सूर्य तेव्हांच अस्तंगत झाला होता.
संधिप्रकाशही काळा पडत चालला होता.

'ह्या अनोळखी शहरांतून कुठं कुठं फिरवणार मला आतां ?'
त्यानं विचारलं.

'कुठ्ठं नाहीं. अिथंच बसूं या कुठंतरी.'

चांगलीशी जागा त्यांनीं पाहिली. नि तिथंच ते बसले.

पुष्कळ वेळ कुणीच कांहीं बोललं नाहीं. शरदच्या मात्र पांच
सिगारेटस् संपल्या. आकाशांतील तारका अन्धाराच्या पड्यांतून
डोकावूं लागल्या. हॉस्टेल समोरील पटांगणांत खेळत असलेलीं
मुलेंही आंत निघून गेली. आतां सारीकडं स्तब्धता होती. शरदनं
सहावी सिगार शिलगावली नि तो झुरका घेणार तोंच...

श्यामानं ती काढून घेतली नि दूर भिरकावली.

मुकाट्यानं शरदनं दुसरी काढली नि एक तिच्यापुढं करून
तो म्हणाला –

तिनं पाकीटच्या पाकीट हातांत घेतलं नि त्याचा चोळा-

मोळा करून तेंहि दूर भिरकावलं.

'सिगार शिवाय चैन नसेल पडत नाहीं ?' तिनं कुत्सितपणे विचारलं.

'कसं पडेल ?'

'माझं ऐकाल काय एक ?'

'काय ?'

'मी असतांना सिगार पेटवावयाची नाहीं, समजलं.'

'मग काय करावयाचं ?'

'सांगूंच काय ?'

'हूं !'

चटकन् ती त्यांच्यांजवळ गेली नि तिनं त्याच्या ओठांवर आपले ओंठ टेकले...

तो सुखद स्पर्श ह्यावेळीं देखिल त्याला मधूर वाटला. तिचे ओंठ त्याच्या ओंठाशीं कसलं तरी गुंजारव करीत होते. तिच्या छातीची धडधड त्याला स्पष्ट ऐकूं येत होती. त्याच अंग शहारून आलं होतं. नि तिच्या दोन नेत्र कमळांखेरीज त्याला कांहींच दिसत नव्हतं.

'हे करावयाचं, समजलं ?' तिनं आपले ओठ बाजूस केले. नि पुन्हा ती म्हणाली...

'काय असेल ते असो. तुम्हांला काय वाटेल ते वाटो. वा कुणी काय चाहेल ते म्हणो. मी माझ्या अन्तरीच्या हांकेला ओ दिली आहे. नि त्याचा पडसाद तुमच्या मुखांतून ऐकावयाचा आहे मला.'

'मोठी विचित्र आहेस तूं.'

'असूं दे. पण सांग ना मला.'

‘ काय ते ? ’

‘ माझ्या प्रश्नाचं उत्तर. ’

शरदनं तिच्या कंबरेंत हात घालून तिला जवळ ओढलं, तिचं मस्तक छातीशीं कवटाळलं. नि तिच्या मउ मृदू केसांवरून हात फिरवीत तो म्हणाला...

‘ खरंच ते ! इच्छा असून भागत नाहीं. नुसतं. तुझ्यासारखं धाडसही असावं लागतं अंगीं. पण माझ्यामध्यें नव्हतं- ते. ’

‘ पण आतां तरी आलं ना ? ’

‘ हो... ’

‘ मग मला घेऊन बसाल जन्मभर. ’

‘ ह्याच काय पण पुढील सात जन्मभर देखिल. ’

‘ अगदीं खरं ना हे ?’

‘ हो ! अगदीं खरं. ’

‘ आज मी किती सुखी आहे ? केवढी आनन्दी आहे म्हणून सांगू तुला ! खरंच, आपली ओळख किती विचित्र प्रकारें झाली ! नि आपण एकमकांचे झालों ही किती थोड्या वेळांत ! एकमेकांना एकमेकांचीं नांवं देखील माहिती नाहींत अजून, नांव सांग ना तुझं ?

‘ तुझं सांग कीं अगोदर. ’

‘ श्यामला. ’

‘ ओहो ? श्यामा ? अगदीं रूपासारखंच नांवही गोड आहे हं ! ’

‘ असू दे. तुझं सांग कीं आतां. ’

‘ शरद ’

‘ शरद !’ तिनं हाक मारली. तिची हनुवटी उचलून त्यानंही

हांक मारली.

'श्यामा...!'

इतक्यांत.

घण् घण् घण् ण् ण् ण् ण्

जेवणाची वेळ झाली.

'अगबाई! साडे आठ वाजले कीं.'

असं म्हणून ती उठली, शरदलाही तिनं उठवलं. नि दोघंही हातांत हात घालून जेवण्यास निघून गेली.

त्या दिवशीं रात्रीं त्याला स्वप्नं पडलीं तीसुद्धां सारी श्यामाचीच. झोपेंतही त्याला हे दोन प्रसंग कितीवेळां तरी आठवले! अन् प्रत्येक आठवणीसरशीं त्याला निराळ्याच प्रकारचा आनन्द लाभे. पहांटे पहांटे तर त्याला एक विचित्रच स्वप्न पडलं.

श्यामा जवळ बसली आहे नि ती आपणांस विचारीत आहे.

'आपण लग्न केव्हां रे करावयाचं शरद?'

'इतकी कां घाई झालीय तुला?'

'हो!'

'मी का कुठं पळून जाणार आहे?'

'अन् गेलास म्हणजे?'

'गेलों तर तुला अस्सा घेऊन जाईन.'

अन् त्यानं तसंच तिला उचललं होतं. अन् गरगर फिरवून पुन्हा बिछान्यावर बसवलं होतं.

'खरंच का इतकी घाई झालीय तुला?'

'हो? कसं सांगू तुला आतां? शरद...'

अन् कशानं कुणास ठाउक इथंच तो जागा झाला.

अंगावरील पांघरूण नि डोळ्यांवरील पापण्या त्यानं बाजूस

मारल्या नि पाहिलं तो...

उषा सुन्दरी लाजेनं लाल झाली होती ! तिच्या गालावरील उडालेल्या गुलाबी लज्जेची लज्जत कांहीं औरच होती. अन् म्हणूनच की काय पांखरांना आनंद झाला होता. त्याचं ते गुलाबी प्रेम पाहाण्यसाठीं आपल्या पंखांतील नी चोंचीत असेल नसेल ती सारी शक्ती अेकवटत होती. आकाशानं वर मंडप उभारला होता. दिनमणी हंसत हंसत वर येत होता. लग्नाची नौबत पक्षी वाजवत होते. पृथ्वी मंगलाष्टक जणुं म्हणत होती. नी राजाराणीच्या अेकान्तांत आपलं काय काम ? ह्या विचारानं उषेच्या मैत्रिणी-तारका-तिचं शुभचिंतन करीत लुप्त होत होत्या.

'किती सुन्दर कल्पना सुचली ही आपल्याला ?'

स्वतःशींच शरद पुटपुटला. कसला तरी अननुभूत आनन्द त्याच्या हृदयाला झाला.

मनांतील आनन्द मावेनासा झाला कीं तो कुणाला तरी सांगावासा वाटतो. आपला प्रतिध्वनि माणसाला नेहमींच नाहीं का आवडत ? शरद्‌ला एकाएकीं बाळची आठवण झाली. आज बाळला पत्र लिहिण्याचं त्यानं ठरवून टाकलं. काय लिहावयाचं ते वारंवार आठवून-सारं सारं सांगून टाकावयाचं त्याला-हे असं लिहावयाचें ते तसं लिहावयाचं असं हजारदां ठरवलं नव्हे पाठ केलं त्यानं.

सकाळचे सारे विधी आटपून ज्या वेळीं तो लिहावयास बसला त्यावेळीं त्याच्या जिभेवरील शब्द लेखणींतून उतरेनात. पाठ केलेला मजकूर जिभेवरून पसरूं लागला. नि शेवटीं त्यानं साधंच पत्र लिहिलं. होतें.

ता. क.

...हो ! एक सांगायचं विसरलंच रे बाळ! आतां तुला थट्टा

करावयाची लहर येअील नाहीं ? कर बुआ थट्टा. झालोय खरा मी थट्टेचा विषय. पण जपून हं ! अगदीं कानांत कुजबुजल्यासारखी थट्टा करावयाची...अन् त्यावर हंसायचं तेही तोंडाला रुमाल लावून नुसतं डोळ्यानंच-काय नेम सांगावा ! तुमची व्हावयाची थट्टा नि जीव जावयाचा माझा. नाहीं ?

—शरद—

पुन्हा त्यानं ता. क. वाचलं. नि जरासं मोठ्यांदाच तो म्हणाला.

'श्यामाला दाखवूं या कां हें पत्र ?'

'कांहीं नको हं'

त्याच्या मागून शब्द आले. आश्चर्यानं त्यानें मान वेळावून पाहिलं. श्यामा त्याच्या पाठीशीं उभी होती.

'अं, तूं केव्हां आलीस ?' त्यानं विचारलं.

'कां भास तर नाहीं ना झाला ?'

'छे:! पण मला कसं समजलं नाहीं तें.'

'हा काय माझा दोष ?'

'बरं माझा. हें पत्र तर वाचशील ?'

'वाचलं तें मी,

'आवडलं का पण ?'

'मुळींच नाहीं.'

'कां ?'

'मला काय माहित ?'

'मोठी लबाड आहेस तूं. नाहीं ?'

'मला काय माहित ? मी लबाड आहे ?'

‘ बरं मी लबाड, पण हा बाळ कुणाचा ? ’

‘ माझा नि तुझा ? ’

‘ तसं नव्हे रे ! हा कोण ? कुठला ? काय करतो, हे तरी सांगशील ? ’

‘ तुला काय करायचंय त्याच्याशीं ? ’

‘ नको सांगूस जा ’

असं म्हणून तिनं त्याच्या हातांतील पेन घेतलं व कागद उलटून त्यावर लिहिलं.

‘ प्रिय बाळ ( भाऊजी )

शामा वहिनीचा सप्रेम नमस्कार.

तुमची

श्यामा ( वहिनी )

‘ अं ? वहिनी केव्हांपासून झालीस तूं बाळची ? ’

‘ काल रात्रींपासून ’

‘ म्हणजे ? ’

‘ तेंच तर सांगायला आलें होतें मी.’

‘ काय ? ’

‘ रात्रीं मला आपल्या दोघाचं लग्न झालेलं स्वप्न पडलं.’

‘ खरंच ? ’

‘ हो ? ’

‘ मलाही पण तसंच स्वप्न पडलं.’

असं म्हणून त्यानं रात्रीचं स्वप्न तिला सांगितलं. ऐकून ती म्हणाली.

‘शरद’

‘काय श्यामा?’

'स्वप्नातील सत्य केव्हां करावयाचं ?'

'स्वप्नं कां सत्य असतात ?'

'पण केलीं तर होतात कीं.'

'श्यामा तूं एम्. ए. हो, मी एम्. एस्. होईन. नि नंतर...'

'म्हणजे तब्बल एक वर्षानं ?'

'होय, श्यामा.'

'फार उशीर होतोय; असं वाटत नाहीं तुला ?'

'पण श्यामा, तुझ्या घाओीचं तरी कारण काय ? '

तुझ्या उशीराचें कारण तेंच माझ्या घाअीचं.'

'म्हणजें ?'

'तेवढंच पुरे आतां. नन्तर सांगेन तुला. पण हा बाळ कोण ते सांग ना मला ?

' तो एक बडा देशभक्त आहे.'

'अस्सं ?

'हो ! सारख्या कसल्या ना कसल्या तरी चळवळींत असतो. सुखानं चार घांस देखील खात नाहीं बिचारा. मथुरेनं त्याला किती सांगितलं पण... '

'ही मथुरा कोण ?'

' तूं माझी कोण ?'

पुन्हा एकदां त्यानं वाचून पाहिलं ते.

तोटकं तोटकं वाटलं ते त्याला.

पण ... पुरं कस नि कुठं करावं तेंच समजेना त्याला. शेवटीं त्यानं ता. क. मध्यें लिहिलं.

'बरं, कळलं तें. मथुरा काय करते ?'

'तीहि त्याच्याच मालिकेंतील. सध्यां आहे बी. ए. ला. फार गोड मुलगी आहे बघ ती.'

'अन् असं असूनही बाळ ऐकत नाहीं तिचं ?'

'तो म्हणतो कर्तव्य आधीं मग सारं.'

'त्याचं बोलणं मथुरेला आवडतं वाटतं ?'

'त्यासाटींच तर तिचं नि त्याचं एवढं सूत आहे. ती देखील भारी उलाढाली करणारी मुलगी आहे.'

'तूं दोघांनाही चांगलंच ओळखतोस असं दिसतंय '?

'कां ओळखूं नये ? बाळपणापासूनचे आम्ही एकत्र झालेलों मित्र आहोंत.'

'पण तुला त्यांचं मुळींच आवडत नाहीं ना ?'

'हें तुला.कसं कळलं ?'

'तुझ्या सुरावरून.'

' झकास! सुरावरून शब्दाचे अर्थ लावावयाची कला तुझ्यापाशीं आहे कीं काय ?'

'असेल अगर नसेलही, पण मी म्हटलं तें खरं ना ? '

'हो. '

'पण कारण ?'

'ते एका शब्दांत नाहीं सांगतां येत श्यामा, आपोआप कळून येईल तुला.'

'ह्या बोलांचालीवरून बरचसं कळलंय मला हो! पण तुला एका माझ्या मित्राचा परिचय करून दिलेला आवडेल ?'

'हो ! कां नाहीं ?'

'मग चल तर - '

' आतां नाहीं.'

' मग केव्हां ! '

' अशी साऱ्याच गोष्टीची घाई कशी तुला श्यामा ! '

' ह्यांत रे कसली घाई ? '

' नाहींतर काय ? मेघांशीं ती घाई नि आतां ही घाई.

ह्या घाईनंच तर केवढा घोटाळा केलाय माणसाच्या जीवनाचा.'

' म्हणजे ? '

' तें समजायचं नाहीं तुला. अन् बघायलाहि ताकद नाहीं आतां माझ्यांत. चहा करतेस का थोडा ? '

' पण माझ्या खोलींत याल तर ? '

' कुठं का असेना, चहा मिळाला कीं झालं काम. '

' चल तर.'

' थोडं थांब, हें पत्र पुरें करूं कां ? '

' दे कीं पाठवून. हो, पण त्यांत त्याला लवकरच निघून ये, असं लिही.'

' लिहीन, पण तो कांहीं येणार नाहीं.'

' कसा येत नाहीं ? थांब, मीच लिहिते.'

तिनं पुन्हां ता.क.घालून लिहिलं. नन्तर ती म्हणाली.

' तूं एवढा एकदम गंभीर कां झालास ?

' संवय आहे तशी मला.'

' पण मला नाहीं ना ? '

' चहा करावयाची तरी आहे ? '

' आता कशी घाई झालीय रे तुला. ? '

' तुझ्या संगतीचा परिणाम बरं.'

'बरं चल, उगीच नसता वाद नको.'

तिनं त्याला उठवलं खरं...

पण तिच्या मनांत कसली तरी विचित्र हुरहुर माजली होती.कां ते तिचं तिलाच कळत नंव्हतं. कालचा नि आजचा दिवस त्याहीपेक्षां कालचा नि आजचा शरद एकच कां हा प्रश्न ती मनाला विचारीत होती. पण उत्तराचा पत्ता नव्हता. उलट भीतीच वाटत होती तिला.

'आपला अंदाज तर नाहीं चुकणार ?' यां भीतीनं तिचं मन गोरंमोरं झालं होतं. अन् म्हणूनच ती खोलींत जाऔपर्यंत नव्हे शरदला चहा देऔपर्यंत त्यांच्याशीं बोलली नाहीं.

तिनं त्याच्या हातीं कप दिला नि ती तशीच बसली.

'अन् तुला ग?' तो म्हणाला तें पाहून.

'मी आतांच घेतलाय.'

'ते नाहीं चालायचं. माझ्याबरोबर तुला थोडातरी घेतलाच पाहिजे.'

असं म्हणून त्यानं तिच्यापुढें बशी केली.

मुकाट्यानं तिनं ती मुखाला लावली नि रिकामी केली.

'चल आतां तुझ्या मित्रांकडं' असं म्हणून तो उठला.

'चल'

तीहि उठली. पण पूर्वीच्या आनन्दानं नव्हे. निराश मनानंच !

आपलं मन अेवढ निराश कां व्हावं ? शरदच्या त्या रुक्ष नि उदासिन बोलण्याचं—स्वतःच्या मित्रा विषयीच्या त्या

अनुदार उद्गारानं आपलं मन कां बोचावं हेंच समजेना तिला.

पहिल्यां वेळीं शरद कसा अेकाद्या निष्पाप बाळ-कासारखा दिसत होता. बालकाचं निर्भेळ नि मुग्ध तेज त्याच्या डोळ्यांत नि मुखावर विलसलं होतं. पाहातांच त्याच्या वर तिचा विश्वास बसला होता. तिचं मन आकर्षित झालं होतं. आपल्याला हवा तसा जीवनाचा जोडीदार आज सांपडला ह्या आनन्दाच्या भरांत श्यामाचं मन आभाळा अेवढं मोठं झालं होतं. शरदच्या मुखावर सतेजपणा, त्याच्या दिसणारी ती लहान मुलाची खोडकर बालिश वृत्ती आजही त्याच्या चेहऱ्यावरं होती. पण डोळ्यांत नव्हती. डोळ्याच्या खोल अन्धाऱ्या खाणींत काय काय लपून बसलंय याचा अन्दाज पूर्णपणें जरी करता आला नाहीं तिला तरी चाच-पडून जे तिनं पाहिलं ते कांहीं तिच्या मनाला समाधान देवूं शकलं नाहीं. त्या पत्रांतील शरदनं स्वतःविषयीं काढलेलें उद्गार तिला आठवले. 'बुद्धिवादी' हे विशेषण त्यानं स्वतःला लावलं होतं.

अन् तिला माहीत होतं कीं बुद्धिवादी माणसं फारशी चांगलीं नसतात. अन तेव्हांपासून तिच्या मनानं हाय खाल्ली होती. मनांतल्या मनांत मनोदेवतेला विनवीत होती कीं हे सारं खोटं ठरावं शरद भावनाप्रधान व्हावा - तो बुद्धिवादी नको. बुद्धिवादी माणसं कांहीं करूं शकत नाहींत. उलट अडथळा मात्र करतात. त्यांच्या बुद्धिची धार कुठलं कुठ जाऊन त्यानं काय कापलं जाअील हे कांहीं कधी सांगतां यायचं नाहीं ...

असं तिला अविनाशनं सांगितलं होतं. अन त्याचाच

परीचय करून देण्यासाठीं ती त्याला घेवून चालली होती...
अविनाश आज चार वर्षे तिचा सहाध्यायी होता. कॉलेजच्या रेसिडेन्सीमध्येंच तो रहात होता तरीही परीचय झाल्यानंतर ती मोकळेपणाने त्याच्या खोलीवर जावूं लागली होती.

सध्यां तो सिनिअर एम्. एस्. सी च्या टर्म भरीत होता. अविनाशचा विचार करतां करतां तिला अेकदम वाटले कीं -

अन् माझा शरद् बुद्धीवादी निघाला तर ...

केवढी आफत होती ती !

त्यामुळंच तर तिचं मन काळजीनं काळवंडलं होतं. अविनाशाला ती चांगलेच ओळखत होती. अन् म्हणून तर तिच्या मनाची ही विचित्रावस्था झाली होती.

" कुठून हा परिचय - प्रसंग सुचला आपल्याला - असं सारखं तिला वाटूं लागलं, पण ...

करणार काय आतां ?

आलेल्या प्रसंगाला पाठ का फिरवावयाची ?

तिनं मनाला धीर दिला खरा.

पण...

जे होणार असत ते कां कधीं टळतं ? ह्या गोष्टी माणसाच्या हातीं असत्या तर किती छान झालं असतं ?

ह्या प्रश्नाचं उत्तर ती काय देणार ? तिच्या हातीं काय तो परिचय करून देणं अेवढंच होते. अन तेच ती करणार होती !

● ● ●

कॉलेज सुरू झालं होतं. शरद् कॉलेजला गेला होता. श्यामाला ही गोष्ट कांहीं माहीत नव्हती. ती सरळ खालीं आली नि पाहिलं तो खोलीला कुलूप...

ती पुन्हा वळणार तोंच.

तिला कुणीसं विचारलं.

'शरद् साठ्यांची खोली कुठंय ?'

तो पोस्टमन होता. श्यामानं पत्रं घेतलं. पुण्यावरून आलं होतं ते. ती आपल्या खोलींत गेली. अन् तिनं पत्र फोडलं.

पत्र खालीलप्रमाणे होतं.

' प्रिय भावोजीस

मथुरा वहिनीचा सप्रेम नमस्कार.

कांहीं लिहिण्यापूर्वीं शरद् तुझं अभिनन्दन करावयाचे आहे. कशाबद्दल आहे माहित? संन्याशानं गृहस्थाश्रम स्वीकारला म्हणून ! खरं कीं नाहीं ! पण काय रे शरद्...तुझा नि वहिनीचा एकत्र फोटो सुद्धां पाठविला नाहींस तूं ? त्यामुळें निदान वहिनी पहायला मिळाली असती ! अजुनही वेळ गेली नाहीं हं !

असो.

पत्र यायचं तुला ते बाळकडूनच. किती उत्कंठेने वाट पाहत असशील तूं नाहीं ? पण बाळचा स्वभाव कां तुला

माहित नाहीं ? गेले पंधरा दिवस त्याचा पत्ताच नव्हता. अजुनही नाही. पणमाहिती तेवढी कळलीय. म्हणून त्याच्या ऐवजी पत्र मीच पाठवलय.

पुण्याजवळील खडकीला प्लेगची भयंकर सांथ सुरू झाली आहे. गोळी घातल्यासारखे लोक पटापट मरताहेत. सगळीकडे हाहाःकार माजून राहिला आहे. मदतकरण्या-ऐवजीं जो तो आपला जीव वांचवत आहे. पळून जात आहे. दोनच दिवसांत गावाचा साहारा झाला बघ. ज्याचे नातेवाईक होते ते निघून गेले खरे. पण ज्यांना कुणीच नाहीं अश्या गरीब लोकांनीं काय करावयाचं ? काय करणार ते ? सिंहाच्या दाढेंत बसून त्याच्या दयेची भिक्षा मागण्याशिवाय काय करणार तें? सांथ तर जोरांतच होती. माणसं तर सारखी मरत होती. नि मदत तर कुणाचीच नव्हती ह्या लोकांना. नशीबावर हवाला ठेवून ती मुकी जनावरं अश्रू ढाळीत होती. कुणी आपल्या डोळ्यांनीं प्राणप्रियसखीचा—कुणी एकुलत्या एक मुलीचा—कुणी आईचा—कुणी वडिलांचा मृत्यू पहात होती. पण कुणाला दया म्हणून कांहीं आली नाहीं सोन्याचा जीव दुसऱ्यासाठीं कुणी कां आडांत लोटेल ?

त्यानंतर एकाएकी बाळ बेपत्ता झाला. कुठं नि केव्हां निघून गेला याचा कुणालाच पत्ता नाहीं.सारे लोक काळजींत पडले. त्याच्या वडिलांनीं—आण्णांनी ठाव सोडला. घराचं रुपान्तर स्मशानांत झालं· अन...

कसं सांगू तुला शरद ?

नेमकं त्यांच्याच घरीं प्लेगची लागण झाली. नि सांपडले ते बिचारे आण्णा ! बाळ खडकीला गेलाय हे कळलं

होतं घरीं. मीच जाणार होते त्याच्याकडं पण निघतां क्षणींच आण्णांचं कळलं. धांवत घरीं आले, साऱ्याजणांनी धीर सोडला होता. शक्य तेवढा प्रयत्न केला मी. बाळला तार ठोकली पण......

बाळ कांहीं आला नाहीं ! देवानही माझ्या हाताला कांहीं यश दिलं नाहीं !

नाहीं, शरद, कांहींच लिहितां येत नाहीं यापुढें...

तुझीच,
मथुरा."

श्यामानं पत्रं वाचतांच तिच्याही मनांत कालवाकालव झाल्याशिवाय राहिली नाहीं. पत्र लिहितांना मथुरा रडली होती. खास त्याशिवाय पत्रांवरील अक्षरं फुटली नव्हती. तिचं मन विषण्ण झालं. उदास झालं. नि डोळे मिटून खुर्चीवर तिनं मान टाकली.

बाळच्या कितीतरी गोष्टी तिनं शरदकडून अैकल्या होत्या. ते दोघं नव्हे तिघंही जणं बाळपणापासूनही मित्र होते. अेका शाळेंत शिकले, अेकत्र वाढले, खेळले. परवापर्यन्त अेकाच ठिकाणीं होते. नि परवाच तेवढा शरद विभक्त झाला होता. शरदनं सांगितलेल्या बाळच्या गोष्टींची आठवण तिला होऊं लागली.

लहानपणापासूनच बाळ मोटा चळवळ्या-खोडकर म्हणून प्रसिद्ध. त्याच्या बाळपणांतील अेकही दिवस असा गेला नव्हता किं ज्या दिवशीं त्यानं वडिलांच्या हातचा मार खाल्ला नव्हता. अन त्याच्या खोड्याही कांहीं विलक्षण असत. अन त्या खोडकर स्वभावाला धाडसाचीही संपूर्ण पुण्याअी.

त्या वेळीं लहान होता तो. पण पठ्यानं कुठलं अस्वलाचं कातडं पैदा केलं कुणास ठाऊक. संध्याकाळची वेळ होती. सारेजण समोरच्या दिवाणखान्यांत गप्पागोष्टी करीत बसले होते. त्याची आअी बहीण सारेजण होते. गप्पा मोठ्या रंगांत आल्या.

पण—एकाएकी त्याच्या. बहिणीनं किंकाळी फोडली, नि दुसऱ्याच, क्षणीं ती बेशुद्ध पडली. अण्णांनीं घाबरून वर पाहिलं, तिला सावरलं, तोंच त्यांच्या अंगावर कुणाचा तरी हात पडला. त्यांनीं चमकून पाहिलं तों.

अस्वल... !

त्यांची दांतखीळच बसली. घरांतली सारीं माणसे चिरकत बाहेर पडली. अण्णांही—मेलो ! मेलो !!! करून ओरडत उठले. त्या अस्वलानें बहिणीचा मात्र पिच्छा पुरवला. ती बेशुद्धच पडली. थोड्या वेळानं डोळे उघडलें तिनं तोंच त्या अस्वलानं असं कांहीं भिववलं कीं ती सात आठ वर्षांची बालिका तिथेच गत:प्राण झाली !

आरडा ओरडा अैकतांच चाळीतील सात आठ लोक काठ्या घेवून आले, ते येतांच नि बघतांच अस्वलाच्या अंगावर कांटा थरारला. तरीपण उसनं धैर्य आणून बाळनं जोरानं म्हटलं.

' कोण ? कोण ते? टाकतां कीं नाहीं काठ्या खालीं? '

अस्वल बोललं म्हणून सारेच ' आ ' वासून उभे राहिले. ही भूताटकी तर नव्हे अशा विचारानं त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. साऱ्यांच्या कांठ्या हातांतून गळाल्या. पण एकजण मात्र भ्याला नाहीं. काठी सरसावून

तो धावला पुढें. नि काठी उगारणार तोंच बाळनं कातडं झुगारून दिलं नि मोठमोठ्यानें हसूं लागला.

साऱ्यांचे जीव उडून गेले होते...साऱ्यांचीच फजिती झाली होती. त्यामुळें सारेजण त्याच्यावर चिडले, जळफळले.

अन् जेव्हां अण्णाला आपल्या आवडत्या मुलीची ती दशा दिसून आली त्यावेळीं मात्र साऱ्यांच्या तोंडचं पाणी पळालें. धांवाधांव झाली. डॉक्टर आले. पण.

मेलेल्या माणसाला का कुणी जागं करतं?

रागाच्या भरांत आण्णांनीं त्याला बेदम मारले. इतके कीं स्वारी आठदिवस बिछान्यावर पडून होती.

ही झाली बाळची खोड्याकरण्याची रीत.

अन् त्याचं धाडसहि तसंच विलक्षण होतं. बाळ, शरद, मथुरा नि आणखीन् चारपांच आळींतील सवंगडी गप्पा छाटीत बसली होती. होतां होतां गोष्टी भुतांखेतांवर गेल्या. जेवढ्या म्हणून भयानक गोष्टी होत्या तेवढ्या साऱ्यांनीं रंगवून सांगितल्या. साऱ्यांना भीति वाटली. दम छाटला साऱ्यांचा. पण बाळच्या मनावर तिसरांच परिणाम झाला. भूतांविषयींचे कुतूहल त्याच्या मनांत उत्पन्न झालं होतं. तो भ्याला तर मुळींच नव्हता! पण ही गोष्ट पाहावयाचीच अशी जणुं त्यानं खात्रीनं ठरवलं. नि विचारलं.

'काय रे गणू? आपल्या गांवीं नाहींत कारे भूत?'

'आहेत तर! गणूनं म्हटलं. तो वडाचा पार आहे ना आपल्या शाळेजवळ तिथं वेताळ आहे म्हणे एक वेताळ! म्हणजे भूतांचात राजाच. दर आमावास्येला तो झाडांवर बसतो येवून राजासारखा. नि त्याच्या खालीं पारावर सारी

भूत रिंगण घालून नाचतात. त्याच्या हातांत म्हणे दिवट्या असतात. आमच्या आजीनंच सांगितलं हे मला. एके दिवशीं ती अशीच उठली म्हणे झोंपेतून. तेव्हां खिडकींतून तिची सहज नजर गेली तिकडे. सर्वांना माहित होतं ते. त्या रात्रीं कुणीं देखिल भटकत नाहीं म्हणे तिथं... '

बाळचे डोळे आकुंचित झाले होते. ही स्वारी विशेष कांहीं करणार असा शरदला संशय आला. अन् त्यानें तें अण्णांना सांगितलें. त्यांना सावध रहाण्याचीही सूचना दिली. अण्णांना मोठा पेंच पडला. बाळचा पराक्रम आळींत विख्यात होता. केव्हां कुठं काय करील स्वारी नि कसलं संकट ओढवून घेईल हें नसतं कुणाला सांगतां आलं. अण्णांना भीति वाटली. अन् त्यांनीं एक युक्ती योजली.

हे बघ शरद, ते म्हणाले ' त्या दिवशीं रात्रींच्या वेळीं किनअी तुम्ही सारेजण जा सिनेमाला. दहाचा खेळ पाहा. नि तुमच्याबरोबर बाळलाहि घ्या. कशाची देखिल काळजी करूं नका. मीहि त्यादिवशीं येणार आहे. '

झाले ! सारे ठरले !!

बाळही आला सिनेमाला. सिनेमा रंगांत आला. साऱ्याचं लक्ष पडद्यावर होतं. खेळ महारथी कर्णाचा होता. युद्धाचा प्रसंग पडद्यावर चालूं होता. कर्णाच्या रथाचं चाक जमिनींत रुतत चाललं होतं. साऱ्यांच्या छात्या आंकसून गेल्या होत्या. दम रोखले गेले होते. आतां पुढें काय होणार यांची उत्सुकता सर्वांच्या डोळ्यांत मूर्तिमंत दिसून येत होती.

नेमकी हीच वेळ बाळानं साधली !

जागेवरून तो उठला केव्हां हे शेजारच्या मथुरेला

कळलं देखिल नाहीं.

पिक्चर संपतांच ती ओरडून उठली...

'बाळ ! बाळ !!'

किती शोधलं आम्ही. पण तो वस्ताद कुठला सांपडणार ?

शरदनं अण्णांना सांगितलं अण्णा भीतिनं अर्धमेले झाले.

'कार्टं कसं अवलक्षणी निघालंय.' एवढाच शब्द त्याच्या मुखांतून निघाला. सारे घरीं आले. अण्णांनी चाळींतल्या दहापांच जणांना हांका टाकून उठवलं. कंदील काठ्या जमा झाल्या. नि मोर्चा निघाला वडाच्या झाडाकडे.

भर बाराची रात्र उलटून गेली होती.

दहा बारा जण होते. चांगले पुरुष होते. हातांत दिवे नि काठ्या असूनही साऱ्यांची छातीची धडधड जोरानं चालली होती. एक शब्द देखील कुणाच्या मुखांतून फुटत नव्हता; जस जसं वडाचं झाड जवळ येऊं लागलं तसतशी सर्वांची चाल मन्दावली.

आवांतर मंडळींत नि झाडांत अर्ध्या फर्लांगाचं अंतर राहिलं असेल...

कुणितरी अचानक ओरडले.

'ते...ते...पहा अण्णा...ते दिवे-त्यां भुतं... !'

झालं साऱ्यांचीं गात्रं शिथिल झाली. सर्वांनीं पाहिलं पण...

कुठंच कांहीं नव्हतं...कुणालाच भूतही दिसलं नाहीं किंवा दिवेही नाहींत. पण सर्वांच्या मनांत मात्र विलक्षण

धडकी भरली. एक इसम तर मुरगळूनच पडला. पुढं पाऊल टाकण्याची ताकद एकाऱ्याही अंगीं नव्हतीं. किंकर्तव्यमूढ हतबुद्ध झाले सारें, तोंच...

सर्वांच्या कानीं झाडांच्या पानांची सळसळ ऐकू आली झांड जोरांत हललं.

सारीकडं शान्त. शान्त होतं. स्मशान शान्तता होती. वाराही नव्हता. दहा पंधराजणाशिवाय आजूबाजूला कुणीच माणूस नव्हतं. सारीकडं स्तब्धता. भेसूर भयानक शान्ततेचें साम्राज्य पसरलें होतें.

त्या भयानक सळसळीसरसी साऱ्यांच्या अंगावर घामाचे थेंब दरदरून उठले.

वाऱ्याशिवायच झाड हलत होतें जोरजोरानें. साऱ्यांच तिकडंच लक्ष होतं. धडधडत्या छातीनं नि भिरभिरल्या डोळ्यांनीं सारेजण पहात होते. मनांत शिव्या देत. होते.

कशी झक मारली नि अिकडे आलो कुणास ठाऊक?

सर्वांनाच दिसलं तें.

झाडांतून कुणीतरी उतरत होतं अन् म्हणूनच झाड हलत. पांढरी पांढरी सफेत व्यक्ति होती ती! साऱ्यांना वाटलं भूतच तें ? तें खालीं उतरलं.

अन्.

अरे बापरे ! अिकडं मंडळी उभी होती. तिकडंच त्यानं मोर्चा वळवला. ते जवळ जवळ येवूं लागले.

'झालं भरली वर्षं !!'

सर्वांची तोंड सुकली. कांठ्या गळल्या. घशाला कोरड

पडली. चार बोंबा मारण्याचीही ताकद कुणाच्यांत राहिली नाहीं. हातपायलटपटूं लागले. अन...

कुठून तरी हुकमी आवाज...

खबरदार पुढं याल तर—कुठंय तो वेताळ? ज्यांना भूत म्हणतात ते तुम्हीच ना? एक पाऊल पुढं टाकाल तर...

प्रथम कुणालाच आवाज ओळखूं आला नाहीं. त्या धमकावणींत साऱ्यांच्या हातांतील कंदील पटापट खालीं पडले. नि खळ्...खळ् असा क्षणभर आवाज झाला.

पण अण्णांनीं बरोबर ओळखला तो आवाज...

"कार्ट्या बाळ्या..."

त्यांचा आवाज ऐकतांच कुणालाच न भिणारा बाळ अण्णांना घाबरला.

"मी...मी...नाहीं अण्णा...मी बाळ?"

असं काकुळतीला येऊन सांगूं लागला.

आतां कुठं साऱ्यांचे जीव भांड्यांत पडले? भीति उडाली नि खद्खदून सारीजण हसूं लागले. त्या दिवसींपासून-"एक विचित्र मुलगा!" म्हणून त्याची ख्याती होवून चुकली.

"विलक्षण धाडसी" म्हणून जो तो म्हणूं लागला. पण आपल्या बाळला कुठल्या कोटींत घालावं तेच समजेना अण्णांना.

अन् नुसताच खोडकर नि धाडसी नव्हता तो...

त्याच्या बुद्धीची धारही अतिशय तिखट होती.

संबंध वर्षभर उडाणक्या करूनही शेवटच्या पंधरा तीन आठवड्यांत अभ्यास करून तो बी. ए. फर्स्ट क्लासांत आला होता....

अशा प्रकारच्या कितीतरी गोष्टी तिनं शरदकडून ऐकल्या होत्या. अतिशय हट्टी त्याचा स्वभाव. तसंच एकदां जें करावयाचं ठरवलं तें काय वाटेल तें झालं तरी करावयाचं असा त्याचा विचित्र बाणा होता.

अन् त्याचं प्रत्यन्तर पाहायला लांब जावयाचंही कारण नव्हतं. खडकीच्या प्लेगनं चांगलाच प्रकाश पाडला होता त्यावर. अण्णा वारले तरी तो त्याच्या कर्तव्यापासून ढळला नव्हता तसूंभरही...

श्यामाच्या मनांत बाळविषयीं केवढं कुतुहल माजलं होतं! ती व्यक्ति म्हणजे गौडबंगाल असली पाहिजे असं वाटलं तिला. त्याच्याबद्दल आदराची भावना तर होतीच पण त्याहीपेक्षां त्यांत नवलाओची झांक अधीक होती. अेकदां पाहिलंच पाहिजे या विचित्र प्राण्याला असा विचार तिच्या मनांत आला, प्रबळ झाला, नि चटकन् तिच्या मुखांतून तेच शब्द बाहेर पडले...

'हो! पाहिलंच पाहिजे एकदां त्याला!'

'त्याला म्हणजे कुणाला?'

कुणीतरी तिच्या जवळ येवून म्हटलं होतं. शब्द ऐकतांच ती दचकून उठली. अन् पाहते तो अविनाश...

'सांगेन मग. पण चिन्तन कुणाचं चाललं होतं?'

'असंच एका माणसाचं'

'असं लपवतेस कशाला श्याम, शरदचंच म्हणत...

अन् असं म्हणून तो उपरोधिकपणें हांसला. असं विचित्र तो हंसेल अशी श्यामाला कल्पनाच नव्हती. शिसारी आली तिला. ते खवचट हास्य तिच्या मर्मस्थानीं बोचलं.

पण.

हें कांहीं अगदींच अनपेक्षित नव्हतं. त्या दिवशींचा तो प्रसंग अजूनही तिच्या डोळ्यांसमोर अगदीं आज घडल्यासारखा उभा राहिला.

अविनाश हा तिचा परमस्नेही. जातीनें तो बंगाली. मनानं तो भावनाप्रधान नि मायेनं मोठा होता तो. अविनाशची ओळख करून देण्यासाठीं ती व शरद दोघेही त्याच्या खोलीवर गेले. अविनाश कांहींतरी वाचीत होता. खोलींत श्यामानं प्रवेश केला होता तो शरदच्या हातांत हात घालूनच. अन् ती त्याच्या बिछान्यावर येवून बसली तीहि शरदला खेटूनच.

पुस्तकांतून डोकं काढून त्यानं श्यामाकडं पाहिलं—तिखट नजरेनं कसल्यातरी प्रकारची आगच जणूं ओतीत होता तिच्यावर तो. कपाळाला सतराशेंसाठ आंठ्या पडल्या होत्या. ते त्याचं स्वाभाविक पहाणं नव्हतं. कसल्यातरी विचित्र मत्सरानं परीपूर्ण भरलेली ती दृष्टी श्यामाच्या मनांत चांगलीच खोल बोचली. पण तिनं त्याकडं दुर्लक्ष केलं. चेहऱ्यावर फरक पडूं दिला नव्हता, नि त्याला नेहमींच्या खेळकर वृत्तीनं विचारलं होतं...

‘ कायरे वाचीत होतास ? ’

त्यानं प्रश्नाचं उत्तर तर दिलं नाहींच. अेकवार तुसडेपणानं त्यानं तिच्याकडं पाहिलं. नि दुसऱ्याच क्षणीं अनगटावरील घड्याळाकडं नजर देवून तो आश्चर्यानें म्हणाला.

‘ बापरे ! दहा वाजले कां ? मला गेलंच पाहिजे. ’

असं म्हणून तो उठला. त्यानं कपडे केले. नि तं

दोघं आपल्या खोलींत बसली आहेत याची जणूं त्याला जाणीवच नाही असं दाखवून तो चालता झाला. जातांना अेक शब्ददेखील बोलला नाहीं वा ढुंकूनही पाहिलं नाहीं त्यानं. अश्या प्रकारची त्याची वागणूक ही पहिलीच. श्यामाचा हा पहिलाच अनुभव होता.

पण....

गांगरून जाणं अशक्य होतं. सारं सावरून घ्यावयाचं तिच्याकडंच होतं. मनांत रागारागानं धुमसत असतां चेहऱ्यावर हास्य आणून नि शरदचा हात दाबून तिनं म्हटलं होतं..

"आहे की नाहीं अेक विचित्रवल्ली !"

"दिसतेय खरी !" अेवढंच शरद म्हणाला होता.

अन् यात शरदला कांहीं अस्वाभाविक वाटूं नये म्हणून तिनं त्याला अविनाशविषयीचं पुराण सुनावलं होतं...

या कॉलेजांत ती नुकतीच आली होती. कॉलेजचा अनुभव तिला नव्हता. कॉलेजची त्यांतून ती Beauty Queen होती. पोरांच्या फाजीलपणाला कांहीं सीमा नसते असं असल्यावर, चारीबाजुनं तिच्या मनावर थट्टेचा, कुचेष्टेचा, फाजील पणाचा भडीमार होवूं लागला. तिचं मन आंतल्या आंत कोंडल्यासारखं झालं होतं. तशांत एक दिवस तर कळसच झाला...

कॉलेजच्या ठरावीक तासानंतर ती हॉस्टेलमध्यें येत होती. कुणा अेका वात्रट विद्यार्थ्याची नजर गेली तिच्यावर. कुठून तो कसा आला कुणा ठाऊक. सायकलीवर फास्ट होता तो. त्यानं मुद्दामच तिला धडक दिली नि पुन्हां बेशरमपणें खालीं उतरून तो तिची क्षमा मागूं लागला...

अन् अघळपघळ बोलू लागला...

इतक्यांत कुठून तरी अविनाश आला नि त्याची त्यानं मानगुट पकडली.

यावरून श्यामा नि अविनाश यांची ओळख झाली होती. ओळखीचं रूपांतर पुढं परिचयांत नि परिचयाचं पुढें दाट स्नेहांत झालं होतं. दोघांच्याही मनांत अेकमेकांविषयीची अपुलकीची भावना होती. अविनाश बॅडमिंग्टन चॅंपियन होता. कॉलेजांतील क्रिकेटचा कॅप्टन होता. त्याचवर्षी कॉलेजमधील गॅदरिंगचा सेक्रेटरी निवडून आला होता. अेवढंच नव्हे तर तो एक तेजस्वी लेखक म्हणूनही चांगलाच प्रसिद्ध होता.

स्वभावानं तर तो फारच चांगला. कॉलेजांतील मुलं नेहमीं त्याच्या आवंतीभोंवतीं असत. अध्यापकांचाही ' तो लाडका होता. प्रिन्सिपॉल तर त्याला '

कॉलेजचं भूषण म्हणून गौरवीत होते.

श्यामाला कुणीतरी ओळखीचं हवं होतं. बरी ओळख झाली असं वाटलं तिला. थोड्याच दिवसांत त्यांच्यांतील संकोच मावळला, नि ते अेकमेकांच्या पूर्ण परीचयाचे झाले.

अविनाश श्यामाला नेहमी ' सर्वांग सुंदर ' असं म्हणे. कारण ती शरीरानं तर सुंदर होतीच. पण गुणानं देखील श्रीमंत होती. त्याच्याचप्रमाणं ती बॅडमिंग्टन चॅंपीयन ' होती. चांगली कवयित्री होती. बी. ए. ला फर्स्ट आली होती. नि मागच्याच वर्षीं गॅदरिंगच्या नाटकांत भूमिका उत्कृष्टपणें पार पाडली होती...

दोन गुणी माणसांचा स्नेह होण्यास कां उशीर लागतो !

हे सारं तिनं त्या दिवशीं अविनाशच्याच खोलींत शरदला सांगितलं होतं. शरदचं तिनं समाधान केलं खरं ! मित्राच्या विचित्र वागणुकीवर पांघरूण घातलं खरं ! पण तिच्या मनाला समाधान झालं नव्हतं.

माणूस दुसऱ्याला सहज फसवूं शकेल. पण स्वतःला फसवूं शकत नाही !

त्या प्रसंगानंतरची अविनाशची वागणूक बदलली होती. तो तिच्याशीं बोलला नव्हता. ती बोलावयास गेली तर ' हो, ना ' शिवाय एक शब्दही तोंडांतून तो काढीत नव्हता. एवढेंच नव्हे तर तो आपल्याला टाळतोय असा संशय देखील तिला आला होता.

अन् त्यामुळं तिचं मन तळमळत होतं. स्नेहाचं रूपान्तर वैरांत होत होत. तिच्या डोळ्यांनीं ते ती पाहात होती. अन् त्या गोष्टीला प्रतिरोध करतां येत नव्हता तिला. असहाय्य होती ती ! आज चार पांच वर्षांचा स्नेही तुटणार म्हणून तिचं मन कासावीस होत होतं.

अितक्या दिवसानन्तर तो आज अचानक तिच्या खोलीवर आला होता नि पुन्हां तसं उपरोधिकपणानें हंसून तिच्या हृदयाचे शतशः तुकडे केले होते त्यानें. हास्य विरतांच तो तिच्याजवळ गेला. नि म्हणाला.

' रागावलीस होय श्यामा ? '

' श्यामा त्यावर काय बोलणार ?

' श्यामा मला एक तुला प्रश्न विचारावयाचा आहे, विचारूं ?

‘ असली प्रस्तावना कसली अवि ! खुशाल विचार ना. ’

‘ पण तूं रागावलीस तर ... ’ ?

‘ नाहीं रागावणार. विचार. ’

‘ हल्ली तूं माझ्याशीं असं कां वागतेस ? ’

‘ असं म्हणजे कसं ? ’

‘ परक्यासारखं ? ’

श्यामाच्या मनावर हा तर वज्रघात होता. वास्तविक परक्यासारखं वागत होता तो अविनाशच. श्यामा नव्हे. असं असूनही त्याचा तो प्रश्न ... बोलण्यांत पडलेलं त्याचं ते अन्तर ... श्यामाच्या मनाला धसका बसला त्यामुळें. ती उठली खुर्चीवरून नि त्याचे खांदे हलवून म्हणाली.

‘ अवी ! वेड कां लागलंय तुला ? मी कशी बरें वागेन परक्यासारखी ? असं वाटलं तरी कसं तुला ? ’

‘ खरं का हे श्याम ? ’

‘ हो ! अगदी खरं. ’

‘ मग माझं अेक सांगणं आहे तुला. अैकशील ? ’

‘ बघ, तूंच असले परके शब्द वापरतो आहेस अवि. ’

‘ सांग कीं अैकशील ? ’

‘ काय ? ’

‘ शरदशी तूं अितक्या सलोख्यानं वागावं हे बिलकूल आवडत नाहीं मला. ’

‘ कां ? ’

‘ कां ते नको विचारूं. पण ...’

‘ तुझं पण अशक्य आहे अवि ’

‘ कां ? ’

‘ त्याच्याशीं परकेपणानं वागणं जमणार नाहीं माझ्याकडून.

‘ अन् माझ्याशीं जमतं नाहीं ? ’

‘ अवि ... ’

‘ कळलं. श्यामा. कळलं मला. पुढं बोलण्याची जरुरीच नाहीं मुळीं. ’

अन् चटकन तो तोंड फिरवून चालता झाला.

‘ अवि ! अवि !! तिनं हांका मारल्या.

पण तो कांहीं थांबला नाहीं. निघून गेला ...

श्यामा धाडकन् बिछान्यावर येवून पडली, नि उशींत तोंड खुपसून धाय् धाय् रडूं लागली. रडण्याशिवाय काय असतं स्त्रीच्या हातीं ? ‘ रोदनं बालको बलं ’ हे स्त्रियांच्याही बाबतींत तितकेंच खरें आहे.

अविनाश निघून गेल्यावर पांच दहा मिनिटें झाली असतील नसतील तोंच ...

शरद दार लोटून आंत आला. चाहूल न देतां त्यानें सारें पाहिलें. श्यामाला तशा स्थितींत पाहून तो कळवळला. तिच्याकडे जाणार तोंच ...

त्याची नजर टेबलावरील पत्राकडे गेली ...

त्यानें तें अगोदरच उचललें नि वाचलें.

हताशपणें एक सुस्कारा टाकून तो श्यामापाशीं आला. नि हांक मारली ... ‘ श्यामा ! ’

हांक अैकतांच—ती परिचित हांक अैकतांच श्यामानें डोळे उघडले. त्याच्या गळ्याला दुःखाच्या भरांत तीनें मिठी मारली. नि त्याच्या छातींत डोकें खुपसून पुन्हां ती स्फूंदून स्फूंदून रडूं लागली.

न बोलतां त्यानं तिच्या केसांवरून हात फिरवला. थोड्या वेळानं त्यानं पुन्हां हांक मारली.

' श्यामा ! ' नि पुढं तो गदगदून म्हणाला.

' बाळचा स्वभावच असा आहे ग ' वाअीट वाटून घेऊन काय करणार तूं त्याला. '

त्याला वाटलं श्यामा रडतेय ती त्या पत्रामुळेंच !

तें ऐकून तर श्यामा जास्तच स्फुंदू लागली ! कसं शांतवन करावं तिचं हेच कळेना त्याला. भावनेच्या आवे-गांत त्यानें पुन्हां कळवळून हांका मारल्या...

' श्यामा ! श्यामा !! '

अन् तिला त्यानं घट्ट छातीशीं धरून ठेवलं.

* * *

— ३ —

श्यामा ! केवढा विचित्र प्रसंग तिच्यावर ! विलक्षण विलक्षण पेंच म्हणावयाचं नाहीं याला तर काय म्हणावयाचं ! ज्या गोष्टीची तिला भीति वाटत होती. ज्या भीतीनें तिचं

काळीज करपून गेलं होतं तीच...नेमकी तीच गोष्ट त्या दिवशीं घडली.

ही गोष्ट माझ्या जीवनांत घडूं नये! असं तिला वाटत होतं! तशी तिची प्रबळ अिच्छा होती...पण...

नुसतं 'नको' म्हणून कां कुठं येणारं अरिष्ट टाळतां येते? असं झालं असतं तर किती छान झालं असतं पण...माणसावर कधीं कधीं देव नि दैव दोन्हीही निष्ठुर बनतं. वेदनेच्या सुरीनं त्याचे शतशः तुकडे तुकडे करते. माणसाची कासावीस होते त्यामुळें. पण त्याला थोडीच पर्वा असते त्या वेदनेची! निर्दय, निष्ठुर नि निर्लज्ज कुणी असेल जगांत तर ते माणसाचं नशीबच!

... टक् - टक् - टक् · श्यामाच्या दारावर मारलेल्या टिचक्या तिनं अैकल्या. ती उठली नि दार उघडून पाहाते तों अविनाशची करडी नजर तिच्या डोळ्यांत खुपसली गेली. टक लावून तिच्या डोळ्यांत त्यानं कांहींतरी शोधलं. न बोलतां त्यानं दार लावलं कडी लावली.

श्यामा हें सारं पाहात होती. तिच्या छातींत धडकी भरली. अविनाश कसला तरी विचार करून आला होता? आज असं पाहात होता? आजची त्याची नजर अितकी विचित्र कां? रोखलेली कां? काय हवंय त्याला माझ्याजवळचं कां? ... कां ... आपली शंका· ती भयंकर शंका आज तरी खरी होणार नाहीं ना? तो निर्दय प्रसंग · ज्याला आपण इतके दिवस टाळलं तो प्रसंग तरी आपल्या रोखानं नाहीं ना चालून येणार?,..

ह्या विचारानं तर तिची छाती दडपली. डोळे

भितीनं भिरभिरूं लागले. माणसं भुतापेक्षां त्यांच्या ऐकीव स्वरुपालाच भितात हेंच खरें. प्रसंगापेक्षां प्रसंगाच्या भितीनंच श्यामा जास्त भ्याली, नि खालीं मान घालून त्याच्यापुढें बसली.

अविनाश देखील कांहीं बोलला नाहीं. वास्ताविक त्यानं निर्धार करून टाकला होता कीं आज ह्या गोष्टी श्यामाला विचारावयाच्याच. ह्या गोष्टींचा निकाल लावावयाचाच. कितीतरी दिवस त्याच्या मनांत हे विचारावयाचं होतं. आज विचारूं उद्यां विचारूं असं करतां करतां दिवसच्या दिवस गेले नि वाढत्या दिवसांबरोबर त्याच्या मनाची बेचैनताही वाढत होती. अन् आज त्याची परमावधी झाली. मनाची अस्वस्थता त्याला सहन झाली नाहीं. काय वाटेल तें होवो, पण विचारायचंच ?' ह्या निश्चयानं तो आज श्यामाकडे...

पण प्रसंग येतांच त्याची वाचा बसली. उसनं धैर्य गळालं. संकटाची कल्पना असूनही नि संकट सोडविण्याच्या साऱ्या किल्या माहित असूनही माणूस प्रसंग पडतांच घाबरतो तो असा.

पण दोघंही असं कितीवेळ गप्प बसणार ? बोलायला कुणी ना कुणीतरी हवंच होतं ना ?

'श्यामा ?' त्यानं श्यामाला हांक मारली.

तिनं वर मान करून त्याच्याकडं एकवार पाहिलं. 'याच्या नेत्रांत श्यामाला भितीचे वारे दिसले. चेहेऱ्यावर देखिल बावरून गेलेल्या लहान मुलाचे भाव खेळत होते. तिनं मान खालीं घातली पुन्हां.

'श्यामा ?' पुन्हा तीच हांक श्यामाच्या कानांवर

आदळली. ' मला तुझ्याशीं आज बरेंच बोलायचें आहे. '

' मग बोल कीं, असा गप्प कां बसला आहेस आल्यापासून ?

' बोलावसं वाटतं- पण धैर्य होत नाहीं. '

' म्हणजे ? '

होय श्यामा ! खरें तें सांगितलें तुला. कदाचि आश्चर्यही वाटेल तुला. पण तुला विचारावयाचा प्रश्नच तसा चमत्कारिक आहे. त्याला मी तरी काय करूं ? '

' चट्कन् ती उठली जाग्यावरून. त्याच्या जवळ गेली नि मृदु आवाजांत म्हणाली.

अवी; हल्ली असा काय रे वागतोस तूं ? माझ्याशीं बोलतांना असा विचार पूर्वी कधीं करावा लागला नाहीं तुला. नि आजच हें असं कां ?

' खरं आहे तुझं म्हणणं श्यामा ! मलाही पटतं तें. पण तुझ्या विषयीं सारखी भीति वाटतेय मला. '

' केव्हांपासून वाटूं लागली तुला माझी भीति ? '

' ह्या सातआठ दिवसांतच. '

' कां ? '

' तेंच तर सांगण्यासाठीं आलोय. पण ... '

' सांगून टाकाना मग. त्याला कशाला पण– नि बिण हवा आहे ? '

' सांगू ? '

' खुशाल. '

' रागवणार नाहींस तूं ? '

‘ तसं वचन हवंय का ? ’

‘ हवंय - पण दुसऱ्या बाबतींत. ’

‘ तेंच काय तें सांग ना. ’

‘ तूं माझ्याशीं लग्न करशील ? ’

‘ तूं माझ्याशीं लग्न करशील ? ’ हां ... हाच प्रश्न तिला नको होता. श्यामाला भीति वाटत होती ती याचीच. आजकाल अविनाशच्या डोक्यांत काय चाललंय याचा अचूक नाहीं तरी साधारण परिचय तिला झाला होता. ते त्याच्या वागणूकींत नि बोलण्यांतूनच प्रतिध्वनीत होत होतं. श्यामा अेक स्त्री होती. स्त्रियांना पुरुषांचीं हीं पाऊलं चटकन् ओळ-खतां येतात. श्यामानं ते ओळखलं होतं. हाच प्रसंग तिला नको होता. नेमकं हेंच तिला टाळावयाचं होतं. नि नेमकं तच नशीबानं तिच्या नशीबी ठेवलें. ...

त्याचा तो प्रश्न तिला अपरिचित जरी नव्हता ... तरीही त्या प्रश्नाचा तिच्या मनावर व्हावयाचा तोंच परि-णाम झाला. ती त्याच्याजवळ गेली तशी विजेचा शॉक बसवा तशी मागें सरकली. आपल्या असनावर बसली.

“ अवी ... ”

अेवढेंच ती उद्‌गारली नि गप्प झाली. तिला बोला-वयाचं होतं खूप. पण ती बोलूं शकली तें येवढंच. जिभेला आपण तरवारीची उपमा देतो खरी. पण तरवारीपेक्षां जीभेची धार कधीं कधीं बोथट ठरते ती अशी. खालच्या मानेनें ती बसली अन् तिच्या मांडीवर तिच्या नयनांतील अश्रुधारा आपोआप सांडूं लागल्या ...

जें काम जिभेला अशक्य वाटलं तें तिच्या नयनांनीं केलं. ...

अवीनाशाचं लक्ष होतंच तिच्याकडे. तिच्या डोळ्यांतून अश्रु निघतांच त्याच्याही हृदयांतील बर्फाचं पाणी पाणी झालं !

' श्याम...श्याम...हें काय ? '

असं म्हणत तो उठला. तिच्या शेजारीं बसला. स्वतःच्या हातरुमालानं तिच्या डोळ्याचं पाणी त्यानं पुसलं. नि तो गदगदून म्हणाला.

' वाईट कां वाटलं तुला श्याम ? '

' कशाला विचारलास तूं हा प्रश्न ? '

' मला दुखवावयाचं नव्हतं तुला श्याम ? '

' पण मला तुला दुखवायला लावलंस ना आतां ? '

' म्हणजे ? '

' अवी, माझं ऐकून घेशील का शान्त चित्तानं ? कधीं येऊं नये तो प्रसंग माझ्यावर गुदरला आहे. आज ना उद्यां केव्हांतरी तो येणारच होता. ऐकशील का माझं अवी ?

' सांग, तुला काय सांगावयाचं आहे ते. सांग श्याम. ऐकेन मी. '

' तर ऐक तर आतां. तुला प्रीति नि मैत्री हा भेद कळतो ना ? '

' हो ! '

' मग हा प्रश्न तूं का विचारलास मला. ? '

' आपल्या प्रीतिचं रूपांतर जीवनांत करावं म्हणून. '

' म्हणजे तुझं माझ्यावर प्रेम होतं हें कां तुला सांगा-वयाचं आहे. '

' शंका आहे का अजून यांत ? '

‘ शंका ? खूपच आहे. माझ्याविषयीं तूं कधीं विचार केला आहेस कां ? ’

’ त्यांस विचार तो कसला करणार ? काय ? तुझं माझ्यावर प्रेम नाहीं ? ’

‘ मुळींच नाहीं ! हीच ती चुकीची समजूत घातक ठरली तुला. अेवढंच नव्हे तर तुझं देखिल माझ्यावर प्रेम आठ दिवसापूर्वी नव्हतं. आज चार वर्षें आपण अेकमेकांचे मित्र आहोत. नुसती मैत्री म्हणजे प्रीति नव्हे. आकर्षणानं प्रीतिचं रोपटं उगवतं. तुला माझ्याविषयीं नि माझं तुझ्याविषयीं कसलं आकर्षण नव्हतं. जिवाभावाची मैत्री मात्र होती. तुम्हां पुरुषांना मैत्रीचं रूपांतर प्रीतींत चांगलं करतां येतं. तुम्ही त्याच्यांत भेदभाव करीत नाहीं. स्त्रीयांचं तसं नसतं. अवी ! मैत्रीपेक्षांही प्रीति आम्हांला जास्त प्रिय. नि प्रीतींतून उत्पन्न होणारी मैत्री आम्हांला जास्त हितकर. मला तर तुझ्याविषयीं कधींच तसं वाटलं नाहीं, खरंच सांगते अवी, तुला पाहून माझ्या मनांतील कुठल्याच भावनेचं उद्दीपन झालेलं नाहीं, तें आकर्षण निराळंच असतं, ज्यांत मनाचं आन्दोलन करण्याचं विचित्र सामर्थ्य असतें, ज्याच्या अभावी जीवन निरस, ज्याच्या संयोगांत तें सरस ठरतं त्याच नांव प्रीति, प्रीतींत गगनाला गवसणी घालणारा आनन्द असतो. तंसच पाताळांच्या खोलींत गडप करून टाकणारा खेदही असतो, सांग, अश्या भावना तुला तरी पूर्वी झाल्या आहेत कां ? अन् जरी तुला झाल्या असल्या तरी मला झाल्या पाहिजेत ना ? अेकांगी प्रीति काय कामाची ? असं असतांना मी तुझ्याशीं लग्न कसं करूं सांग ? त्यांत माझ्या जीवाची तहान कशी भागेल ? त्यापेक्षां ... त्यापेक्षां

आपण जसे पूर्वी होतो तसेंच जर ... '

'बस्स...बस्स झाली वटवट श्यामा ! हें ऐकायला नव्हतों आलों मी ! मला तुझं तत्वज्ञान नको. प्रेम हवं. मला माझ्या प्रश्नांचं उत्तर दे. सांग...लग्न करणार आहेस कीं नाहींस तें ? '

'शक्य नाहीं तें. माझं लग्न केव्हांच ठरून गेलंय. :...श्यामा तुझी माझी शेवटचीच भेट ही ! पण लक्षांत ठेव...एका प्रेमाला दुखावलं आहेस तूं ! दुसऱ्या प्रेमांत तूं स्वतः दुखावली जाशील...ध्यानांत ठेव हें...

: अवी...अवी...'

तिनं हांका मारल्या.

पण अविनाश केव्हांच निघून गेला होता...

तिनं जाणून बुजून सापावर पाय दिला नि त्या सापानं डूक धरला. भयंकर विषारी असतं हें सूडाच्या सापाचं भूत ! हें त्या गरीब श्यामाला काय माहित ?

श्यामाच्या आतां अश्रूंना पारावार नव्हता ! तिनं बिछान्यावर अंग टाकलं नि ती धुसमुसून फुलून फूलून रडूं लागली !

अन् आश्चर्य हें कीं रडतां रडतांच तशा स्थितींत तिला झोपेची ग्लानी आली ! नि ती झोंपली......

चांगली तीन तास झोंपली ती. अन् जागी झाली तीही मनाच्या कसल्यातरी समाधानासह. विचारांचं वादळ भावनांचा कल्लोळ - दुःखांचा आक्रोश नि भावी काळची भीषणता - यांपासून तिचं अन्तर अलिप्त झालं जणुं. जीभेनें शरीराला तशीच थकलेल्या मनालाही विश्रांती दिली. शान्त

मनानं अगदीं लहान मूल झोपेंतून उठतांच जसं खुदकन हसतं ना तश्या आनन्दाच्या उल्हासांत ती उठली. तरीही-पण तिला अविनाशाची आठवण झालीच. अन् ती बुझणार तरी कशी म्हणा ? आज चार वर्षांचा मित्र नाहक तोडावा लागला तिला. नव्हे - डोक्यांत राख घालून तोच निघून गेला.

आतां तिला शान्तपणें झाल्या गोष्टी आठवूं लागल्या. तिचं कुठंच कांहीं चुकलं नव्हतं. अविनाशचंच चुकत होतं. ती चूक तिनं दाखवून दिली. साऱ्याच पुरुषी मनाची ती चूक असते. कुठल्याही मुलीबद्दलचा थोडं सां परिचय देखिल त्यांच्या भरमसाट प्रेम शृंगाराला कारणीभूत होतो. पुरुषांच प्रेम कदाचित् स्त्रीवर लवकर बसत असेल. पण स्त्रीयांचं कुठं तसं असते ? अन् नेमकी हीच जाणीव पुरुष विसरतात. वयांत आलेली कुठलीही मुलगी कुणाच्याही डोळ्यांत सहज भरते. पण वयांत आलेला पुरुष तिच्या डोळ्यांत निश्चितच भरावा कशा ?

तिचं मन तिला सांगत होतं ....

तुझं प्रेम शरद्वर आहे. खरंच ! शरद्विषयींचं आकर्षण किती निराळं होतं. त्याला पाहातां क्षणींच तिच्या भावना कश्या घुसळून निघाल्या होत्या ! शरदचंही नव्हतं का असंच झालं ? अेकदमच नि अेकाच वेळी दोघंही कसे अनु-रक्त झाले ? तसं अविनाशचं कुठं होतं ? अविनाशकडं अेक सुहृद अशा अर्थानंच तिनं पाहिलं. त्याच्या वर तिनं कधींच प्रेम केलं नाहीं. प्रेम नव्हतंच तर करणार कुठून ?

श्यामाचा अविनाशशीं स्नेह होता. प्रेम नव्हतं. नव्हतं

तें पाहिल्यापासूनच. स्नेहामुळं ती त्याच्याशीं मनमोकळेपणानें वागली. त्या मनमोकळेपणाचा गैरफायदा अविनाशनें घेतला त्याला ती तरी काय करणार ? ...

प्रेम म्हणजे शारीरिक आकर्षण.स्त्रीपुरुषाचं प्रेम हें असंच असायला हवं. त्यांतच स्त्री पुरुषांचं सुख नि समाधान आहे. मानासिक समाधान कितीही मोठं असलं तरीहि तें आपल्या हातीं असतें. कुठूनही तें शोधून मिळवितां येतं.तसं शारीरिक समाधानाचं नसतं. प्रियकरांशिवाय प्रेयसी नि प्रेयसीशिवाय प्रियकर समाधान पावूं शकत नाहींत. शारीरिक समाधानावर बरंचसं मानासिक समाधान अवलंबून असतं. बुद्धि कितीहि मोठी असली तरीहि तिचं वास्तव्य शरीरांतच असतं. अन् विशेषत: शारीरिक समाधान जर नसेल तर सारीं बाकीचीं समाधानं केवळ व्यर्थच. स्त्रीपुरुषांच जन्मच मुळीं त्यासाठीं. एकमेकांशिवाय एकमेकांना समाधान मिळणेंच कठीण. प्रेमानं तें समाधान मिळतं.अन् हें प्रेम स्नेहाकर्षणावर अवलंबून नसतं. स्नेहाकर्षण असो वा नसो प्रेम स्वतंत्र आहे. तें शारीरिक सुखाचं साधन आहे...

असं श्यामचं स्पष्ट मत होतं. तें समाधान तिला शरदशीं लाभलं. अविनाशमध्यें जर तें दिसलं नाहीं तरीही श्यामाच्या मनांत त्याच्या संबंधींची बरीच जागा होती. तो तिचा जिवाभावाचा स्नेही होता. तो तिला हवा होता कारण हें नातं तिला हवं होतं अविनाशनं डोक्यांत राख घातली म्हणून तिला वाईट वाटलं तें केवळ एवढ्यासाठींच...

अशाप्रकारचे विचार ती कितीवेळ करत बसली असती कोण जाणे. पण —

एकाएकीं तिच्या कानीं करुणरम्य संगीताचं गुंजन कुठून तरी पडलं. किती विलक्षण मोहिनी होती त्या सुरांत ! मनाला वेड लावणारी जादू कांठोकांठ जणू भरली होती त्यांत ! बान्धाला पाणी अडतं तसे तिचे विचार चटकन् थांबले, त्या गोड, करुणरसानं नि सुरानं ओथंबलेल्या संगीताकडं तिचं मन वळलं, तिच्या कानांनीं कानोसा घेतला, ...

जवळच कुठून तरी संगीताचा झरा वाहात असावा, गाणारा पक्षी चिवचिवाट करून डोक्यावरून दूर दूर जावा तो जसा जसा दूर जातो तसतसं त्याचा आवाजही अधीक श्रुतिमनोहर होवून उठतो तसं वाटलं तिला. प्रतिक्षणीं ते सूर दूर दूर जात आहेत नि त्यांच्या बरोबर आपलं मनही तितकंच दूर जातं आहे असं तिला वाटलं ... ती बेभान झाली. राहवेना तिला. ती उठून खोलीबाहेर आली अन् ...

तिचं तिलाच केवढं तरी आश्चर्य वाटलं ! दचकलीच ती ! कारण ...

आजुबाजूला प्रकाशाचं नांवही नव्हतं. काळोख काळोख होतां तो ! रात्रीची ती भर बारा वाजावयाची वेळ ! हॉस्टेलमध्यें अेकही दिवा नव्हता, वातावरणांत कसली तरी स्मशान शांतता हांसत होती. कुठूनही कसलाही आवाज ऐकूं येत नव्हता. अेकादी नदी असावी, शान्त शान्त असावं आजुबाजूला नि मध्येंच एकाद्या माशानें वर येवून पाण्यावर शेपूट आपटावं नि त्याचाच काय तो ‘ डुबुक ! ’ असा प्रतिध्वनी उठावा– तसं त्या काळोखांत

शान्ततेंत ते संगीताचे सूर मध्येंच डोकावत होते. श्यामाला वाटलं आपलं तसंच नव्हतं का अितका वेळ ? मनांतील बाकीच्या साऱ्या विचारांची वरदळ थांबली नव्हती का ? अन् एकाच विचाराचा सूर—अविनाशच्या अविचाराचा अेकच सूर नव्हता का निघत आपल्या मन-वीणेंतून ? '

तिनं आकाशभर पाहिलं ! चान्दण्यानं कसं लुकलुकत होतं तें ! जणूं रजनीनं न्हावून वाळवण्यासाठीं पाठीवर मोकळे सोडलेले काळेभोर केसच चमकत होते. ? अन् केसांची ती चमक किती मनोहर वाटली तिला !

ती मनमोहक तारकांची लुकलुक ... विश्व व्यापून टाकणारी ती स्मशान शांतता - नि स्मशानावर लुकलुकणारी ती सूर - संगीताची धार ...

विचारांनीं जें समाधान लाभलं नव्हतं तिला - तें या दृश्यानं लाभलं. तिनं अंधारांत नेत्र विफारून पाहिलं...

कुठलीतरी पांढरी आकृती पुढं पुढं सरकतांना दिसली तिला. तिच्या मुखांतून संगीताच्या धारा स्रवत होत्या ... ती वळली. खालीं आली तोंच ...

" कौन है ? " भय्याची ती कर्णकटु किंकाळी तिच्या कानीं पडली.

" मै हूं भय्या ! "

" कौन ? श्यामा ?

" हां ! भैय्या ! "

" पागल बन गयी है तूं ? "

" नहीं भैय्या "

" पागल नहीं तो और क्या ? अेक पागल अभी गया - और दुसरी ... "

'कौन पागल भय्या ?'

' वह–अविनाश बाबू–कैसा पागल छोकरा है वह !'

' देख न–अिस अन्धेरी रात मे कहां चल् रहा है किसको मालूम। कितनी बार मैने रोका उसे। कितनी देर तक समझाया। और अखरी धमकाया भी ' मगर...

' क्या कहा उसने ? '

' जबाब भी देने को तय्यार नहीं है वह। क्या हुआ अिसको भगवान जाने...मुझे कहा कीं जो कुछ कहना हो तो प्रिन्सिपॉलको कहो। मुझे रोको मत, छोडो, और मैने पकडा हुआ अपना हात हिसककर वह चला गया...देखो अभी तक चल् रहा है...

' वह गानेवाला अविनाश है ? '

' हां '

' अच्छा भैय्या ! तुम मेरा एक काम करोंगे ?'

' जरूर, क्यों नहीं ? फर्माअिये। '

' बात तो मुष्कील नही है ! प्रिन्सिपॉल को कहना मत, और अविनाश बाबूका पिछा करना, मगर उसके समजमे नही आना चाहिअे ! सबेर मुझको कह देना वह कहां गया था, कितनी देर लगाअी उसने–उतनाही–करोंगे ?'

' हो, हो, अिसमे कौनसी कठीनाअी है ? फिकिर मत करना। मै सबकुछ करूंगा। लेकिन तुम कमरेमे जाकर सो जाओ। पागल मत बनो। '

श्यामा खोलींत परत आली !

अजूनही संगीताचे सूर थांबले नव्हते, पुसट पुसट ऐकूं येतच होते. अन आतांतरी त्यांत सर्वांपेक्षांही गोडी अधिक होती. शोकगीतें आधींच रम्य असतात. अन तीं शोकमग्न मनाला तर त्याहीपेक्षां रम्य भासतात. ..

एक दीर्घ उसासा टाकला तिनं !

ती खोलींत गेली. तों तिनं धाडकन् आपलं अंग बिछान्यावर टाकलं, संचींत अशी थोडावेळ ती बसली. पुन्हां उठली. जागचा दिवा तिनं उजाळला. नि घड्याळाकडे पाहून ती उद्गारली ...

'तीन वाजले तीन'

ती टेबलाजवळ बसली नि पत्र लिहिण्यास... सुरुवात केली तिनं.

× × ×

अविनाश सकाळीं झोपेंतून जागा झाला. तो भय्याच्या ओरडण्यामुळेंच; भय्यानें त्याच्या हातीं पत्र दिल्यावर तो आश्चर्यचकित झाला. त्या भरांतच त्यानं विचारलं,

'किसका खत है भय्या !'

भय्यानें तोंड बन्द केलं,

भैय्या सकाळीं आठं वाजतांच श्यामाकडं आला होता. अविनाश कुठंच थांबला नाहीं. सारखीं बांसरी बाजवीत तो चालला होता. चांगला पांच वाजेपर्यंत भटकला तो. अन् त्यानं जे रस्ते हुडकून काढले ते सारे आडरानांतील होते. भय्याला देखील त्याचा पाठलाग करणं कठीण पडलं. पहांटे पांच वाजतां तो एका दुकानांत

शिरला. नि त्यानं सिगारेट घेतली. ती पेटवून हॉस्टेलपर्यंत तो ती सारखी ओढीत होता, नि मग त्यानें ती टाकून दिली.

भय्यानं श्यामाला अेवढीच हकीकत सांगितली. नंतर तिनं त्याला पत्र दिलं अविनाशला देण्यासाठीं. नि कुणाचं आहे हें न कळवण्यास सांगितलं होतं. अन म्हणूनच भय्या गप्प बसला. त्याला उत्तर कांहींच सुचेना. शेवटीं तो म्हणाला.

"कुछ लिखना हि है बाबू?"

"कुछ लिखा नहीं है अिसी लिये तो पूछ रहा हूँ।"

असं म्हणून त्यानं रागारागानं तें पाकीट फोडलं. भय्या त्याच्याकडे पाहून निघून गेला होता. त्यानं वाचावयास सुरवात केली ...

प्रिय अवी ...

रागावला आहेस ना माझ्यावर! रागाव अवी - खूप रागाव. मी तरी कशी तुझा राग शान्त करणार! अन आतां तूं थोडंच अैकून घेणार आहेस माझं! पण अवी, मला लिहिल्याशिवाय राहवलं नाहीं. अन् म्हणून तुझ्या नव्हे तर माझ्या समाधानासाठींच केवळ लिहीत आहे. माझं पत्र पाहातांच तूं तें केराच्या टोपलींत. फेकून देशील हें मला माहीत आहे. पण

अवी! चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासांत अेकमेकांशीं समरस झालेलें जीव केवळ दोन मिनिटाच्या भांडणांत दुरावूं शकतात का रे! मला डागून तूं निघून गेलास—पण किती वेदना झाल्या त्याच्या मला! अवी। मला वाटलं नव्हतं पुढं मागं तूं माझ्यावर एवढा निष्ठूर होशील असं. खरंच

केवढा निर्दयपणा करीत आहेस तूं अवि ! कुठं रे शिकलास तूं हें !

खरंच अवी ऐकशील का तूं माझं ? तुला दूर जाऊं देण्यांत मला किती यातना सोसाव्या लागत आहेत त्याची कांहींच कशी पर्वा नाहीं तुला ? एवढा अविचार सोडून देखील, देशील का माझ्यासाठीं ? सांग ना ?...

जे मी तुला एकवार सांगितलं तेच मला तुला सांगायचं आहे. तूं रागावूं नकोस माझ्यावर. चिडूंही नकोस. थोडा शांत चित्तानें थोडा तरी विचार करून पाहाशील का ? करच थोडा विचार करच. सारं पूर्वींचं आठव. तुला दिसून येईल कीं आपल्या दोघांत केवळ स्नेहाकर्षणच होतं प्रेमा-मी देखील खूप विचार केला आहे. पण कसं सारं समजावून कर्षण नव्हतं. सांगू तुला ? तुला कसं कळत नाहीं हे ?

शरदशीं मी विवाह करणार आहे. तसं आमचं नुकतंच ठरलं आहे. मग मी कां तुला नकार दिला याचं कारण तुला सांगावसं वाटलं मला. एवढ्याचसाठीं हें पत्र लिहीत आहे.

अवी ? कदाचित तुझं माझ्यावर प्रेम असेल, नाहीं म्हणत नाहीं मी तें. साऱ्या पुरुषांचंच तसं असतं. कुठल्याहि स्त्रीवर थोड्याश्या ओळखीवर ते प्रेम करूं लागतात. त्या बाबतींत तुला मी मुळींच दोष देत नाहीं. दोष देते आहे ते मलाच ! मीच अभागिनी ? ज्या व्यक्तिचं माझ्यावर प्रेम आहे त्या व्यक्तिला माझं प्रेम मला देतां येत नाहीं ! अवी ! खरंच सांगते तुला. मी तुझ्याशीं लग्न केलं असतं. करीनही पण त्यांत दोघांनाही सुख मिळणार नाहीं. तुला कदाचित् मिळेल पण मला तुला सुखी ठेवतां येणार नाहीं. तुझ्या सह-

वासांत माझं मन रमणार नाहीं. अन् असं एकांगी लग्न झालं तर कदाचित् पुढें तुला पश्चाताप करावा लागेल. त्यापेक्षां तो अगोदरच टाळला तर नाहीं का चालणार अवी ? पुन्हां सांगते अवी. गैरसमज तूं करून घेवूं नकोस...

तुला मैत्री नि प्रीति यांतील भेद अजून समजत नाहीं. अनुभवाशिवाय समजणार नाहीं. तो अेक दिवस तुझ्या आयुष्यांत असा येईल कीं त्यादिवशीं तुला प्रेम कशास म्हणतात नि स्नेह कशास म्हणतात हें नक्की उमजेल. उतावीळ होवूं नकोस अवी.

अवी ! माझ्याशीं पूर्वीप्रमाणंच वागशील का ? तसं तूं वागावंस अशी मी इच्छा करूं का अवी ? सांग ना, अवी वागशील का तसं ? तूं मला मागणी घातलीस नि मी नकार दिला ही गोष्ट विसरशील का ? खरंच तुझ्याविषयीं किती भिती वाटत आहे मला ! रागाच्या, मत्सराच्या नि सूडाच्या भरांत तूं काय करशील ते देव जाणे ?

पण काय हे लिहीत आहे मी ! माझा अवी कां असा आहे. नाहीं ! नाहीं ! ! तो माझ्याशीं नीट वागेल. राग जावून त्या जागीं अनुरागाचा रक्तिमा फुलेल. हे चहाच्या कपांतील वादळ शमेल, नि माझा अवी - मला मिळेल. होय ना अवी ?......

तुझीच अवी !...

श्यामा...

टर्रर्र...टर्रर्र...

त्यानं पत्र फाडून टाकलं. बेशरम! पाजी !! हलकट !!!

नाहीं नाहीं त्या शिव्यांची रांगोळी त्याच्या ओठांनीं काढली, रागानं तो लाल झाला. ओट थरथरूं लागले. त्याचे. डोळ्यांत रक्त उतरलं नि एकवार त्यानं खालचा ओठ दातांनीं चावला.

विश्वासघात—नि पुन्हां साळसूदपणाच्या वर ह्या डागण्या काय? श्यामा...हा अविनाश काय बोळ्यानं दूध पिणारा असंच समज तूं!'

सूडाच्या धुंदींत त्यानंही पत्र लिहिलें...

...मला तोडून टाकतांनाच तुला लाज वाटावयास हवी होती! आतां काय त्याचं? गुन्हेगाराला गुन्ह्याबद्दल क्षमा मिळत नसते, हें ध्यानीं असेलच तुझ्या!!

—अविनाश

• • •

— ४ —

'श्यामा! श्यामा!!'

असं ओरडतच शरदनं दार ठोठावलं! किती घाओी होती त्या शब्दांत. चटकन श्यामा उठली नि तिनं दार उघडतांच कुतुहलानं विचारलं.

'काय झालं, शरद?'

तिला बोलावयास अवकाश न देतांच मध्येंच ओरडला. हे बघ ग श्याम!'

अन् त्यानं तिच्यासमोर हातांतील वर्तमानपत्र धर-

लं...नेमकी त्याच दिवसाची गोष्ट ही! भय्या नुकतांच पत्र घेवून निघून गेला होता. श्यामा विचार करीत पहुडली होती. तोंच शरदच्या त्या उतावीळ शंका तिच्या कानीं पडल्या.

त्यानं दाखविलेला भाग श्यामानं वाचावयास सुरवात केली...

...भयंकर अपघात! विचित्र अपघात!! प्रियकराच्या अंगावरून प्रेयसीची मोटार गेली!!!

हा मथळा वाचून श्यामा तर दिग्मूढच झाली. तशाच अवस्थेंत तिनं वाचावयास सुरवात केली...

मथुरा नांवाची एक कॉलेज कुमारी संध्याकाळीं फिरावयास निघाली. फटफटीवरून ती जात होती. फटफटीचा वेग थोडा अनिवारच होता. वेगांत येत असतांनाच नूतन मराठी विद्यालयाच्या वळणावर एक मजुरासारखा दिसणारा बावळट माणूस तिच्यामध्यें आला. दोघांची जोरानें टक्कर झाली. अयाई ग! अशी मथुरेनं किंकाळी फोडून ब्रेक्स दाबले. तरीही व्हावयाचं तेच झालं. खुद्द मथुरेला फारशी इजा झाली नाहीं. पण त्या बावळट घामाजलेल्या नि फाटके वस्त्र परिधान केलेल्या मजुराला चांगलेच लागले. सध्यां दवाखान्यांत अत्यवस्थ आहे तो! विशेष आश्चर्याची गोष्ट ती ही कीं तो मजूर दैववशांत तिचाच प्रियकर 'बाळासाहेब देव' निघाले!...'

पुढं तिच्यानं वाचवेना. वर्तमानपत्र तिनं फेकून दिलं. अन् एकाएकी तिच्या तोंडून उद्गार निघाले...

'काय झालं हें शरद्?'

तिनं शरदकडं पाहिलं. त्याचे नेत्र आंसू वर्षवण्याच्या बेतांत दिसले. मुखावर कसलीतरी चिंता लकलकत होती. अन् भ्रमिष्टासारखं शून्य नजरेनं तो कुणीकडं तरीच पहात होता. तिचे ते उद्‌गार त्याच्या ध्यानींही आले नाहींत. तो आपल्याच विचारांत मग्न होता.

'शरद् ! शरद् !!'

शरदनं चटकन् तिचे दोन्ही हात हातांत घेतले. तिच्या हातांनीं त्यानं आपलं मुख झाकलं नि लहान मुलासारखे अश्रु ढाळूं लागला तो !

तिनं हात सोडवले. त्याचं मस्तक आपल्या छातीशीं कुरवाळलं. नि समजुतीच्या सुरांत तिनं म्हटलं.

'उगी शरद ' असं रडावं का यावेळीं बरं ?'

ती असं म्हणाली खरी पण तिचं रडूं तिलाच अवरेना. तिनं त्याचं मस्तक अधिकच छातीशीं घट्ट धरून ठेवलें.

थोड्या वेळानं शरदच म्हणाला.

'श्यामा ! काय करूं ग मी या वेळीं?'

"चल येतोस का पुण्याला ? आपण जावुं या—चल उठ आतां ! "

"नको श्याम ! मला असंच थोडा वेळ पडूं दे. मी जाईनच पुण्याला. पण तूं कशाला त्रास घेतेस उगाच ? "

'त्रास कसला शरद ? प्रसंगाकडं नको का पाहावयास?'

'श्याम ! मनाची किती मोठी आहेस ग तूं ? कुठून मिळविलीस ही श्रीमंती तूं ? '

'मिळवली असेल कुठून तरी. त्याचं काय आतां ?

पण निघायचं ना पुण्याला ? '

मी अेकटाच जावून येईन श्याम !'

वादविवाद घालण्याच्या मनःस्थितींत दोघंही नव्हती. त्याच्या मनाप्रमाणंच यावेळीं वागलं तर तें ठीक होईल असं श्यामाला वाटलं. शरदची तशीच मनःस्थिती होती.

' बरं शरद ! एकटाच जा तूं पण उठ पाहूं अगोदर. चांगलं तोंड धू. मी चहा करते तोंवर. चहा घेतल्यावर बरं वाटेल तुला. अन् गाडीला देखिल फार वेळ नाहीं आतां.''

' असं म्हणून त्याला तिनें हळूंच उठवलं. तोंड धुण्यास पाणी दिलं नि ती स्वतः चहाच्या तयारीस लागली !

श्यामाच्या म्हणण्याप्रमाणें चहा घेतांच शरदच्या मनाला थोडा आराम वाटला. थोडी हुशारीही पण त्याला आली. अन् तो निघण्याच्या तयारीस लागला.

इकडे बघ ना बाळ जरा. मला ओळखलंस का तूं ? मी शरद तुला भेटावयास आलों आहे. ओळखलंस ना मला ?

बाळनं डोळे किंचित किलकिले केले. ते उघडण्याची त्याची इच्छा होती. दोनतीन वेळां त्यानं अंगांतील सारी शक्ति एकवटली. पण छेः ! डोळ्यांच्या पापण्यावर जणूं कुणी-तरी मणामणाचं ओझं ठेवलं होतं ! डोळे उघडेनात म्हणून त्याची मुद्रा त्रासिक झाली. मुखावर निराशेचा नि श्रमांचा भाव उमटला. मुखांतून एक क्षण सुस्काराही बाहेर पडला. त्या सुस्काऱ्यासरशीं त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूरही ओसंडला नि त्यानं चटकन् तोंड फिरवलं.

त्याची ती दीन दीन वाणी मुद्रा पाहातांच शरदला देखील भडभडून आलं. पण मोठ्या प्रयत्नानं त्यानें आपले

अश्रू रोखले. केवढी जबाबदारी होती त्याच्यावर ! त्याच्या बाजूला मथुरा होती. दुसऱ्या बाजूला बाळची आई इवलंस तोंड करून उभी होती. बाळच्या उशागत त्याची धाकटी बहीण उषा शरद्च्या मुखाकडं टक लावून पाहात होती.... अन् या साऱ्या जणांची तोंडं काळजीनं करपून गेलीं होतीं. लाजेनं शरमेनं—नव्हे अपराधीपणाच्यां जाणीवेनं मथुरेचं मुख तर बघवत नव्हतं. साऱ्यांनीं बाळची आशा सोडली होती. त्या कुटुंबावर हा दुसरा दुर्धर प्रसंग होता ! शांताबाईंचे पती गेल्यापासून दहापंधरा दिवसही झाले नव्हते. नि लगेच दुसरा प्रसंग. पति गेला ! आतां पुत्र चाललेला उघड्या डोळ्यांनीं पाहाण्याचं नशिबीं आलं होतं तिच्या. उषा तर काय ? चौदा पंधरा वर्षांची अल्लड परकरी पोर ! तिला म्हटलं तर समजत होतं म्हटलं तर समजत नव्हतं. त्या बिचारीची अवस्था मोठी कठीण झाली होती ! शांताबाईनें तर ताळतंत्र सोडला. शोकानं पागल होण्याच काय ते त्या राहिल्या होत्या, रडून रडून त्यांचे डोळे मुठीयेवढे सुजले होते. मथुरा तर कुठल्या तोंडानं त्यांची समजूत घालणार ? या साऱ्या परिस्थितीला कारण तर तीच ना ?...

तिनं दोन दिवस कसे घालविले हे तिचं तिलाच माहित. जात्याच मथुराही धीराची मुलगी ! पण तीही हवालदील झाली. शरद येतांच तिला एकदम आधार आल्यासारखा वाटला. तो दृष्टीला पडतांच कांहींशा शोकानं तर कांहींशा सुखानं त्याच्या गळ्याला तिनं मिठी मारली नि फुलून फुलून रडूं लागली.

'मथुरा ! वेड तर नाहीं लागलं तुला ? असं रडत कां बसायचं या वेळीं ? तुझ्यामाझ्याशिवाय कोण आहे अरं

आतां बाळला ? अ  शांताबाईचा चेहरा तरी बघ एकदां ! उषेचे ते चिमणी एवढं केविलवाणं मुख पहा मथुरा. आवर बाई तुझा शोक आवर. सारं दुःख गिळून बाळला उठवलं पाहिजे. होय ना ?'

हे सारं का मथुरेला कळत नव्हतं ? अन् शरद याव-याच्यापूर्वी ती कां तशी वागली नव्हती ? पण...

शरदला पाहातांच इतके दिवस बांधून ठेवलेले अश्रु आतां बांध फोडून वाहूं लागले होते. बिचारीला रडायला देखील दोन दिवसांत फुरसत नव्हती. आपलं दुःख कुणा-लातरी सांगून हृदयाचं ओझं हलकं करण्यास शोधूनही जागा नव्हती. ती मिळतांच तिचे अश्रु नाहीं सांडणार तर आणखी काय होणार ?

बाळ चांगलाच अत्यावस्थ होता. त्याच्या डोक्याला जबरदस्त मार बसला होता. शिवाय हातापायांनाही बरेंच लागले होते. अंगांतील बरंसचं रक्त वाहून गेलं होतं. त्यामुळें त्याच्या अंगांत बिलकूल शक्ति उरली नव्हती.

शरद आला ! नि साऱ्यांचा आधार आला ! निव-लेल्या आशेला पुन्हां उकळी फुटली. मुखावरील चिंतेचं पटल किंचित् घसरलं ! शरद देखील चांगला डॉक्टरच होता. अश्या वेळीं कसं वागावं नि काय करावं हें त्याला चांगलंच कळत होतं. आल्याबरोबर त्यानं सर्वांना धीर दिला. बाळ जरी सिरीयस होता तरीहि त्यानं खूपच आशा निर्माण केली. क्षणभर साऱ्यांच्या मनांत विश्वास आला. शरदकडे पाहून शांताबाओींनेंही आपले अश्रु आवरले. उशाला तर देव भेटल्यासारखा वाटला. सारी जणं आपापली

दुःख विसरली नि बाळच्या शुश्रूसेस लागली.

रक्तस्रावाचा अतिरेक झाला आहे. अन् त्यामुळें सारी गात्रं शिथिल झालीं आहेत!' आज डॉक्टर आले नि त्यांनीं हे सांगितलें. शरद डॉक्टरांच्या मुखाकडे पाहात होता. डॉक्टरांच्या बोलण्याचा आशय त्याला पुरतेपणीं समजला.

"तर मग डॉक्टर, उशीर कशाला? मी देतों ना रक्त" डॉक्रांनीं त्याच्याकडे पाहिलें.

चला!' एवढेंच ते म्हणाले. शरद मोठ्या आनंदानं रक्त द्यावयास तयार झाला होता. टेस्टसाठीं डॉक्टरांनीं त्याचं रक्त काढून तपासलं. पण परिक्षेंत तो नापास ठरला! आतांपर्यंत त्याला कधीं न होणारं दुःख झालं. त्याचा चेहेरा पार बदलला. आपल्या जीवलग मित्राच्या उपयोगीचं रक्त आपल्यांत नाहीं ही खोच त्याच्या मनाला बोंचली.

खिन्नपणें सिगार त्यानं पेटविली नि तो रुमच्या बाहेर आला. बाहेर मथुरा उभीच होती. त्यांचा तो भकास चेहेरा पाहातांच तिच्या काळजांतून कळ उठली. धस्स! झालं तिला.

'शरदच लक्षच नव्हतं तिच्याकडे. सिगारचे मोट-मोटे झुरके घेत तो दोनतीन पावलं चालला असेल नसेल तोंच.

'शरद' अशी गदगदलेल्या सुरांची हांक त्याच्या कानीं आली. मथुरेची ती हांक होती. तिचं काळीज धाड् धाड् उडत होतं. भितीनं तिच्या डोळ्यांत शून्यतेचं पाणी खेळत होतं. शरद तिच्या जवळ गेला. प्रेमभरानं तिच्या पाठीवरून हात फिरवून तो उद्गारला.

‘ मथुरा ? ’

मथुरेनं त्याच्या छातीस मान टेकली. नि अस्पष्ट स्वरांत ती म्हणाली—

‘ काय सांगितलं डॉक्टरांनीं ? ’

‘ मला नापास केलं त्यांनीं ! ’

‘ म्हणजे काय शरद ? ’

‘ बाळला रक्त हवंय पण माझं चालत नाहीं. काय करावं मथुरा ? डॉक्टर नि मी दोघंही चिंतेंत आहोंत. रक्त तर लवकर मिळावयास हवं...’

‘ माझं रक्त नक्की येअील शरद. चल मी देते. ’

‘ खरंच ? ’

‘ होय शरद ! आधीं चल मला घेवून. ’

मथुरेचं रक्त बरोबर आलं. मथुरेनं तें दिलंही.

‘ एक मोठी काळजी संपली शरदराव ! कसं ? ’ डॉक्टर उद्गारले.

’ होय डॉक्टर ! मलाही तसंच वाटतं. बाळ आतां हमखास वांचेल ! ’

त्यांचें हें उत्तर ऐकून रक्त दिलेल्या मथुरेला कोण आनंद झाला ! रक्त गेल्यामुळें तिच्या हलक झालेल्या शरीरांत नव चैतन्याचं वारं खेळूं लागलं कीं काय असा भास झाला तिला. तिचा थकवा पार गेला. काळजी संपली. नवीन आशेची उषा तिच्या मनाच्या पूर्वभागीं फुलली.

दोनच दिवसांत इष्ट तो परिणाम झाला. ज्या नयनीवर दोनदोन मणाचं ओझं ठेवल्यासारखं वाटत होतं, ते

डोळे बाळला हळूं हळूं उघडतां येवूं लागले. त्यानं डोळे उघडून एकवार पाहिलं...

त्याच्या उशाशीं शरद होता. माथ्याशीं शांताबाई होती. पायथ्याशीं मथुरा होती.

‘ आतां बरं वाटतंय ना बाळ ? ’ शरदनं विचारलं !

बाळनं मान हलवली, त्याच्या त्या खूप दिवसांनीं उमललेल्या कमळांत किती आनंद, केवढी आशा ओथंबली होती ! शांताबाईचं उर भरून आलं. मथुरेचं मुख कमल फुलून उठलं. नि शरदनं समाधानाचा सुस्कारा सोडला !

बाळची प्रकृती झपाट्यानं सुधारली, जखमा भरून येवूं लागल्या· थोडं थोडं तो बोलूं, चालूं नि खावूंही लागला. त्यामुळं इतके दिवस स्मशानवत् झालेल्या घरांत आनंदाचा झरा झुळूझुळू वाहूं लागला. स्मशानांत बावरणाऱ्या भुतांची माणसं बनली. घराची बाग पुन्हां डोलानं हसूं लागली, बागेतील फुलं जोमानं फुलूं लागली. पहाटेचाच काय पण भर दिवसाचा वाराही गार, रम्य नि सुखकारक वाहूं लागला. परवांच ह्या घरांत एक मृत्यू घडला हें सांगून देखिल खरं वाटलं नसतं. आतां शांताबाई तर काय ! विचारावयासच नको ?

त्या दिवशीं घरांत कुणीच नव्हतं. मथुरा उषेला घेऊन घरीं गेली होती. बाळला झोंप लागली होती. शांताबाईनं स्वयंपाक-घर नुकतंच आवरलं होतं. नि शरद देखील कसलं तरी पुस्तक वाचीत आरामखुर्चींत पहुडला होता. शांताबाई त्याच्याकडे आल्या नि म्हणाल्या.

‘ काय वाचन चाललंय ? ’

‘ कांहींतरी करमणूक करायला हवी ना ? ’

‘ एवढंच ना, मला वाटलं कीं अभ्यास चाललाय. ’

‘ पुस्तकं नकोत का अभ्यासाला ? ती तर तिकडेच आहेत. अन् हो बरी आठवण झाली ! आमची परीक्षा जवळच आलीय. शिवाय बाळची प्रकृतीही सुधारली आहे. तेव्हां म्हटलं ...

‘ अंऽहं शरद ! ते नाहीं चालायचं. मी तुम्हांला इतक्यांत नाहीं जाऊं देणार. आणखीन एक काम करवून घ्यावयाचं आहे मला. ’

‘ तें कुठलं बुवा ! ’

‘ जसा तुम्ही माझा बाळ घरांत आणलांत तसंच एकदां माणसांत आणून द्या कीं त्याला. ’ .

‘ म्हणजे ? ’

‘ इश्श ! त्यांत काय समजायंचंय ? ’

‘ खरंच मी नाहीं समजलों. सांगा ना जरा स्पष्ट. ’

‘ बाळचं लग्न करून टाकायचंय मला. ’

‘ हांतिच्या ! मग त्यासाठीं मी कशाला ? ’

‘ आमचं कुणाचंच ऐकणार नाहीं तो. ऐकेल तर तें तुमचंच. मला बाई त्याची भारी भीति वाटते. त्याचा स्वभाव ठाऊकच आहे तुम्हांला. मला तें तुमचें राजकारण का समाजकारण नीटसं कळत नाहीं म्हणा. पण त्या गोष्टींचं वेड आहे बाळला. नि त्यांत तो केव्हां नि कसा वाहावेल देव जाणे. आतां घरांत मी न् उषाच काय ती ! अन ही स्वारी सारखी पळत्याच्या मागं लागली तर कसं व्हावयाचं

आमचं ? अन म्हणून म्हणते एकदां लग्न करून टाकलं की येईल ताळ्यावर तो. जीवनांत स्थैर्य येण्याच्या कामीं लग्नाचा फार उपयोग होतो ? तेव्हां मी म्हणते ...

बरं पण, मुलगी वगैरे तर ठेवलीय पाहून ?"

'मुलगी असल्यावर कश्याला पाहायला हवी. - मथुरा त्याला आवडते. नि मलाही आवडते. तेव्हां दोघांच्या संमतीनं द्यावा बार उडवून म्हणते. अशा वेळीं तुम्ही जावून कसं भागेल ? मला का जमणार आहेत साऱ्या गोष्टी ?'

'अन् मला तरी कशावरून जमतील ?"

'हुशार माणसाला सारंच जमतं हो ? नाहीं कां ? ते असो. पण पाहाणार ना प्रयत्न करून ? अगदीं माझ्यासाठीं ! माझ्याकडे पहा - नि नाहीं म्हणूं नका.'

'त्याला एवढा आर्जव कशाला हवा ? मी का कुणी परका आहे होय ? करीन हं - मला जेवढं करतां येईल तेवढं करीन. पण बाळची प्रकृती तरी सुधारूं द्याल कीं नाहीं'

'सावकाश का होईना ! चालेल ... पण एकदां करून टाका म्हणजे झालें !

'थोडं फिरून येवूं, शरद येतोस ? बाळनं शरदला विचारलं.

'हो ! जावूं या कीं मलाही बसून बसून कंटाळा आला आहे बघ.'

असं म्हणत शरद उठला. त्यानं आळोखे पिळोखे दिले तोंच शांताबाई तिथं आल्या नि म्हणाल्या.

' कुठं निघालात ?'

' फिरायला जावूं म्हणतो आअी !'

' कशाला जावूं म्हणतोस फिरायला ? तुझी प्रकृती अजून बरी नाहीं. अशक्तपणा आहे अजून. नाहीं गेलं तर चालणार नाहीं ?'

' पण आई ! शरदसारखा डॉक्टर बरोबर असल्यावर कसली आली आहे भीति ?

होय ना रे शरद् ?'

' बरं बुआ !' शरदकडं दृष्टी टाकून बाळला उद्देशून त्या म्हणाल्या. ' एकदां ठरवलंस म्हणजे ठरवलंस, तूं. त्यांत आमचं थोडंच ऐकणार आहेस ? बर, पण चहा तरी घेऊन जा. ठेवलाय मी !'

चहा घेण्यासाठीं दोघांना थांबावं लागलंय, बाळची प्रकृती चांगलीच सुधारली होती. म्हणून शरदनंही फिरायला जायचं कबूल केलं. आज हवाही मोठी मजेदार पडली होती. सूर्याची संध्यासमयाचीं किरणं गालांतील गालांत हंसत बागडत होती. किंचित मंदपणें वाहाणारा गार वारा दुपारीं तापलेल्या पृथ्वीस नि दिवसाच्या श्रमांनीं त्रस्त झालेल्या किरणांस सुखवीत होता. आकाशभर निळा रंग पसरला होता. जणुं लाजऱ्या कुमारिकेचें प्रतिकच तो ? अन् पृथ्वीवर मुग्ध हास्याचा रंग खुलला होता. जणुं लाजऱ्या कुमारिकेचें प्रतिकच तो ?

ही सारी मजा दोन्ही डोळ्यांनीं यथेच्छ लुटित शरद नि बाळ एका खडकावर बसले होते. संध्या समयच तो ! कुठले विचार कुणाच्या डोक्यांत उत्पन्न करील हे कुणी सांगावं ? म्हणतात ना - प्रत्येक सुंदर चित्राच्या पाठीमागें

तत्वज्ञानाचीं अक्षरं हीं लकाकत असतात. बाळच्या मनांत तर विचारांची गर्दी उठली. सुंदर वस्तूंचं दर्शन विचारशक्तीची प्रेरणा होवून बसतं तें असे.

हा सुंदर देखावा पाहून असं वाटतं शरद...बाळनं सुरवात केली. त्याला राहावेना. मनांत विचार चालले असावेत निजिवाचा जिवलग जवळ असावा कीं मनुष्याचे आंतील विचार बाहेर पडल्याशिवाय राहात नाहींत. फार वेळ त्यांना मनांतील कोंदट वातावरणाचं वास्तव्य सहन नाहीं होत. बिचारा बाळ तरी कसा अपवाद ठरणार या नियमाला? त्यानं सुरवात केली....

'हा सुंदर देखावा पाहिला कीं मनांत विचार येतो कीं हा निसर्ग किती स्वार्थी आहे! सकाळ संध्याकाळ हा हंसतो, नटतो, मुरडतो! कविला आपल्या अप्रतिम सौंदर्यानं काव्य देतो. चित्रकाराला स्फूर्ती देतो. स्वतःची स्तुती स्तोत्रही गातो. निसर्ग सुखी आहे. आनंदी आहे. सुंदरही आहे! पण आपला हा स्वार्थीपणा सोडून दिला यानं तर काय बहाल होईल? आपलं सौंदर्य आपलं हास्य नि आपलं सुख जर गरीबांच्या दारांत यानं ओतलं तर त्या जीवांच्या जीवनांत केवढी क्रांती होईल? मला नेहमीं असं वाटतं कीं जोपर्यंत सौंदर्याचा उपयोग गरीब जीवनाचं सौंदर्य खुलवण्यांत होत नाहीं जोपर्यंत जगांतील सुखाचं गरीबांच्या जीवनांत सुखाची फुलवात फुलवत नाहीं, जोपर्यंत निसर्गाच्या आनंदानं गरीबांच्या जीवनांतील आनंदाची दिवाळी साजरी होत नाहीं तोपर्यंत साऱ्या गोष्टी व्यर्थ आहेत. जगांतील दुःख हींच जगांतील सुखं होवून बसतील नाहींतर.. तुला नाहीं असं वाटत शरद?'

'किती वेडा आहेस बाळ तूं! सौंदर्य, सुख किंवा

दुःख का कुणाच्या उपयोगासाठीं निर्माण होतात? फूल फुलतें. जग हसतं का कुणाच्या उपयोगासाठीं? छेः! बाळ!! त्याचं अस्तिव निर्हेतुक असतं. मानव जन्माला का आला? नि कुठं जाणार तो? या वावटळींत किती जणांचे तरी प्राण गुदमरून गेले आहेत. अन् ते उगीचच्या उगाचंच हें? वास्तविक जगच निर्हेतुक आहे तर मग मानवाचं जीवन कुठून सहेतुक असेल? सुख निर्हेतुक आहे खरं. पण त्याच्या अंगीं जीवनाची बाग फुलवण्याचं सामर्थ्य असतं. तें कुणाला दिसतं. नि कुणाला दिसत नाहीं. ज्यांच्या अंगीं तें सौख्य शोधून घेण्याची शक्ति असते असे लोक तें कुठूनही शोधून घेतात नि आपल्या जविनांचं पोळं बांधतात. तूं जे गरीब! गरीब! म्हणून ओरडतोस तेच मला आश्चर्य वाटतं! त्यांना कां कुणी सांगितलं होतं कीं तुम्ही गरीब व्हा म्हणून? मनुष्याच्या अंगीं असते तें! स्वतःच्या मूर्खपणानं नि कमकुवतपणानं माणसं गरीब होतात नि श्रीमंतही होतात. म्हणतात ना, कीं स्वतःच माणूस स्वतःचा शत्रू नि मित्र होवूं शकतो. त्यांतलिच हा प्रकार समजलं??

'हें सारं तत्त्वज्ञानांत ठीक आहे शरद ...'

'पण थांब बाळ! तत्त्वज्ञानाची आई म्हणजे व्यवहारच ना? व्यवहाराच्या अंगांतून तत्त्वज्ञानाचं रोपटं फुलतं हे ठाऊक आहे ना तुला?'

'चांगल ठाऊक आहे ... पण ...'

'पण बिण कांहीं नाहीं बाळ! जीं माणसं अपरिपक्व स्थितींत जगाचं कोडं सोडविण्यासाठीं जीवाचा उगीच आटापिटा करतात त्यांचं हें असंच व्हावयाचं. तुझंच उदा-

हरण घे ना ...मोठा कळवळा आला तुला गरीबांचा. समाजाचा मोठा उमाळा आला. नि त्याचा उद्धार करण्यासाठीं तूं आपल्या लंगड्या पावलावर थांबू लागलास. गांधींचे कित्ते गिरवूं लागलास. माझं असं म्हणणं नाहीं कीं तूं ह्या गोष्टी करूं नयेस. पण मला नेहमीं तुझ्यासारख्या कोवळ्या जीवाची फार भीति वाटते. आज हिंदुस्थानांतील लोकांचे चुकतं तें इथंच. कुठल्याही चळवळींत जावून पहा - लहान लहान कोवळ्या बालकांचेच अस्तित्व अधिक असतं. तिथें त्यांचें हेंच वय असं असतं कीं ज्यावेळीं ते स्वतःचा थोडा विकास करूं शकतील. पण नेमकी हीच वेळ त्यांच्या लक्षांत येत नाहीं. फूल फुलावयाच्या आंतच तें कामी येतं. धड ते देवाच्याही शिरावर शोभत नाहीं कीं त्याच्या निर्माल्यांतून सुगंधही येत नाही. त्यापेक्षां फुलाला नीट उमलूं द्यावं माणसानं. आपल्या जीवनाचा पूर्ण विकास करून घ्यावा. पूर्ण शक्ति मिळवावी नि मग धडधाकट शरीरानं, उघड्या डोळ्यानं नि विचाराच्या सुसंबद्धतेनं राजकारणांत पडावं. त्यांत यशही अधिक असतं अन् फायदेही खूप. उगीच उठेल त्यानं हें करावयाचें काम नव्हे. समाज समाज तर काय ? माणसांनींच बनलेला असतो ना ? अन एक पूर्ण प्रकाशमान दिवा हजारों दिव्यांना उजळतो ना ? तसंच आहे हें ! हजारो दिवे आपल्या हातून लागावे असं वाटत असेल तर प्रथम आपला दिवा प्रकाशमान केला पाहिजे.

कुठल्याही देशांत जा नि कुठल्याही थोर पुरुषाचं चारित्र हाताळ, तुला दिसून येईल कीं त्यांनीं समाजसुधारणा आत्मसुधारणेंतून केली. अरे, लोकांनीं आपलं ऐकावं तें कां म्हणून ? आपल्याला तसा अधिकार आहे का ? तरी

आपल्याला प्रतिष्ठा आहे का ? ते नको का आणायला अगोदर ? ह्या नसत्या फंदांत बाळपणापासून पडण्याऐवजी जर तूं ही आत्मप्रतिष्ठा अगोदर मिळवली असतीस तर—...?'

दम घेण्यासाठीं शरद् थांबला. आपण फारच वेळ बोललों असं वाटलं त्याला. अन त्यानं बाळकडं पाहिलं...

'बस्स ! झालं !!' त्यानं हंसून विचारलं. एवढं लांब लेक्चर एखाद्या सभेपुढं दिलं असतंस तर त्याचा उपयोग तरी झाला असता. माझ्यासारख्या पाषाणापुढं काय तुझ्या लेक्चरची मात ? पण तुला एवढंच सांगतो, शरद, स्वतः ज्यांना कांहीं करायला नको त्यांचं हें स्वकृतीचं चांगलं समर्थन आहे ! अरे ! प्रतिष्ठा—अधिकार का मिळवून येणाऱ्या गोष्टी आहेत ? कुणाच्या अंगीं त्या असतील वा नसतील. त्याचा कार्याशी निकटचा संबंध असो वा दूरचा. पण त्या नसल्या म्हणून का कार्याची अडवणूक करणार ? कार्यात रत् झालों कीं आपोआप साऱ्या गोष्टी अंगीं येतील माझा तरी त्यावर विश्वास आहे. कुणाला पटो वा न पटो, मला काय त्याची पर्वा ? मला माझा मार्ग पटतो. नि परवडतोही, खरंच शरद तूं तरी काय केलंस रे एवढं शिकून ?

'मला जास्त त्याविषयीं बोलतां येत नाहीं बाळ. पण तुझ्या ध्यानांत तें लवकरच येईल.'

शरद नि बाळ एकांतांत एकत्र आले कीं त्यांचा असा वादविवाद हटकून चाले. वादविवादांतून निष्पन्न कांहीं होतच नसे कधीं. दोघांनाही शेवटीं त्याचा त्रास होई. तसा आतां शरदला आला नि विषय डावळण्याच्या दृष्टीनं तो म्हणाला.

' हें आपलं नेहमीं सारखंच झालं नाहीं ? फुकटची उरःस्फोड करण्याची संवय आपली केव्हां जाईल कुणास ठाऊक ? कुठल्याच बाबतींत कुणाचंच ऐकायचं नाहीं हा तर तुझा बाणा आहेच. त्यामुळें तुझ्या आईला किती दु.ख होत असतं त्याची जाणीव आहे का तुला ? परवां अण्णांच्या वेळेसही तूं नव्हतास इथं ? असा कसा वेडेपणा केलास रे ? निदान अश्यावेळीं तरी घरीं यावयाचं होतंस तूं ? '

' सारं खरं शरद ! मलाही तसंच वाटलं. पण लाखो लोक माझ्या आजुबाजूला पटापट मरत असतांना एका माणसासाठीं त्यांना सोडणं माझ्या जीवावर आलं बघ ?

' पण आईचा कधीं विचार तर करावयाचा होता ? '

' अन केला नाहीं असं कां वाटतं तुला ? '

' हो ! कारण केला असतास तर धांवतं आला असतास तूं ' कांहींतरीच तुझं आपलं ! तुझं माझं कधी जमलंय शरद ? '

' कधीं नाहीं तें आज तरी जमेल का ? खरंच, बाळ ! आज ऐकशील का तूं माझी एक गोष्ट ? '

' सांग कीं ! '

' पण आधीं हो म्हण ! '

' बरं बुवा हो, हो ? '

' ऐक तर आतां. तुझ्या आईची इच्छा तूं लग्न करून टाकावंस अशी आहे. बिचारीच्या दुःखाला पारावार नाहीं. कधीं तूं तिचं म्हणणंही ऐकलं नाहींस. तेव्हां निदान एवढं तरी बाळ ? '

' पण लग्नामुळें माझ्या ध्येयाला अडथळा आला तर..? '

'मुळींच नाहीं येणार ? एकतर करावयाची गोष्ट कुठल्याही परिस्थितींत करण्याची तुझी संवय आहे. अन् दुसरी कीं मथुराही तुला कधींच बांधून ठेवणार नाहीं.'

'सारं खरं, पण कशासाठीं हें ?

'केवळ तुझ्या आईच्या समाधानासाठीं ? '

'मथुरेची आहे कां संमती ? '

'हें काय विचारतोस बाळ ! अरे ? तिला तर लग्न हवंच हव. अश्या संधीची ती कशी चातकासारखी वाट पाहात आहे ! '

'खरंच शरद मलाही असंच वाटतं. मथुरेचा सहवास कायमचा घडला तर माझ्या कार्यांत मला केवढी स्फूर्ती येईल म्हणून सांगू ! स्त्रीही काय प्रेरक असते हें मथु-रेच्या बाबतींत तर पूर्णांशानं खरं आहे. माझ्याही मनांत कित्येक दिवसापूर्वींपासूनच ही गोष्ट होती, करशील का तूं मध्यस्ती ! '

बाळचें हें उद्‌गार ऐकून शरदला अपरिमित आनंद झाला ! सहजासहजीं तो कबूल होईल असं वाटलंच नव्हतं मुळीं त्याला. पण केव्हां केव्हां असंही घडतं. जी गोष्ट अशक्य ! अशक्य !! ' म्हणून वारंवार घोकली जाते तीच गोष्ट सहजासहजीं शक्य होते ! अन अशी ती गोष्ट घडली कीं मनाला केवढा तरी आनंद होतो ! तोच आनंद त्या वेळीं शरदला झाला. नि आनंदाच्या भरांत त्यानं बाळला मिठी मारून म्हटलं......

'बाळ ! '

त्याच्या त्या एकाक्षरी उद्गारांत काय नव्हते ! हृदयां-

तला आनंद नयनांतील उत्साह सारा सारा सांकाळला होता!

स्टेशनवर गाडी येतांच एका डब्यांतून हांक आली. ' शरद ' अन् लागलीच कुणीतरी हातरुमाल जोरजोरानं हलवला.

गाडीबरोबर शरद धांवत सुटला. त्याच्या पाठीमागें मथुराही पळाली. बाळ गडबडीनं चालतच जावयास निघाला तिकडे.

गाडी थांबली ! त्यासरसीं श्यामानं स्टेशनवर उडीच टाकली. धांवत जवळ आलेला शरद तें पाहून म्हणाला..

' सावकाश श्याम पडशील ना ? '

प्रवासाच्या शीणाचं नांव देखिल तिच्या चेहऱ्यावर नव्हतं ! अन् दिसणार तरी कसं ? शरदची "Start immediately, Bal wishes to marry Mathura." ही तार पडतांच ती स्टेशनवर घसरली होती नि गाडीभर विचार करीत होती.. कितीतरी गोष्टी तिनं ठरविल्या होत्या.

मथुरा कशी दिसेल ? सुंदर असेल का ती ? ती भेटतांच आपण कसं बोलायचं तिच्याशीं ? कशी थट्टा करावयाची ? ती लाजतां क्षणींच कसं हंसायचं ? .. बाळ.. शरदचा मित्र शरदसारखाच असेल का ! आजारांत कसा खराब झाला असेल तो ? ' अपघातांत तर बाई एका माणसाच्या जीवांत जीव आला. नाहीं भावूजी ? ' अशी प्राण घेवूं थट्टा-केल्यावर तो रागावेल आपल्यावर नि तो रागावला म्हणजे 'इतकं कांहीं नको रागावयाला हं ! मथुरा काढील कीं राग!' असं मथुरेसमक्ष बोलतांच तीहि कशी लाजेनं फुलून जाईल.

मथुरेच्या शेजारीं बाळ बसला होता. शरद मोटार चालवीत होता. श्यामानं बाळकडं नि मथुरेकडं पहात म्हटलं.

' मी कशाला तुला इथं बसवलं तें आहे माहीत ? मथुरेनं प्रश्नार्थक दृष्टीनें तिच्याकडं पाहिलं नुसतं.

' सांगूं ? '

' हूं ! '

' तुमचा जोडा कसा दिसतोय ते बघण्यासाठीं ! '

' इश्श ! हें ग काय ? जराशीं चिडलीस मथुरा ' आल्यापासून पाहातेय तुझी आपली सारखी थट्टाच चाललीय !

' उगीच नाहीं करीत मी मथुरा ! जवळच्या माणसाकडं पहातरी खरं एकदां ! बघ कशा गुदगुल्या होत आहेत त्या ! '

बाळ खरंच गालांतील गालांत हंसत होता. तो चटकन म्हणाला.

' तुमच्या थट्टेला मी हंसत नव्हतो वहिनी ! '

' मग कशाला ? '

' आमच्या शरदची चांगलीच फजिती होणार म्हणून ! '

' तशी कशी ? '

' नाहीं तर काय ? नाकांपेक्षां मोठी नथ त्यानं घातलीय. असं नाहीं वाटतं तुम्हाला ? '

डाव उलटलेला पाहातांच मथुरेची कळी खुलली. जिरवलीन पण एका माणसाची ! अशा अर्थानं ती श्यामाकड बघूं लागली. पण श्यामा कसली वस्ताद ती चटकन् बोलून गेली.

' कांहीं खोटं नाहीं भावूजी हें! खूप त्रास देणार आहे मी शरदला. पण त्याला अपघातांत नाहीं सांपडू देणार हं!'

बाळ पुढं कांहींतरी बोलणार तोंच कर... र्रर्र... आवाज झाला. नि मोटार थांबली. घर आलं होतं. सारेजण खालीं उतरले. दारांत सर्वांचं स्वागत करायला हंसतमुखानं शांताबाई उभ्या होत्या. जवळच उभी असलेली उषा श्यामाला पाहून ओरडली...

' वहिनी आली ग, आई!'

अन तिनं चटकन जावून श्यामाचा हात धरला. श्यामानं तिची हनुवटी उचलून शांताबाईकडं पाहात म्हटलं...

' मोठी गोड आहे हं तुमची उषा!'

' हो? अगदीं तुझ्यासारखीच!' शांताबाईनं प्रत्युत्तर दिलं!

ह्यावेळीं मात्र श्यामा गप्प बसली.

' बोल कीं कांहींतरी! तिला मुग्ध पाहून मुद्दाम खवचटपणें बाळ म्हणाला.

' कस बोलूं! ह्या तर सासूबाइ कीं!' श्यामा वर मान करून हंसत म्हणाली, नि चटकन वर निघून गेली. तरीहीपण शांताबाईचे पुढील शब्द तिच्या कानीं आलेच.

' शरद भाग्यवान आहे हं!'

' ते शब्द ऐकतांच कां कोण तिच्या सर्वांगावर कसल्तरी रोमांच उभे राहिले. तशीच ती शरदच्या मागोमाग त्याच्यासाठीं म्हणून असलेल्या खोलींत शिरली. खोलीच्या दाराचा आवाज होतांच शरदनं वळून मागें पाहिलें. नि

त्याच्या चेहऱ्यावर तिला पाहतांच स्मित झळकलें. चटकन त्यानं तिला जवळ ओढलं.

' अंऽहं शरद ! ' स्वतःला सोडवून घेत ती उद्गारली. पाहिल ना कुणीतरी ? '

' पाहूं दे ग ? किती दिवसांनीं भेटत आहों आपण त्याचं कांहींच नाहीं का ? '

' मी किनइ खूप खूप रागावले आहे तुझ्यावर ? ' चटकन त्यानं तिला पुन्हां जवळ ओढलं नि तिच्या ओठावर दीर्घकाळ आपले ओठ टेकून तो पुटपुटला.

' अस्सं जवळ घेवून चुंबन नाहीं घेतलं म्हणूनच ना ? '

' अंऽहं ? '

' मग ? '

' एकही गोड पत्र पाठविलं नाहींस म्हणून. '

' एवढंच ना, त्याची आतां भरपाई. '

' असं म्हणून त्यानं एक दोन तीन चार वेळां तिच्या अधरावर, गालावर, कपोलावर चुंबनांचा वर्षाव केला. त्यानं तिला छातीशीं घट्ट आवळून धरलं होतं. ती गुदमरली नि अस्पष्ट स्वरांत म्हणाली.

' पुरे ! पुरे ! ! शरद पुरे ना...

' इतक्यांत उषा शरद ! शरद ! म्हणून ओरडत दाराशीं आली. म्हणूनच केवळ नाइलाजानं श्यामाची सुटका झाली.

' काय उषा ? ' शरदनं तिला विचारलं.

'तुला किनई भाऊ, आई बोलावतेय '

'आलों हं, कपडे काढून आलों असं सांग जा. जा.'

शरदचे कपडे काढण्यांत श्यामानं मदत केली. तिनेंही स्वतःचे कपडे बदलले, नि दोघंही ती आंत गेली !

—८—

'शेवटीं रजिस्टर मॅरेजचं ठरलं वाटतं.'

'त्यांत वाअीट तें काय झालं श्यामा ?'

'दोघांचंही दोघांवर प्रेम होतं ना रे ?'

'हो ? कां !'

मग त्यांनीं लग्नाची भानगड केली कशाला ?'

'नको लग्न करायला त्यांनीं ?'

'काय जरूर आहे रे ? मला तर मुळीं लग्नाची जरूरीच वाटत नाहीं. आतां तूं नि मीच घे ना. आपलं कुठं झालंय लग्न ? तरीही आपण लग्न झाल्यासारखंच नाहीं का वागत ? '

' आपली गोष्ट निराळी आहे श्यामा ? '

' कसली आलीय निराळी ? '

' नाहीं का ? आपण स्वतंत्र आहोंत. काय वाटेल तें करावयास मुखत्यार आहोंत. तसं कुठं आहे बाळचं ? त्याच्या

मनांत खूप असेल. पण आईचं नको कां कांहींतरी मानायला ? ती जुन्या वळणाची. तिला कसं आवडेल हें ?'

'पण तुला आवडतं ना शरद ?'

'हो ?'

'मग आपण एकत्र केव्हांपासून रहावयाचं ?'

'तुला पहिल्याच दिवशीं सांगितलं कीं मी !'

'मला नेहमीं वाटतं कीं आपण जवळ असून किती एकमेकांच्या लांब आहोंत ! तुला नाहीं असं वाटत शरद ? कां अजून एकांताची संवय गेली नाहीं तुझी ?'

'हें कुणी सांगितलं तुला ?'

'आक्कांनी ! एके दिवशीं त्या मला काय म्हणाल्या आहे माहीत ?'

'काय ?'

'आमच्या बाळबरोबर शरदचही लग्न लावावं असं फार आहे माझ्या मनांत.'

'काय उत्तर दिलंस तूं त्यांना'

'मी विचारलं कां इतकी घाई का त्याच्या लग्नाची? चांगलं शिकूं द्या, स्वतंत्र होऊं द्या. मग......'त्या लागलीच म्हणाल्या 'तसं नाहीं श्याम, तुला किनई शरदचं कांहीं माहिती नाहीं अजून—अन् त्यांनीं सारं सांगितलं मला.'

'काय सांगितलं ? मला तरी कळूं दे ना ?'

'जसं कांहीं माहीतच नाहीं—नाहीं ?...

ती एक मोठी कथाच आहे. शरदला सावत्र आई होती. सावत्र आई असणं म्हणजे जगांतील साऱ्या सुखा-

नंदाला मुकणंच ! अन् त्यांतून पुन्हां वडिल निघाले बाईलवेडे! मग काय विचारतां ? गृहसौख्य कशाला म्हणतात ? माया कशाला म्हणतात हें बिचाऱ्याला जन्माच्या पांच वर्षांपासून नाहींसं झालं. फार हालांत दिवस काढले त्यानें ! वडिल त्याच्या-बरोबर शिवीशिवाय अक्षर बोलत नसत. कधीं मायेचा-प्रेमाचा सहानुभूतीचा तर राहूं द्याच पण नुसता कुशालीचा प्रश्न देखील त्यांच्या तोंडांतून बाहेर पडत नसे. शरद मोठा सहन-शीलतेचा माणूस. इतकं झालं तरी घरांत अवाक्षर देखील काढीत नसे तो ! कसा बसा मॅट्रिक झाला तो नि पुढील उच्च शिक्षणाच्या निमित्तानं पुण्याला आला. नि आतांच सारं शिक्षणं स्कॉलरशिपवर त्यानं केलं. ह्या साऱ्या परिस्थितीचा परिणाम म्हणजे तो एकलकोंडा बनला. खोलीच्या बाहेर तो निघत नसे कधीं. कुठं जात नसे, येत नसे. बाळ नि शरद एका ठिकाणींच लहानपणीं खेळले, बागडले. बाळच्या शिक्षणासाठीं आक्कांनी बिऱ्हाड पुण्याला केलं. नि तेव्हांपासून बाळच्या घरींच शरद राहूं लागला ... एवढं सांगून आक्का ह्मणाल्या होत्या. ...

'म्हणून म्हणते श्यामा ! त्याचं लग्न झालं कीं त्याला प्रेमाचं माणूस मिळेल. त्याच्या स्वभावांतील एकलकोंडेपणा जाईल. माणसांत येईल जरा तो ! म्हणून तर त्याच्या लग्नाची एवढी घाई चाललीय ...

एवढं सांगून तिनं शरदला विचारलं -

'खरंच का रे शरद हें ? '

' आक्का काय खोटं सांगेल तुला ? '

'पण मला तर तूं एकलकोंडा दिसलाच नाहींस कधीं.'

‘ तुझ्या दर्शनामुळं पार बदललोय मी श्याम ! ’

‘ इश्श ! पुन्हां आलास तूं मूळ पदावर ! ’

‘ खरंच श्यामा ! तूं जर माझ्या आयुष्यांत दिसली नसतीस तर कदाचित् हा शरद प्रेम शून्यतेनें वेडा झाला असता. त्याच्या जीवनाचा साहारा झाला असता ! तो जगांतून उठला असता. नि कदाचित ... कदाचित ... उगीच नाहीं आक्का मला भाग्यवान् म्हणत त्या !

‘ पण असं कसं रे ? आईबापांनीं त्यानंतर तुला बोलावलं देखील नाहीं ?

‘ कश्याला उगीच त्या गोष्टी श्याम ? त्यांचं पत्र देखिल एवढेंच नव्हे तर एक बोटभर चिठ्ठी देखिल नाहीं आली आजपावेतों ! मला ही तेंच हवं होतं म्हणा ’

बोलतां बोलतां सहज गोष्टी निघाल्या होत्या. आक्कांनीं शरदची बरीच माहिती श्यामाला दिली. त्याचा परिणाम हितकरच झाला ! श्यामा शरदवर दुप्पट माया करूं लागली. पंधरा सोळा वर्षे ज्याच्या आयुष्यांत उन्हाळ्याशिवाय दुसरा ऋतु उगवला नाहीं अश्या माणसाच्या जीवनांत करपून गेलेली बाग आपल्याला हंसवायला मिळणार म्हणून तिला केवढा आनंद झाला ! तिचं सोनं कसास लागलं होतं ! तिचं नाणं परिस्थितींत खण खण वाजत राहिलं होतं. त्याच्या कर्तृत्वाविषयीं एक प्रकारचा अभिमान तिच्या मनांत दाटून आला, नि पूर्वीपेक्षांही दसपट वेगानं श्यामाचं मन शरदकडं धावूं लागलं.

सहज तिनंही आतां विषय काढला तोच शरदजवळ ! तिचं मन भरून आलं नि ती म्हणाली.

'शरद ! किती हाल झालेत रे तुझे ? यापुढं मी मात्र नाहीं हं हाल करणार तुझे ! माझ्या शरदला मी फुलासारखं झेलीन. होय ना राजा ?'

तिचा तो लडिवाळपणा पाहून शरदला हसूं आलं

'कां हसतोस ?' तिनं विचारलं.

'आज बरीच लाडांत आलीय स्वारी...'

'हो ! तुझे नाहीं लाड करावयाचे तर कुणाचे शरद?'

'लाडावलेली माणसं बिघडतात म्हणे ?'

'बिघडून जायला माझा शरद काय असा तसा आहे ?'

'मग कसा आहे ?'

'किती हुशार, बुद्धिमान डॉक्टर आहे तो ! नाहीं?'

'छे:! मुळींच नाहीं ! बाहेर डॉक्टर असलो—खूप हुषार असलो—तरीही श्याम तुझ्यासमोर मला एक पोरच असल्यासारखं वाटतं. अन् तसं झाल्याशिवाय तुला तरी कसे माझे लाड पुरवतां येणार ?'

'खरंच माझं छकुलं तें ? अश्शी उराशीं बसूं का घेऊन या माझ्या बाळाला ! असं म्हणून खरंच तिनं शरदला जवळ ओढून घेतलं. त्याचं मस्तक उराशीं धरून तिनं कवटाळलं.

'थोड्या वेळानं ती उद्गारली.'

'शरद '

'काय श्याम ?' विसांवलेलं मन वर करीत तो म्हणाला.

'आपण एकत्र राहू या का शरद? म्हणजे दररोज असं एकमेकांच्या कुशींत राहातां येईल, कसं शरद?'

' मलाही तसंच वाटतंय श्याम? आतां या एकट्या जीवाचा मनस्वी कंटाळा आलाय बघ मला.'

' कां येणार नाहीं? पण यापुढं आतां दोघांनींही एकट राहायचं नाहीं हं! कलकत्त्याला गेल्याबरोबर प्रथम खोली पाहू या आपण एक. नि राहू या एकत्र, चालेला ना?'

' ते सारं खरं, पण सोडणार ना मला आतां !'

' कां ? '

' झोंप यावयास लागलीय ग ! '

' मग झोंप कीं इथंच आज.'

' इथंच ? '

' हो ? इथंच अगदीं माझ्या कुशींत ! झोंप ना ! '

तिनं त्याला कुशींत ओढलं नि लहान मुलाला जसं थोपटतात ना तसं ती थोपटूं लागली त्याला ! तिच्या कुशींत मुकाटपणें शरद डोळे झांकून पडला होता ! थोड्याच वेळांत तो झोंपी गेला ! त्याच्या केसांसी खेळतां खेळतां तें तिच्या ध्यानीं आलं.

' झोपलं माझं गुणाचं बाळ ! ' असं उद्गारून तिनं त्याच्या विशाल कपोलाचं चुंबन घेतलं, नि तिनंही डोळे मिटले !

* * *

' आक्का ! ' मथुरेनं हाक मारली.

स्वयंपाक घरांत आक्का कांहींतरी करीत होत्या. हातां-

तील काम तसंच टाकून त्या म्हणाल्या.

‘ ये बाळ मथुरा. इकडे आंत ये ! ’

‘ काय बाळ ? ’ आक्कानं विचारलं. मथुरेनं खालीं मान घातली. पायाच्या बोटांनीं ती जमीन कुरतडूं लागली.

‘बोल ना मथुरा ! लाजतेस काय ? वेडी ! रे वेडी !! ’ आक्का हंसल्या.

मथुरेनं उषेला डवचलं. उषा चटकन म्हणाली.

‘ मी सांगूं आई ?’

‘ तुला ग काय माहित लबाडे !’

‘ ताईनंच सांगितलं मला.’

‘ सांग बघूं !’

‘ तिला किनई लग्नच करायचं नाहीं म्हणे !

आक्कांना परमावधीचं आश्चर्य वाटलं ! वाङ्गनिश्चय झाला. आतां काय तीं नांवेंच नोंदविण्याची राहिलीं होतीं. असं असतांना हें काय ?

कातर स्वरांत नि शक्य तितक्या शांत सुरांत त्यांनी विचारलं.

‘ होय ग मथुरा ?’

बऱ्याच वेळानं मथुरेनं मान हालविली.

‘ पण कां तें तरी सांगशील ?’

‘ आई ?’ मध्येंच उषा म्हणाली ‘ ती म्हणते कीं श्यामाताईचं नि आपलं लग्न एकदम व्हावं !’

‘ अस्सं होय ?’ ‘ सुटले बाई संकटांतून ! ’ असा उसासा टाकला अक्कांनी नि त्या उषाला म्हणाल्या.

‘ श्यामाताईला आण बरं बोलवून !’

उषा गेल्यावर मथुरेच्या जवळ जाऊन अक्का म्हणाल्या.

‘ किती घाबरले होते मथुरा मी ! आतां श्यामा आल्यावर तूं घाल तिची समजूत नि कर तयार तिला कसं !

इतक्यांत श्यामा आलीच. तिला पाहातांच आक्का म्हणाल्या.

‘ श्याम ही बघ मथुरा काय म्हणते ती !’

‘ काय ग ?’ असं विचारून तिनं मथुरेला बाहेर आणलं, नि आपल्या खोलींत नेलं.

‘ काय ग मथुरा श्यामानं विचारलं.

‘ श्याम ? ’

तिच्या चेहऱ्याकडं निरखून पाहात मथुरेनं लडिवाळपणें तिचे हात हातांत घेवून ते सस्नेह चुरीत म्हटलें.

‘ श्याम ! माझं एक मागणं आहे. करशील पुरं ? ’

‘ लग्नांत जावई रुसून बसतात हो ! ’

‘ तूं अशी थट्टाच करणार कां श्याम ? ’ ती अगदीं काकुळतीला आल्यासारखी दिसली. तिच्या नजरेस कसलं तरी विचित्र गांभीर्य चमकलं. तिचे ते भावनाकूल नयन पाहातांच श्यामानं थट्टा करायचं नाहीं असं ठरवून टाकलं !

‘ नाहीं हं ! पुन्हां नाहीं करणार थट्टा ! सांग आतां मथुरा ? ’

‘ एकदम बोलायला भीति वाटते ग ! सांगूं की नको असं होतंय सारखं ! ’

‘ मथुरा असं काय बरं करावं माणसानं ? तूं मला

एवढ्यासाठींच बोलावून आणलंस होय ? '

' अशी रागावूं नकोस श्यामा ! ती बाब तशीच आहे महत्त्वाची ! '

' सांग तर मग लवकर ! काय हवंय तुला ? '

' वचन ! '

' माझ्यापासून ? '

' हो ! '

' कसलं ? '

' ते मग ! पण आधीं मी मागेन तें देईन असं वचन दे ! दे ना श्याम ! दे ना !! '

' भारीच बाई तुझं ? बरं आतां तरी सांगशील ? '

' तूं नि मी एकदम विवाह करून टाकायचा ! '

' काय म्हणालीस ? '

' मला वाटलंच तें ! बघ केवढी दचकलीस तूं. उगीच नाहीं वचन घेतलं मी श्याम ?

तशी तूं लबाड आहेस ग ! पण मला नव्हतं वाटलं असा वेडेपणा करशीलसं ? '

' ह्यांत कसला वेडेपणा श्याम ? '

' हा भलताच हट्ट नाहीं का मथुरा ? '

' भलताच कसा ग ? वर्षानं नाहींतरी तेंच करणारं कीं तूं ! जें वर्षांनीं करायचं तेंच आतां ...'

पण मथुरा ... ' शरदला विचारलं का तूं ? '

' शरद काय माझ्या बाहेर जाईल श्याम ? पण, तूं होय म्हण ना श्याम ... म्हण ना होय '

‘ मथुरा ! ’

‘ अऽहं श्यामा ! कांहीं ऐकणार नाहीं तुझं मी ! तसं वचनही दिलं आहेस तूं ! दिलेलं वचन कां मोडणार तूं !

‘ कशी वेडी आहेस ग तूं ’

‘ असूं दे पण कबूल ना ? ’

‘ कबूल ! आतां तरी झालं ? ’

‘ श्याम् ! श्याम् !! एकाएकीं तरळत्या नजरेनं ती म्हणाली. केवढा आनंद झालाय मला आज ! ’

असं म्हणून तिनं श्यामाच्या गळ्यांत हात टाकला नि चटकन् तिच्या गालाचं चुंबन घेतलं ! ’

‘ हें ग काय मथुरा ! ’

हे शब्द श्यामा बोलायच्या आंत ती हरिणीसारखी चटकन पळाली !

‘ काय भाबडी पोर आहे ही ! ’

तिच्याकडे सकौतुक पहात श्यामा उद्गारली !

अन एकाच वेळीं नि एकाच दिवशीं दोन रजिस्टर मॅरेजेस झाली ! ’

* * *

मथुरा, उषा, बाळ नि शांतीअक्का सारीच पोहों-चवण्यास आली होती स्टेशनवर. लग्नानंतर चार दोन दिवस राहून श्यामा नि शरद पुन्हां कलकत्त्यास निघाली होती. श्यामाला ज्या दिवशीं मथुरेनं पाहिलं त्या दिवसापासून मथुरेच्या मनांत श्यामाबद्दल एक प्रकारचं अकृत्रिम स्नेहा-कर्षण उत्पन्न झालं होतं. सारखं तिच्याजवळ असावं. दिवस-

भर तिच्याशीं बोलावं. तिला हसवावं खूप खूप. तसंच रड-वावं देखिल. क्षणभराची देखील तिला सोडूं नये. उसन्त मिळूं देऊं नये. असं वाटत होतं तिला. अन तशी ती वागलीही. श्यामालाही मथुरेचा चांगलाच लळा लागला. होतील तितके क्षण त्यांनीं एकत्र घालविले. करतां येईल तितकी थट्टामस्करी दोघींनींही दोघींचीही करून घेतली. पोटभर हंसल्या त्या. श्यामा जशी कविकल्पनेहून कांकणभर जास्तच लावण्यवती होती तशीच तिच्या सहवासांतही तिच्या वाणींतही अमीप सौंदर्य सांठवलं होतं. त्या दहा बारा दिवसांत मथुरा नि श्यामा अगदीं एकमेकांच्या झाल्या होत्या अन आतां तर विरहाचा क्षण...

दोघींच्या मनांत कसं चुकल्या चुकल्या सारखं वाटे. एकमेकींना पहातांच एकमेकींचीं हृदयं उगीचच भरून येत. खूप बोलावसं वाटे, खूप हंसावसं वाटे, पण तोंडांतून अक्षरही फुटत नसे. 'श्यामा!' एवढींच हांक मथुरा मारी.

' मथुरा !' ह्यापेक्षां श्यामाही जास्त बोलली नाहीं.

पण......पण......

जायच्यावेळीं त्या कोंडलेल्या आसवांचा उद्वेग झाला.

'श्यामा ! ' मथुरा तिच्याकडे पहात म्हणाली. ' आतां तर तूं जाणार ?'

' नको का जायला मथुरा ? '

' तें सारं खरं ! बुद्धीला पटतं, पण भावनेला नाहीं ग ! '

' मला कां कमी वाईट वाटतंय मथुरा ! पण हाही प्रसंग येणार ना केव्हांतरी ? तुला मी दिवसां आड पत्र

पाठवित जाईन. मग तर झालं ? ’

‘ खरंच कां हें ? ’

अगदीं खरं, मथुरा ! ’

जें काय शेवटीं त्या दोघी बोलल्या तें एवढंच. अन् स्टेशनवर जाईपर्यंत दोघीही दोघींच्या डोळ्यांत कांहींतरी पाहात नि माना फिरवीत ! अगदीं थेट गाडी सुटेपर्यंत असंच चाललं होतं. शरद नि बाळ मात्र सारखे बोलत होते. हंसत होते, पण त्यांच्याही मनांत कसली तरी हुरहुर दाटतच होती ! पण पुन्हां पुन्हां त्यांचींही मनं भरूनच येत होतीं !

गाडी सुटतांना कुणीच बोललं नाहीं. शांताआक्काच शेवटीं म्हणाल्या,

‘ जपून रहा हं दोघंजण, प्रकृतीला जपा, भांडत बसूं नका ! अन् बर का श्याम ! माझ्या शरदला तुझ्या स्वाधीन केलाय मी ! त्याला जप, तूंही जपून रहा अन् पत्र मात्र सारखी पाठवा हं... ’

गाडी हालली !

गाडीकडे पहात कितीतरी वेळ मथुरा नि बाळ उभी होती ? अन् श्याम नि शरदही त्यांच्याकडे पाहून रुमाल हलवीत होती.

बाळ नि मथुरा दिसेनासी झाल्यावरच त्यांनीं तोंडं फिरविलीं. उन्हाची किंचित जादा धग भासत होती. म्हणून शरदन खिडकी ओढून घेतली. नि श्यामाजवळ बसतां बसतां तो उद्‌गारला.

‘ हे दहाबारा दिवस कसे भुरकन् उडून गेले नाहीं ! कळलं सुद्धां नाहीं मला !’

‘ आतां यापुढील दिवसही असेच गेले तर काय मजा होईल शरद !’

‘ अन् जाणारच ते, खात्री आहे माझी ! तुझा प्रेमळ सहवास–गोड गोड सूराचे बोलणं नि ..’

‘ पुरे हो !’

चटकन ती म्हणाली...‘ आज स्तुति करावयाचं ठरवलयं वाटतं ?’

‘ त्याला ठरवायला कशाला हवं श्याम ? तुला पाहिलं कीं...’

‘ हं...हं... कळलं मला ! पण ..’

‘ पण काय श्याम ?’

‘ मला बाई भीति वाटते फार ?’

‘ माझी ? ’

‘ कुणाची ते मला नाहीं रे सांगता येत. पण कसली तरी हुरहुर लागलीयमनाला. चैनच पडत नाहीं बघ. अन् विषेशतः’

‘ विशेषतः काय ? ’

‘ त्या दिवशीं मथुरेला पाहिल्यापासून तरी.’

‘ त्या दिवशीं म्हणजे ? ’

‘ लग्न झाल्या दुसऱ्या दिवशीं...’

‘ काय पाहिलंस तूं ! ’

‘ लग्न व्हावयाच्या आधीं मथुरा किती आनंदली होती. जणुं तिला अस्मान ठेगणं झालं होतं ! किती हंसायची ती ? कसं लाडे लाडे बोलायची. किती अल्लडपणा करायची? ‘श्याम ! ’ असं कारण नसतांनाच हांक मारायची नि उगीचच

मनांतल्या मनांत हंसायची. कारण विचारलं तर मी नाहीं जा!' असं म्हणून पळून जायची! तिच्या नसनसांतून अल्लडपणा जणूं कांठोकाठ भरभरून वहात होता. तिचे डोळे किती स्वप्नाळू तरळ भासत होते! हृदय जणूं अनेक सुखांच्या मनोराज्यांनीं नि कल्पना तरंगांनीं भरून आलं होतं! एकही क्षण ती एका ठिकाणीं बसत नव्हती. माझ्याजवळ दोन मिनिट बसत असे. हंसत बसे. 'कंटाळा आला बाई!' असं म्हणून पुन्हां उठे खालीं बागेंत थांबे. पूर्ण उमललेलीं अर्धीं कच्चीच ती फुलें खुडे नि क्षणांतच त्यांचाही कंटाळा आला कीं टाकून देई. नि उषेला घेवून गप्पा मारी. तिला चिडवी. हंसवी. रडवी पण याचाही तिला कंटाळा येई क्षणांतच! ही तिची अस्थिर वृत्ती, तो बालिशपणा, तो अल्लडपणा! किती मन-मोहक दिसे श्याम...पण...'

'पण काय? अशी थांबलीस कां तूं?'

'पण...पण...पण लग्न झालं, रजिस्टर झालं - नि दुसऱ्याच दिवशीं तो लडिवाळपणा - तो थिल्लरपणा कसा नि कुठें गडप झाला कुणास ठाऊक! एकाएकींच बदल झाला तिच्यांत. अन् त्याचंच मला केव्हांतरी आश्चर्य वाटतंय! आश्चर्य कसलं तें! धक्काच म्हण तो - ती फारशी बोलेनाशी झाली. खेळेनाशी झाली. माझ्याशीं बोलतांना तिला केवढा आनंद होत असे - पण त्या दिवसापासून त्यांतही तिला राम वाटेना. एक क्षणही जिचं पाऊल स्थिरावत नसे ती तासनतास कुठं तरी आढ्याला दृष्टी लावून बसत असे. अतिशय समाधानानं असं होत असेल म्हणावं तर तिच्या चेहऱ्यावरून तेहि दिसत नसे. किंचित् दुर्मुखलेली दिसे ती! 'अशी कां बसलीस ग' मी विचारलं कीं 'कुठें?

काय ? कधीं ? चल ग ! तुझं आपलं कांहींतरीच ! ' अश्यारीतीनें उडवून देत असे - अन् तेव्हांपासून माझ्या मनाला एक भयानक भीति वाटूं लागली आहे शरद ! खरंच शरद तुला उलगडेल का हें कोडें ? '

खिडकीच्या एका फटींतून उन्हाची एक बारीकशी झुळूक याच वेळीं नेमकी श्यामाच्या गालावर पडली ! तिला त्याची कांहींच कल्पना नव्हती ! बोलण्याच्या नादांतच ती गुंगली होती. तन्मयतेनं अगदीं मनापासून ती बोलत होती ! त्यामुळें तिचे डोळे भावनाकूल झाले होते ! एक प्रकारचं स्थिर सौंदर्य अगोदरच सुंदर लालसर असलेल्या तिच्या नयनांत खेळूं लागलं होतं ! त्या उन्हाच्या तिडीकेनं तर कडे-लोट केला. तिच्या गुलाबी गालावर कुणीतरी तांबड्या रंगाचा भडक शिडकाव केल्यासारखा वाटत होतं. अगो-दरच ती विलक्षण सुंदर ? अन् त्यांतून ह्यावेळीं तरी एक असह्य सौंदर्य तिच्या मुखावर विलसत होतं. शरद हें सारं पाहात होता. तो एकदम तिच्या प्रश्नाला बगल देऊन म्हणाला.

' श्याम ! किती विलक्षण सुंदर आहेस ग तूं ! केवढा अभिमान वाटतोय मला ! '

' खरंच ! ' ती बोलून गेली ?

' होय ! तुझ्या इतकं सौंदर्य लाखांत नाहीं. क्वचित आढळेल श्याम. मला किनई ... '

' मग घे ना मला उराशीं ... किती त्रासलेय रे मी '

' चटकन् शरदनं तिला जवळ ओढलं ! तिनं त्याच्या गळ्यांत हात अडकवले ! कसल्या तरी विव्हल नजरेनं तिनं

त्याच्याकडं पाहिलं ! त्याच्या छातीवर हळुवारपणें मान टेकवली. हळूंच त्यानं तिची हनुवट वर उचलली. श्याम ! ' अशी त्याची जीभ पुटपुटली, नि क्षणांतच ... चार ओटांचे हितगूज सुरू झालें ?

श्यामानं आणखीनच आपली मान पुढं सरकवली अन् त्या सुखाची परमावधी असह्य झाली तिला म्हणूनच कीं काय तिनं आपले डोळे शांतपणें मिटून घेतले.

● ● ●

— ६ —

To love and to be the beloved. केवढा निरागस नि नितांत आनंद असतो ह्यांत !

प्रीति केवढी अजब चीज आहे ही ! प्रीतिची पांखर कुणावर बसेल नि कुणावरील उडेल हें कांहीं कुणी सांगावं ? कुणाला का कधीं कळलंय ?झोंपेंतून उठल्याबरोबर एकाद्याच्या कुठून तरी संगीताचे मुग्ध श्रुतिमनोहर सूर कानीं पडावे म्हणजे तो जसा मोहून जातो—त्याला कळत नाहीं कीं हे सूर कुठून येतात ? कसे येतात ? अन् इतकी गोडी कां आहे यांत ? त्याला एवढंच कळत कीं सूर कल्पनेहून मोहक आहेत. दिलखेचक आहेत ! अन् वेड्यासारखा ऐकतही बसतो! प्रीतीचंही तसंच आहे ! ती कुठून येते ? केव्हां येते ? ती कां येते ? हे जरी नाहीं कळलं तरीही मनुष्य वेडा बनतो. पागल बनतो ! प्रीतीच्या सुरांत वाहून जातो. त्याला ती हवी हवीशी वाटते!

तो तिच्या मागें धांवतो, पळतो नि अखेरीस निराशेनं उरी फुटून मरतो ! अन् मजा ती अशी कीं त्यांतच त्याला आनंद वाटतो ! किल्ली फिरवतांच निर्जीव रेकॉर्डस्मधून नाले कां सजीव सुधारस सबैनें ? प्रीतीच्या जाणीवेनं अकस्मात जाणीवेनं झोपलेलं मन जाग होतं नि धडपडत सारंसारं विवेकाच्या पारध्यापासून आपला बचाव व्हावं म्हणून तें दूर दूर पळतं. बेलगामी होतं तें ? लगाम असणार कुठून ? शरीराचा व्यापार ज्या किल्लीमुळें चालतो ती मनाची स्प्रिंगच तुटलेली असते ना ?

हो ! असंच असतं !!

मन...मन ज्याला म्हणतात तें प्रीतीच्या सावकाराकडं गहाण पडतें ! तें कसं पडतं ? नि कां पडते ? तसें पडावं कां न पडावं ? हें माणसाला केव्हांच समजत नाहीं ! पण आपलं मन ठिकाणावर नाहीं एवढीच एक जाणीव मात्र त्याला झाल्याशिवाय राहात नाहीं. त्यामुळें त्याला चैन पडत नाहीं. अन मग.. सेनापती नसलेलें सैन्य जसं कधीं उधळतं रणांगणाला पाठ दाखवून जीव घेवून पळत सुटतं तसं केव्हां केव्हां जीव तळहातावर घेवून शत्रूसैन्यावर त्वेशानं तुटून पडतं...तसं मन हरवलेल्या माणसाचं होतं ..

प्रेम ही मनाची विकृति आहे ! असं असूनही तें हवंस वाटतें ! त्याच्याशिवाय जीवन असह्य असह्य होतं ? कधीं निराशप्रेम उदात्त बनतं. तर कधीं हीन होतं...

पण...पण......

कोणी कांहीं का म्हणेना, ज्या प्रेमाचं स्वरूप हीन बनतं, ज्याच्या निराशेमुळें प्रेमाच्या भावना सूडांत सामील

होतात, तें प्रेम नव्हे! तो मानसिक संताप आहे! प्रेमापोटीं हा संताप कधींच नसतो! प्रेमामुळें माणूस निराश बनत असेल, बेचिराख होत असेल पण...पण...आपल्या प्राणप्रिय प्रीतीवर तो कधींच घाव घालीत नाहीं. उलट प्रेमामुळें येणाऱ्या संकटांना तो प्रेमाची कसोटी मानतो? कसोटींत तो उतरतोच असं नाहीं. पण उतरला तरी त्याची त्याला फिकीर नसते? प्रेमाच्या दिव्य स्वरुपामुळें त्याच्या मनाला तो एक निरागत नि नितांत आनंद होतो त्यांतच तो समाधान तरी मानतो एक...किंवा स्वतःला नालायक समजून जीवनांतून उठून तरी जातो हें दुसरं—पण सूड

छे!

पण हें का अविनाशला सांगून कळण्यासारखं होतं!..

तो एकच जाणत होता. कीं श्यामानं आपल्याशीं द्रोह केला. विश्वासघात केला. आपल्या सुखाचं— कसल्या-सुखाची तो अपेक्षा करीत होता कुणास ठाऊक—मातेरं झालं अन् म्हणून आपण त्या व्यक्तीचा सूड घ्यायला हवा. आपल्या शत्रूचा नायनाट करायला हवा.

पण...त्या वेड्या जीवाला हेंच नेमकं कळत नव्हतं कीं, आपल्या प्राणप्रिय वस्तूंचा नाश झालेला आपणांस कधीं पाहावेल का? वास्तविक प्रिय वस्तु. प्रिय माणूस सुखांत असावं. जवळून नाहीं तरी लांबून तरी त्या वस्तूंचं आपल्याला दर्शन व्हावं असंच मनुष्याला वाटूं लागायला पाहिजे.

पण त्याचे डोळे सूडाच्या मार्गानं धगधगत आहेत. ज्याचं रक्त कसल्यातरी मूर्खपणाच्या अत्याचारी भावनेनं उसळत आहे. त्यांची सारासार विवेकबुद्धी त्या सूडाच्या

आगींत नाहीं भस्म झाली तरच तें आश्चर्य ?

हीच एक गोष्ट अशी होती कीं अविनाशच्च प्रेम श्यामावर नाहीं हें सिद्ध करावयास पुरी होती कारण...

प्रीतीचें स्फुलींग जरी शारीरिक तेजोवलयांतून प्रस्फुरित होत असलें तरीही त्याची परिणती विलासांत होत असेल किंवा नसेल पण मानसिक औदार्यांत नि सौंदर्यांत खचित होते !

अविनाशनं त्या दिवसांपासून साधी माणुसकी देखिल सोडली. श्यामाशीं बोलणं तर राहूं देच पण नुसतं पाहणंही त्यानं सोडून दिलं. जसं कांहीं दोघांच जन्मापासून हाडवैरच होतं. अन् खरंच त्यानं वैरच उभं केलं त्या दिवसापासून. श्यामाचा वाढता लौकिक त्याच्या मनाला सहन होईना. कॉलेजांतील मुलं तिच्या सौंदर्याची तारीफ करूं लागले कीं-- ' आग लावा त्या सौंदर्याला ! ' असं ताडकन् उठून तो बोले नि निघून जाई. त्याच्या त्या विचित्र वर्तनाचं आश्चर्य त्याच्या सवंगड्यांना वाटल्याशिवाय राहात नसे. श्यामाबद्दलची एकप्रकारची तिडीक त्याच्या मनांत बसली ! तिच्या विषयींच्या स्तुतीनं तो जळफळून उठे. तिचं बरं त्याला पाहवेना. तिच्याविषयीं कुणी बरं बोललेलं त्याच्यानं साहवेना. अन् म्हणूनच कीं काय तो कुणाच्यासमोर तिची उघड निंदा करूं लागला. डाकीण ! राक्षसी ! हरामखोर !! चांडाळणी !! असल्या सेकोपनांवांचून तो तिच्या विषयीं बोलेना. तिच्या अंगीं असतील नसतील ते सद्गुण दुर्गुणच आहेत असे तो सांगत सुटला. अन् ती कुठं दिसली रे दिसली कीं सरळ शिव्या हांसडूं लागला...

अन आगींत तेल म्हणूनच कीं काय.

श्यामाचं नि शरदचं लग्न झालं !!

बस्स ! आणखीन हवं तें काय होतं ! सूडाच्या दारुनं पेट घेतला. स्फोट झाला ! तो जळफळून उठला ! माझा अपमान करण्यासाठींच, मला चिडाविण्यासाठींच नि आपला पाणउतारा करण्यासाठींच श्यामानं शरदशीं विवाह केला अशी त्यानं मूर्खपणानं स्वतःची समजूत करून घेतली. आणि...

तो पूर्वींचा स्नेह विसरला. आपल्याला कुणीतरी श्यामा नांवाची एक मैत्रीण होती ही कल्पनाच त्याला तिरस्करणीय वाटूं लागली. आपण चार वर्षें तिच्या सहवासांत होतों. कसल्याही प्रकारचा संकोच न बाळगतां तिच्याशीं वागलों होतों. कित्येक प्रसंगीं तिच्याशीं आपण सहकार्य केलें होतें. तिच्याकडे पाहून कित्येक वेळां आपल्या मनांतील स्फूर्ती उसळी खात होती. एक कीं दोन– कितीतरी असे प्रसंग घडले होते कीं त्यांची आठवण विसरून जावी असं म्हटलं तरी तें अशक्य होतं ...

छेः ! छेः !! पूर्वींची ती श्यामा निराळी होती. आतांची श्यामा माझी कुणी नाहीं ! असेल तर ती माझी वैरीण. मित्र ! छेः ! छेः !! अशक्य ! पिवळ्या जर्द नागिणीला कां कुणी जवळ केलंय ? उलट-उलट ती दिसतांक्षणींच ...

असली कसली तरी भयंकर कल्पना त्याच्या मनांत आली कीं तो मोठ्यांदा खदखदून हंसे, नि आपल्याशींच पुटपुटे ...

हो ? हो !! असली नागीण दिसली कीं चेचलीच पाहिजे तिला.

... त्या दिवशींचं डिबेटिंग मोठं रंगांत आलं होतं. कधीं नव्हती ती मजा तिथं ओसंडून वाहात होती. त्यावेळीं खुद्द श्यामाच बोलत होती. विषयही मोठा मजेदार होता ! ' प्रीतीची परिणती ! ' कांहीं म्हणा पण विषय बाकी गोड होता ! अगदीं ठेवणींतला नि तरुण तरुणींच्या मनांतला. साऱ्यांनाच ठाउक होतं कीं हा विषय खचित रंगणार. कारणही तसंच होतं जबरदस्त ! बोलणारे अगदीं वेंचक नि पटींचे निवडले होते ? कॉलेजांतील नांवाजलेला नि प्रसिद्ध असा वक्ता अविनाश तर होताच होता. पण आणखीनही विशेष म्हणजे त्याच्यावर प्रेम करणारी, कॉलेजांत तसं समजलं जात होतं, अशी श्यामा त्याच्या विरुद्ध बाजूनं बोलणार होती. अविनाशचं बोलणं संपलं होतं.' प्रीतीची परिणती मीलनांत असते ! ' हें त्याचं आवडतं वाक्य त्यानं मोठ्या कौशल्यानं गळीं उतरवलं होतं सर्वांच्या. त्याच्यानंतर पाळी आली होती ती श्यामावर ! अन् त्यानं ठसविलेलं हें वाक्य बिनचूक-पणें तिला खोडून टाकावयाचं होतं.

ती बोलत होती....

आपलं कुणावर तर प्रेम आहे नि आपल्यावर कुणाचं तरी प्रेम आहे ही कल्पनाच मुळीं रम्य आहे. गोष्ट कुठलीही असो ती सुंदर असो वा कुरूप असो तिचा आदि नि अंत कळण्याविषयीं प्रत्येकाच्या मनांत अनिवार जिज्ञासा असते. प्रेम तरी ह्यांस अपवाद कसं असेल ? प्रेमाला आदि असतो वा नसतो, त्याला अंत असो वा नसो, पण तें जाणून घेण्याची जिज्ञासा कुणालाच थोपावितां येणार नाहीं. अन विशेषतः ज्यांचं एकमेकांवर प्रेम आहे अश्यांना तर नाहींच नाहीं. अन आपलं प्रेम एकमेकांवर कसं बसलं ? त्यांत रोमान्स काय होता ? तें स्थळ

कसं होतं ? वेळ कशी होती ? त्यावेळीं आपली मनःस्थिती कशी होती नि आपण त्यावेळीं काय बोललों ? प्रेमिकांच्या एकांतवेळीं त्यांची पुनरावृत्ती होत नसेल तरच तें नवल. अन आपल्या प्रेमानं पुढं काय अडथळें येतील ? आपल्या प्रेमाची परिणती कशांत होईल ? ती परस्परांच्या लग्नांत होईल कीं चिरकालच्या हृदयें चिरून टाकणाऱ्या विरहांत होईल ह्याबद्दलची धागधुकही त्यांच्या मनांत जाच-ल्याशिवाय राहात नाहीं. पण...मानवी मन किती चमत्कारीक ? चालू प्रेमाचा आस्वाद उपभोगायचा सोडून देवून भूतकाळाची नि भविष्य काळचीं भूतें पाहूनच माणूस भिउन जातो ! कांहीं कांहीं गोष्टी अश्या असतात कीं त्यांत फार खोल गेलं कीं माणूस गुदमरून जातो.प्रेम हें असंच आहे ! प्रेमाच्या खोलींत डोकावतांच त्याच्या विशाल स्वरूपानं म्हणा नि आंकुचित रूपानं म्हणा माणूस गोंधळून जातो ! अन नेमकं हेंच एक असं कारण आहे कीं त्यामुळें प्रेमाचें स्वरुप विकृत बनतं ! मी म्हणजे हव्यात कश्याला त्या गोष्टी ? प्रेमिकांनीं आपापलं प्रेम पाहायचं सोडून प्रेमिकांच्या गत इतिहासाविषयीं चौकशी करण्याचं काय कारण ? तसंच प्रेमाच्या परिणतीची रुखरुख तरी काय कामाची ? परिणतीच्या जवळ आपण सरकतो त्यावेळीं प्रेमाचा उन्मादही कमी कमी व्हावयास लागून परिणतीच्या वेळीं शून्य होतो ? त्यापेक्षां...मी म्हणते प्रेमाची परिणती एकमेकांच्या मीलनांत न होतां एकमेकांच्या उन्मादांत नि आनंदांत व्हावयास हवी ! प्रम जमल कीं लग्न नि लग्न झालं कीं मूलं नि बाळं हें त्रैराशिक गणित या विषयाइतकंच कंटाळवाणं आहे. जोंपर्यंत ध्येय दूर असतं

तोंपर्यंतच नाहीं का माणूस धांवत ? तें मिळालं कीं त्याची गात्रं शिथील नाहीं का होत ? त्याची ती पूर्वीची धडाडी, धांवाधांवा थांबून एक प्रकारचं शैथिल्य नाहीं का येत त्याला ? कुठल्या गोष्टीच्या अंतांत निष्क्रीयता ही ठेवलेलीच आहे ? त्यांपेक्षां कुठल्याही गोष्टीचा अंत झालाच नाहीं तर...?...

अन् प्रेमाच्या मीलनाची आशा बाळगतां ही एक स्वार्थीच दृष्टी नाहीं का ? स्वार्थहि परवडला असता जर त्यांपासून सौंदर्य लाभलं असतं तर-पण-ज्या परिणतींत सौख्य थंडावतें—आनंदाच्या सागरावरी लाटा ओहोटीच्या मार्गावरील थकल्या भागल्या प्रवासी होतात नि उन्मादाचा अंशन अंश घटत जातो—ती परिणती काय कामाची ? परिणती हा शब्दच असा आहे कीं तो त्या गोष्टीची समाप्तीच दर्शवितो ? अन म्हणून मी म्हणते, प्रेमाला परिणतीच नाहीं. असणं शक्य नाहीं. कारण. कारण......

एकदां जडलेलें प्रेम कमीही होत नाहीं, जास्तीही होत नाहीं ! तें कायम राहतं ! आपण जी प्रेमाची अशी भरती नि ओहोटी पाहातो ती माणसाच्या मनांतून गैरसमजांतूनच उद्‌भवलेली असते. मूळ प्रेम कायमच असतं. म्हणून प्रेमाची परिणती म्हणजे दुप्पट प्रेम—हीच एक प्रेमाची परिणती म्हणतां येईल. प्रेमाची परिणती मिळत नाहीं. कारण मलिन म्हणजे अंत. अन अंत म्हणजे मरण. मीलन संपलं कीं मरण येतं !...'

ती खालीं बसली. ती बसतांच अविनाश एकाएकीं उठला नि अध्यक्षांची परवानगी घेऊन म्हणाला...

आतांच्या वक्त्यांचं बोलणं परिणामकारक झालं

यांत संशयच नाहीं ! पण मी एकच प्रश्न त्यांना विचारणार आहे, त्या प्रश्नाचं उत्तर त्या समाधानकारक देतील अशी आशा आहे...मीलनांतच प्रेमाचा अंत असतो असं आतांच सांगितलं गेलं. ह्यावर त्यांना विचारावयाचं आहे कीं, एके काळीं एकमेकांवर प्रेम करणाऱ्या श्यामा नि अवि· नाश यांच्या प्रेमाचा जो अंत झाला, तो कुठल्या मीलनांतून!

शेम ! शेम !!सारेच ओरडले ! सभागृह दुमदुमून गेलं ! पुढचे शब्द कुणालाच ऐकूं गेले नाहींत !

श्यामाचा तो उघड उघड अपमान होता ! भर सभेंत झालेला अपमान तिला कसा सहन होणार ? ती ताडादिशीं उठून चालती झाली !! ती जातांच अविनाशच्या आजूबाजूची चार टारगट पोरं खदखदून हंसलीही.

श्यामा दरवाज्यांत गेली असेल नसेल तोंच तिला मेलो, मेलो !! अश्या किंकाळ्या ऐकूं आल्या. त्याबरोबर ती झटकन वळली नि स्टेजवर धांवली. स्टेजवरील तें विचित्र दृश्य पाहून तर तिचंच काय पण साऱ्यांचंच रक्त गोठलं...

शरद स्टेजवर गेला होता. त्यानं अविनाशच्या श्रीमुखांत भडकावली होती. रागाच्या सपाट्यांत ती इतकी लागली कीं त्याच्या मुखांतून रक्तस्राव देखील होऊं लागला. पण त्या रक्ताची कुठं पर्वा होती शरदला ! त्याच्या डोळ्यांत खून चढला होता ! एका हातानं त्यानं अविनाशचा गळा पकडला होता नि दुसऱ्या हातानं टेबलावरील फ्लॉवरपॉट उचलण्याच्या बेतांत तो होता. तेवढ्यांत श्यामाचं लक्ष गेलं. ती धांवली. तिनं फ्लॉवरपॉट हिसकाऊन घेतला, एवढंच नव्हे तर अविनाशला सोडवलं.

अनावर झालेल्या शरदला कसं बसं आवरलं नि ती तडक घरीं घेऊन आली त्याला.

स्वतः तर ती चिडलीच होती. झालेला अपमान शल्याप्रमाणं तिला बोचत होता. त्या यातना तर असह्य होत्याच होत्या पण त्या यातना विसरून उफाळलेल्या शरदला शांत करायचं होतं तिला. आल्याबरोबर तिनं दार लावून घेतलं, त्याच्या हातांत कोपऱ्यांतील वेताची काठी दिली नि ती म्हणाली.

'घे ही अन् मार मला. पाहिजे तितकं मार !!

' अव्या ! अव्या !! कुठंय तो !!!'

प्रश्नाला उत्तर न देतांच तो ती कांठी घेऊन दरवाज्या-कडं धांवला. त्याची धांव पहातांच पुन्हां श्यामानं पवित्रा बदलला. ती त्याला तिरासारखी आडवी झाली. तिनं त्याला गच्च पकडलं नि खुर्चींत आणून बसवलं.

...पण त्या अपमानाचा व्हावयाचा तोच परिणाम झाला ! अविनाशचं नि शरदचं उभं वैर तर माजलंच माजलं ! तेवढ्यावरही भागलं नाहीं, तर कॉलेजांत श्यामाचा मनस्वी छळ होवूं लागला. ती दिसली रे दिसली कीं तिची कुटाळकी सुरू होई. कुणीतरी कुणाला-तरी म्हणे—

कायरे ? आपलं मीलन केव्हां झालं बरं ? '
कांहीं दिवसांनीं तर कॉलेजच्या फलकावर विनोदी कविता झळकूं लागल्या. यांत श्यामाची किती भरमसाठ निंदा केलेली असे हें कल्पनेनंच जाणणं बरं !

एके दिवशीं तर कमालच झाली. थट्टेचा अतिरेक

झाला. कुणीतरी हातचलाखीची कमाल केली नि श्यामाच्या डोक्यांत 'मीलन' अशी चिठ्ठी आंकड्याला लावून खोचली. तें तिलाही कळलं नाहीं! तिला सांगायचं धाडसही कुणा मैत्रीणीला झालं नाहीं! अन् सारी मुलं आपल्याकडं पाहून असं कां फिदी फिदी हंसत आहेत त्याचं कोडं उलगडलं नाहीं! शेवटीं स्वतःवर संतापून ती ज्यावेळीं सहज मध्यें आरशासमोर उभी राहिली तेव्हां तिच्या अंगाची नुसती लाही लाही झाली?

ही गोष्ट शरदला कळली असती तर ......

केवढा विचित्र परिणाम झाला असता? कदाचित् अविनाश त्या जगांतून ... अन् म्हणून तिनं ही गोष्ट मोठ्या कौशल्यानं लपविली?

× × × ×

गॅदरिंग म्हणजे कॉलेजची दिवाळी! केवढा उत्साहाचा पूर लोटत असतो यावेळीं. गॅदरिंग कधीं येणार याची चातकासारखी कोण वाट पहात नसतो. अन् तें एकदाचं आलं म्हणजे महिनाभर लांब असलं तरी कॉलेजांत कोण धुमाकूळ माजतो? निवडणुका– अमकं–तमकं– कितीतरी गोष्टी ठरायच्या असतात! अन् त्यासाठीं प्रत्येकजण आपल्या जीवाचा केवढा आटापिटा करीत असतो!

गॅदरिंगमधील सर्वांत मोठी मौज म्हणजे सामने, शर्यती नि सिनेमा! अविनाशला गॅदरिंग म्हणजे तर प्राणाहून प्रिय! तशांत तोच जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आलेला. सर्वांनीं मिळून त्याला हरभऱ्याच्या झाडावर बसवला होता! कधीं नव्हतं तें त्याला मानपद मिळालं होतं. अन्

शिवाय त्याच्या हृदयांतील आनंद ज्या गोष्टींनीं मावेनासा झाला ती गोष्ट म्हणजे यंदाच होणारे बॅडमिंग्टनचे 'आंतर कॉलेजेस' सामने ! कॉलेजांतच नव्हे तर सबंध आंतर कॉलेजेस मधून बॅडमिंग्टन चँपियन निवडून येऊंच येऊं अशी त्यानं जवळ जवळ प्रतिज्ञा केली होती. तो त्याचा हातचा मळ होता ! पण ......

Man proposes and God disposes

म्हणतात तेंही कांहीं खोटं नाहीं !

सिंगल्समध्यें पहिलीच राऊंड त्याची व शरदची आली, नि त्यानं तिथेंच मार खाल्ला !!

'डबल्स' मध्यें त्याची तीच गत झाली !

'मिक्स' मध्यें तर श्यामा नि शरदनं तर त्याचा पार धुव्वा उडवला.

अन् जे प्राइस अविनाशला मिळणार होतं तें शरदलाच मिळालं !

त्याचा सूडाग्नी भडकायला आतां कसचा वेळ लागणार होता ! शरदनं भर सभेंत त्याच्या श्रीमुखांत भडकावून दिली होती ! त्याचं प्राईजच नव्हे तर प्रेयसीही बळकावली होती ! अविनाशच्या डोळ्यांची लाही लाही होत होती ! शरदला खावूं कीं गिळूं असं त्याला होवून गेलं होतं ! एकदां दोनदां तर स्वारी हातीं पिस्तूल घेवून श्यामाच्या दरवाज्यापर्यंत आली होती. पण...

धैर्य ! धैर्य हवंना ?...

परंतु त्याचा धैर्यमेरू खचणार कसा ? मनाशीं तो

म्हणत होता, Never Mind ! A day will come when I will win my prize of love.

करो ? नि त्याची आशा अशीच मोठी करो !!

• • •

— ७ —

Bengal Government,
22-4-49.

To

The Civil Surgeon, Calkatta,
Calkatta.

We are very glad to find an expert Doctor for your help. He is quite as you are needed. You will surely be very glad to see him & we further hope that he will also show a good deal of carrier ! Welcome & make a good use of him.

सिव्हिल सर्जन, कलकत्ता,
यांस :–

तुमच्या मदतीसाठीं एक कुशल डॉक्टर आम्हाला मिळाला म्हणून आम्हांला आनंद होत आहे ! ज्या प्रकारची जरुरी तुम्हांला होती तसाच तो आहे. त्याला पाहातांच तुम्हालाही हर्ष झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आणि तो तुमच्या चांगलाच उपयोगी पडेल असंही आम्हांला वाटतं !

त्याचं स्वागत करून त्याचा चांगला उपयोग करून घ्यालच...

बंगाल प्रांतिक गव्हर्मेंटकडून शिफारसपत्र आलं होतं हें! शरदनं तें वाचलं! त्याला मनस्वी आनंद झाला नि त्यानं बेल वाजवली.

शिपाई आंत आला नि त्याला अदबीनं लवून सलाम करून म्हणाला.

'साब!'

'उसको अंदर ले आव!'

'जी साब!'

शिपाई बाहेर गेला......

शरद एम. एस. फर्स्ट क्लास फर्स्ट आला होता! त्यावेळीं कलकत्त्याला एक मोठी योजना चालू होती! मोठं हॉस्पिटल बांधण्यांत आलं होतं. गोरगरीबांच्या औषधपाण्याची सोय करावी असा त्यांत हेतु होता. हॉस्पिटल मोठं होतं. एवढं मोठं हॉस्पिटल अजूनपर्यंत हिंदुस्थानांत बांधलं गेलं नव्हतं. माफक फी ठेवून गोरगरीबांचे दुसाध्य रोग बरें करण्याच्या स्तुत्य हेतूनं तें उघडलं गेलं असल्यामुळें त्याचा बोलबालाही साऱ्या हिंदुस्थानांत झाला होता. बंगाल गव्हर्मेंटचें नांव त्यामुळें सर्वांच्या मुखीं झालं होतं. पण तरीही बंगाल गव्हर्मेंट मोठ्या काळजींत पडलं होतं..

सारं झालं! योजना केली! अंमलांत आली. इमारत बांधून पूर्ण झाली. एवढंच नव्हे तर हॉस्पिटलचं कामकाजही सुरू करण्याचा दिवस उद्यांवर आला पण..

हॉस्पिटलची जबाबदारी घेण्यालायक डॉक्टर मात्र

शोधून सांपडेना! गव्हर्मेंटमधील साऱ्यांच्या डोक्यांत तोच तो विचार घोळत होता. सारेजण रंजीस झाले होते, हुशार, कामसू, नि चांगला तज्ज्ञ डॉक्टर कांहीं मिळत नव्हता...

एके दिवशीं ही अडचण आपोआप सुटली!

शरद फर्स्ट क्लास फर्स्ट आल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं त्याची ह्या जबाबदार जागेवर नेमणूक झाली!

त्याच्या जीवनांत तो सोन्याचा दिवस ठरला! इतके दिवस मनांत लपवून ठेवलेल्या महत्वाकांक्षेला मूर्त स्वरूप देणारा तो दिवस सुवर्णाक्षरांनीं कां लिहिला जावूं नये? शरदचा आनंद त्याच्या हृदयांत मावत नव्हता! त्याच्या डोळ्यांतून, चेहेऱ्यांतून, अंगप्रत्यंगांतून तो ओसंडून वाहात होता! एखाद्या बालकासारखा तो अतिआनंदानं नाचूं लागला...

अतिशय हर्ष झाला कीं म्हणे असंच होतं! माणूस नीति शिष्टाचार विसरतो. स्वैर बनतो, नि स्वैर स्वातंत्र्यानं बेहोष होतो. साधे शिष्टाचार त्याच्यानं पाळले जात नाहींत. सारासार विवेकबुद्धीही नाहींशी होते त्याची.

'एवढा का आनंद झालाय आज?' श्यामानं त्याला शेवटीं विचारलं!

'श्याम! श्याम!! तुला कळणार नाहीं तो! अन मलाही सांगता येणार नाहीं! पण.'

'श्याम् असं काय विचारतेस तूं! तुला नाहीं का झाला आनंद! हो? झाला असाच पाहिजे! होय ना! मग अशी दूर कां तूं......'

असं म्हणून त्यानं तिला कडकडून आलिंगन दिलं होतं! अन त्याच दिवशीं त्यानं बाळला खालील पत्रही पण पाठवलं.

...माझ्या लाडक्या बाळ! किती आनंद झालाय मला म्हणून सांगू तुला! हा हर्ष कुठं ठेवूं नि कुठं लपवूं असं झालंय मला! नाचावं, उड्या माराव्या, खूप खूप जोर-जोरानं उगीचचं हंसावं अशी सारखी उकळी फुटतीय हृद-यांतून! श्यामान तर मला अगदीं मूर्खांत काढलंय. मूर्खच आहे ती तशी!

'मला जें हवं होतं तें कसं नेमकं मिळालं बघ. माझ्या छुप्या महत्वाकांक्षेस आतां कुठं अंकूर फुटूं लागले आहेत. मी तुम्हांला कुणाला कांहींच सांगितलं नव्हतं. पण मनांत जे महंमदी मनोराज्य करीत होतो तेंच अखेर मी खरं करून दाखवलं. बाळ! सांगू का तुला? हो! सांगणारच. आतां मुळींच राहावणार नाहीं मला...

पुष्प पूर्ण उमलल्याशिवाय देवाला वाहूं नये म्हणतात. तसाच कांहींसा माझा निश्चय होता. पूर्ण विकास झाल्या-शिवाय देशसेवेस प्रारंभ करावयाचा नाहीं. अगोदर प्रतिष्ठा मिळवावयाची, अधिकार मिळवावयाचा नि त्याच्या जोरा-वरच देशसेवा करावयाची असं मी ठरवलं होतं. कॉलेजांत ज्या दिवशीं मी पदार्पण केलं त्या दिवसापासून माझ्या मनांत हे विचार घोळूं लागले. कुठलीही गोष्ट करण्यापूर्वी आपल्या अंगीं जी विशिष्ट प्रकारची पात्रता दर्जा नि पुण्याई हवी ती मिळण्यासाठीं त्या दिवसापासून मी धडपडत आहे नि आज माझं तें तप पुरं झालं! केवढा केवढा आनंद झालाय मला...

मी डॉक्टर होईन- माझी डॉक्टरी मी देशसेवेस अर्पण करीन. हिंदुस्थानांत गरीब लोकांच्या औषधपाण्याची नीट सोय नव्हती हें मी उघड्या डोळ्यांनीं पहात होतों. अन् विशेषतः जे असाध्य रोग आहेत—महारोग, क्षय-रक्तपित्ती ते तर गरिबांना त्यांच्या गरीबीमुळें फारच छळतात. ह्या रोगावर मी संशोधन करीन, शरिरांच्या नाना क्रियांवर प्रतिक्रिया शोधून काढीन नि माझ्या शोधांचा-माझ्या कर्तबगारीचा-मी मिळविलेल्या पुण्याईचा फायदा साऱ्या हिंदुस्तानास करून देईन नि आपल्या देशाची एक बाजू— आरोग्याची फुटकी बाजू नीट करीन. मला वाटलं मी स्वप्न पाहिलं नि स्वप्नांतच राहणार ! पण नाहीं ! कांहीं कांहीं स्वप्नं देखिल विचित्र तऱ्हेनं खरी झाल्याची आपण नेहमीं पाहातोंच ना ! अनेक संकटांना तोंड देऊन मी एम्. एस्. झालों. पुण्याई मिळविली. पात्रता अंगीं आणली नि आतां देशसेवेच्या धनुष्याला मी माझ्या इच्छेचा बाण लावणार ...

ओहो ! सुखाचा स्वर्ग— आनंदाचं नंदनवन-सारं सारं कसं अपुरं ठेंगणं वाटूं लागलंय मला !

तूं मला नेहमीं चिडवत असे. आठवत असेल तुला. पण आतां तुझं तोंड कायमचं बंद केलंय मी. बाळ ! बाळ !! काय सांगू तुला ! हर्षाच्या हिंदोळ्यावर वरच्या गतीनं हेलावत असलेल्या या हृदयांतील हर्ष—सुखाच्या साऱ्या सीमा ओलांडून परीसीमा गांठलेल्या माझ्या आत्म्याला सजीव करतां आलं नि त्यानं जर तुला माझ्या हृदयांतील आनंदाच्या उन्मादाचं चित्रण केलं तरच तें समजेल. आज मी सिव्हिल सर्जन झालों ! हजारों रोग्यांचा राजा झालों !

माझ्या प्रजेची गांजवणूक मी दररोज पाहातो नि त्यांना सुखी करण्यांत माझं सुख सर्वस्व वेचतो ! हें–हेंच मला हवं होतं नि तें तेच मला मिळालं ! आतां माझं जीवन सर्वस्व-सारी बुद्धिमत्ता--सारी कर्तबगारी ह्याच एकमेव माझ्या ठरीव नि ऐच्छिक विषयांत ओतणार मी !

बाळ ! कलकत्त्याला येवून जा कीं एकदां ! तुझी भेट व्हावी, हृदयांत न मावणारा हर्ष तुझ्या हृदयांस कळवावा, तुझी शाबासकी मिळवावी म्हणून केवढं आसुसलंय माझं हृदय! येतोस का बाळ ! येच नक्की ये ! कुठलीही सबब न सांगतां ये ! पक्षांच्या पंखांनीं उडून ये. येतांना मथुरेलाही अलगद आण. बाळ ! लवकर ये ! अन् हे बघ ! दिवाळी जवळ आलीय. आपल्या चौघांची दिवाळी एकत्र साजरी करूं या का ? तशी माझी फार इच्छा आहे बाळ ! दिवाळीकरतां न चुकतां ये हं !

हो ! एक विसरलोय हं ! श्यामानं तर माझ्या दुधांत साखर पेर केलीय ! तीही आतां नर्सींगचा कोर्स पुरा करणार आहे ! अन मग ती नि मी...बाळ–सांगायला कां हवं तुला !

येणार ना बाळ ! होय म्हण कीं ! होय बाळ !!

तुझाच.

शरद...

केवढ्या कमालीच्या उत्साहानं शरदनं आपल्या कामाची सुरुवात केली ! दिवसाचे चोवीसही तास, मिनिट न् मिनिट क्षण न क्षण तो ह्याच कामांत खर्च करूं लागला. देहभान त्याचं हरपलं ! कामांत समाधि लागली ! रोगी,

रोग नि उपाय त्याशिवाय त्याच्या दृष्टीस कांहीं दिसेना. त्याला पैशाची फिकीर नव्हती, स्तुतीची सेवा नको होती, कीर्तीची कामिनी कमनीय वाटत नव्हती ! झोपेची राणी देखील नावडती झाली. वेळेची तर त्याला शुद्ध नव्हती. दिवसाचे चोवीस तास तर त्याला पुरेनात. देवानं चोविसच कां तास केले आहेत ! सहासहाच काय पण सहा-सहा पर्वाची दिवस नि रात्र केली असती तर...

पण त्या तरी त्याला पुरल्या असत्या का नाहीं कुणास ठाऊक !

त्याच्या हाताला विलक्षण यश होतं ! यशाची लक्ष्मी कीर्तीच्या सरस्वतीला लाजवत होती ! थोडक्यांच काळांत यशस्वी डॉक्टर म्हणून त्याचं नांव झालं ! देशोदेशीचे रोगी त्याच्याभोंवतीं जमा होवूं लागले. रोग्यांच्या वेदनांनीं त्याच्या हृदयाला विलक्षण यातना होत नि हॉस्पिटलमधून हंसत-मुखानं नि त्याच्यावर आशिर्वचनांचा वर्षाव करीत जाणाऱ्या रोग्यांना पाहून त्याच्या हृदयांत हर्षाच्या कोण उकळ्या फुटत!

लवकरच हॉस्पिटल चिक्कार भरून गेले ! दिवसाचे तास कामास पुरेनात. श्यामाचीही त्याला खूपच मदत झाली. तिनं त्याला उत्तेजनंच नव्हे तर यशही दिलं ! त्याची काळजी घेतां घेतां तिच्या नाकी नव आलं ! दमून भागून आलेल्या शरदला श्यामा चटकन् आपल्या हृदयाशीं धरी. चिमणी नाहीं का आपल्या पिलांस पंखाखालीं घेत ! तिच्या पंखांच्या उबेन तो सारे श्रम विसरून जाअी ! उत्सा-हाचं भांडं कांठोकांठ भरून येई नि पुन्हां नव्या उत्सा-हानं मोठ्या हिरीरीनं कामास लागे...

त्याचा तो प्रचंड उत्साह—अदमनीय उरक पाहून श्यामाच्या चित्ताला केवढा हर्ष होई !

' माझा शरद ! ये बाळ ! '

म्हणून तो दिसतांच त्याला ती कुशींत घेई !

त्याचं जीवन आतां सोन्याचं झालं होतं ! असामान्य झालं होतं ! एका निराळ्याच रंगानं तें रंगलं होतं ! जीवनाची ही छटा, जीवनाचा हा कोन, किती थोड्या भाग्यवंतांच्या भाग्यास असतो ! आदर्श जीवन म्हणतात तें याहून निराळं काय असणार ?

जसे गरीब तसेच श्रीमंतही येत त्याच्याकडे. अल्पावधींत खूष होत, नि नोटांच्या भेंडोळीं फेकत.

ते पाहून तो म्हणे.

' मला कशाला हें बक्षीस ? मला काय कमी आहे ? द्यायचं असेल तुम्हाला कांहीं तर हॉस्पिटला ' देणगी ' म्हणून द्या. त्याच्या नांवानं करून टाका ! '

थोडक्याच काळांत ह्या देणग्यांचा वर्षाव एवढा झाला कीं बंगाल सरकारच्या परवानगीनं शरदनं लागलीच दुसरी इमारत बांधण्याचा निश्चय केला !

थोडक्यांच काळांत त्यास एका स्पष्ट गोष्टीची उणीव दिसून येवूं लागली. तो एकटा अपुरा पडूं लागला. साऱ्यांकडं लक्ष देणं त्याच्या आंवाक्याबाहेरचं होवूं लागलं अन् म्हणून त्यानं ..

प्रांतिक सरकारला कळवलं ! चांगल्या हुशार-नामांकित डॉक्टरांची आणखी कुमक मागविली नि आज एक डॉक्टर सरकारनें पाठविला होता....

'जी साब !' म्हणून शिपाई बाहेर गेला. थोडक्याच वेळांत तो डॉक्टर आला. त्याला पाहातांच...

कोण ? अविनाश ?

असं ओरडून शरद ताडकन खुर्चीवरून उठला, त्याच्या जवळ गेला नि त्याचे खांदे गदगदा हलवून आवेशानं उद्गारला.

Oh ! My dear old friend ! How glad to see you! Have your seat here. Ah ! My dearest Avi ! Do forget all the troubles and hateret between you and me, will you? And do prepare to fight against this wonderful battle. Now, Now, Avi ! I am sure to win, yes, very sure to win —

( ओहो ! माझ्या लाडक्या मित्रा, तुला पाहून किती आनंदलोय मी ! बैस इथं, माझ्या आवडत्या अवी ! तुझ्या माझ्या मधील सारे भेदभाव, राग-द्वेष विसर आतां. विसरशील ना ? आणि हें बघ. हें विलक्षण युद्ध लढण्यास सिद्ध हो ! अवि आतां मात्र मी निश्चयानं जिंकीन. हो निश्चित जिंकीन....)

असं शरदनं म्हटलं नि त्याच्या कामाची माहितीही त्याला नीट करून दिली.

घरीं आला तो नेहमींपेक्षांही उल्हासित वृत्तीनं— आल्या बरोबर त्यानं दरवाज्यांतूनच हांका मारल्या.

'श्याम ! श्याम !!'

श्यामा धांवतच बाहेर आली. तिचे दोन्ही हात

पकडून तो म्हणाला ...

आज एक नवीन डॉक्टर आलाय. आहे माहीत कोण तो ? '

' इश्श ! मला कसं रे माहीत असणार ? '

' ओळख तर खरं ? '

' छेः बाई ? तूंच सांग ना, '

' कोण असेल बरं ? '

' कोण ? '

' अविनाश– आहे माहित ? '

' कोण ? तो अविनाश ? '

' हो ! तोच अविनाश । '

' शरद ! '

' काय श्याम ? '

' मला भीति वाटतेय रे ! '

' इत वेडी ! '

' खरंच श्यामाला कसली बरं भीति वाटत होती ? '

* * *

— ८ —

ते दिवस कसे भुर्रकन उडून गेले ! तो विलक्षण आनंद प्रेमाच्या पहिल्या दिवशींचा उन्माद कसा क्षणभरांत नाहींसा झाला होता ! तो क्षण–तोच एक अमर क्षण–कायमचा

पकडून बंदिस्त करतां आला असता तर किती छान झालं असतं !

माणसाला नेहमीं असंच वाटतं ! मागील जीवनांतील उन्मादाचा रोमांचकारी क्षण हवा हवासा वाटतो ! पण मिळतो थोडाच तो ! अन नाहीं मिळाला कीं...

जे सामान्य माणूस करतं तेंच आज मथुरा करीत होती !

आपल्या खोलींत बाळच्या बिछान्यावर ती बसली होती ! तिच्या मनांत पूर्वीं केव्हांतरी आलेल्या उन्मादकारक क्षणांचं आंदोलन चालू होतं ! तर दुसरीकडून तिच्या नयनांतून दुःखाचे उष्ण जलबिंदू तिनं हातांत धरलेल्या बाळच्या फोटोवर तिच्या गालावरून ओघळत होते ! जीवन किती क्षणभंगूर असतं ! जीननांतील आनंद–सौख्य केवळ क्षणाचं असतं ! तें कसं पकडून ठेवतां येत नाहीं ! नि पुन्हां कसं मिळत नाहीं.

या बाबतीचे कसलेतरी विचार तिच्या हृदयांत गर्दी करत होते ! तिला ती अल्लड मथुरा आठवली...

त्या दिवशीं लग्नाच्या आदल्या दिवशीं परकन्यापोरीप्रमाणं अल्लडपणें बागडणारी ती मथुरा...आपला आनंद कुणाला सांगूं नि कुणाला नको सांगूं असं वाटणारी ती मथुरा...सुख स्वप्नाच्या सागरावर अलगदपणें पोहणारी नि आपल्या सुखाचे फवारे आपल्या प्रियकराच्या अंगावर उडवणारी ती मथुरा.

नि

आजची...आपल्या सुखांत कांहींतरी न्यून आहे

अशा भावनेनं रडत असलेली—कसल्यातरी विचित्र हुरहुरीत पुन्हां पुन्हां आकंठ भरून येणारी नि मागील दिवसांची ओवाळणी कुणाला तरी मागणारी मथुरा ..

अेकच का ? छेः ! ती मथुरा नि आजची ही मथुरा ! छे : ! एकच कशी ? जमीन अस्मानाचं अंतर पडलं होतं. जणुं तो निरागस गाढ आनंद गेला कुठें ? सौख्याची ती उर्मी ओसरली कशी ? आनंदाचा तो क्षण गेला कसा ! कुठं गेला ? कुणी नेला ? नि ही असली हुरहुर आपल्या मागं कुणी लावली ? कां लागावी ती ?

वास्तविक तिला काय कमी होतं ? बाळचं का तिच्या-वर प्रेम नव्हतं ? असं कसं म्हणतां येईल ? चिरसहवासानंतरच ते एकत्र आले नव्हते कां ? बाळ का तिला छळत होता ? तिला का दुःख देत होता ? छे : ! हें तर कसं शक्य आहे ?

मग.. मग.. ही हृदयाची हुरहुर कां ? सुखांत हा कसला न्यूनपणा ? जीवनांत ही कसली उणीव ?

बिचारी मथुरा आपल्याच मनाला ती संतापून संतापून प्रश्न मालिकेनं जर्जर करीत होती ? नि ह्या प्रश्नांच्या माऱ्यानं तिचं मुकं हृदय गोगलगाईप्रमाणें पाय पोटांत घेवून थंडपणें निश्वास सोडति होतं

सारं कांहीं होतं—तसंच सारं कांहीं नव्हतंही ? सुख होतं नि सुख नव्हतंही ! एकेकाळीं तिचा जीव आनंदाच्या शिखरावर उड्या मारीत होता नि आज दुःखाच्या खोल दरींत तो तडफडत होता ! तें तिला कळत होतं, उमजत होतं, पण वळत नव्हतं ! जीवाची ही उगीचच्या उगीच होणारी काहली तिला थांबवतां येत नव्हती !

अन् हें कारण कळण्यासाठीं आपल्या जीवनाचा आराखडा ती पुन्हां पुन्हां काढीत असे ...

बाळच्या सहवासांत आपल्याला केवढं सुख लागे ! त्याचा सहवास किती हवासा वाटे ! अन् तो मधुर सहवास जन्माचा आपल्याला मिळावा म्हणूनच ना आपण त्याच्याशीं विवाहबद्ध झालों ! जें सुख आपल्याला त्याच्या सहवासांत लाभलं त्याच सुखाचा उन्माद त्याच्या अलिंगनांनीं–त्याच्या चुंबनानं कां चढूं नये ?

त्या दिवशींची — पहिल्याच दिवशींची ती एकच रात्र ... पतिपत्नींच्या जीवनांतील ती अजरामर रात्र — आपणांस ती काळोखी आमावास्येची भीषण रात्र कां वाटावी ? अपुरी ... अपुरी– असमाधानकारक कां वाटावी ? आपल्या मनांत आपण केवढाले बेत केले होते. केवढे सुखाचे मनोरथ बांधले होते !

मथुरे ! तुझ्यामुळें माझं जीवन किती मधुर झालंय ! ’

बाळचे हे उद्‌गार अैकतांच माझ्या मनांत केवढ्या तरी गुदगुल्या झाल्या- लग्नानंतरची ती पहिलीच रात्र ! चांदणं कसं टपोरं पडलं होतं, आकाशांत चन्द्र कसा डौलानं तरळत होता ! आपल्या अंवतींभोवतीं असलेल्या चांदण्यांशीं त्याचाही मधुचंद्र ( Honey Moon ) चालला नसेल ना ? ह्या कल्पनेशीं माझं सारं अंग शहारून उठलं. मी समोर पाहिलं. बाळ आंत येत होता. माझ्या हृदयांत आनंदाचं भरतंही असंच कुठंतरी दार फोडून येत होतं. त्याला पाहातांच माझी मान खालीं लवली !

‘ लाजायचं कुणासमोर ते तरी कळतंय का एका

माणसाला ? माझ्याजवळ येवून तो म्हणाला. मी काय उत्तर देणार त्याला ?

'पाहिल्याच दिवशीं भांडायचा विचार आहे वाटतं ?'

त्यानं दुसरा सवाल टाकला, तरीही मी गप्पच ! खालच्या मानेनं मी तिरवा कटाक्ष त्याच्याकडे टाकला. तो गालांतील गालांत हंसत होता. माझ्यासारखाच अवर्णनीय आनंद त्यालाही झाला होता कीं काय न कळे ! पुन्हां हंसून तो म्हणाला...

'तुझा खूप असेल भांडायचा नि रुसण्याचा विचार पण मी थोडाच चालूं देणार आहे तो आज ?'

झटकन तो खालीं बसला नि माझं अवनत मुख वर करून खिडकीकडं बोट दाखवून तो उद्गारला...

'तो पाहिलास ना चंद्र मथुरा ! बाहेर चांदणं बघं कसं पडलं आहे तें ! चल्, आपण जाऊं या थोडंस बाहेर !'

त्याच्या वाणींत आज केवढं मार्दव भरलं होतं ! आमचा इतक्या दिवसांचा सहवास ! पण असं लाडीकपणें कधींच बोलला नव्हता तो. पण आज...

लग्न झाल्यावरच सहवासांच्या प्रेमांतही अधिक माधुरी ओसंडूं लागते कीं काय कुणास ठाऊक ? त्याच्या बोलण्यांतील तो लाडिकपणा, मधुर हंसण्याची त्याची ती लकब नि वागण्यांतील तो विलक्षण ओलावा किती सुखाचा होता! जणुं आपल्या प्रत्येक बोलण्यानं नि हालचालीनं तो मला बजबजावून सांगत होता.

'आपण एकमेकांच्या किती जवळ आलों मथुरा, नाहीं? एका लग्नाच्या धाग्यानं-जवळ असूनही इतके दिवसही

दूर–दूर आहोंत असा होणारा भास कसा क्षणार्धात नाहींसा झाला! आतां आपण एकमेकांचे पूर्णोशान होणार!'

त्याच्या त्या तिसऱ्या प्रश्नालाही उलट उत्तर द्याव-याचं माझ्या जीवावर आलं. त्यानं असंच गोड गोड बोलत रहावं नि तें ऐकत रहावं असंही कदाचित वाटलं असेल माझ्या मनाला.

'असं काय मथुरा? सांग ना जाऊं या का बाहेर?'

' अऽहं '

' अंऽहं म्हणायला काय झालं तुला मथुरा! आजची रात्र कां अशी कोंडवाड्यांत काढायची?'

होय! ना! करतां करतां बाळनं ओढून नेलंच अखेर. रजनी चंद्राच्या मधुस्तापानं कशी धुंद झाली होती! माझंही मन नव्हतं का अशाच कसल्यातरी नशेंत? आज सारंच चमत्कारिक वाटत होतं. नाना तऱ्हेच्या सुखद लहरींनीं माझा हृदयसिंधु उचंबळून येत होता! मन कसं शांत शांत झालं होतं! विचारांचं वारंही थंडावलं होतं, शांततेचा तेवढाच एक मंजुळ सूर माझ्या हृदयांत व्यापून राहिला होता...

मी नि बाळ! बाळ नि मी!! दोघं–दोघंच चाललों होतों! ती कांहीं आमची पहिली वेळ नव्हती! अशा कित्येक चांदण्यारात्रीं आम्ही फिरलो होतों. पण...पण... आजची सर नव्हती त्यांना. मागं आम्ही मनानं जरी दूर नव्हतो तरी शरीरानं तरी होतोंच कीं. कसल्यातरी सूक्ष्म संकोचाचा पडदा आमच्यांत होता. पण आज तो शरीरसं-कोच उरला नव्हता. बाळनं माझ्या कटीप्रदेशाभोवतीं विळखा घातला होता. मी त्याच्या खांद्यावर माझ्या

शरीराचा भार टाकून चालले होते. त्याच्या गालाशीं माझे भुरु भुरु उडणारे केस खेळत होते...

कसलीही भावना नव्हती माझ्या मनांत ! माझं मन कसल्यातरी समाधानानं शांत शांत नि अविचल अविकार झालं होतं !

पण, हाय ! वाहण्यापूर्वीची भयानक शांतताच ठरली तीं !

कसं कोण जाणे ? मला एक चटकन फरक त्याच-वेळीं जाणवला. स्तब्ध झालेलं माझं मन खडबडून जागं झालं, विचारांच्या झंझावातानं तें मोठमोठ्यांदा हेलकावे खावूं लागलं ! अन् कसं कोण जाणे माझ्या मनानं एकदम मला विचारलं...

'असं तुझं मन प्रशान्त कां ? '

ह्या एकाच प्रश्नानं मी गोंधळले, गडबडले !

बाळच्या विळख्यांत माझं सारं शरीर होतं ! ज्या स्पर्शांत ज्या सुखाच्या लहरी उठावयास हव्या होत्या, ज्या स्पर्शानं माझ्या भावना हालावयास पाहिजे होत्या, त्या स्पर्शानं जो एक उन्माद शरीराच्या कणांकणांतून उठवावयास हवा होता तो-तो-स्पर्श. तो माझ्या कमरेभोंवतालचा विळखा माझ्या मनांत त्या लहरी उत्पन्न करीत नव्हता. मला तो स्पर्श साधा थंडा वाटला. !

असं कां ? ' कितीदातरी मी माझ्या मनाला विचारलं, पण ...

आम्ही चांदण्यांत एका निवांतजागीं बसलों. बाळनं माझ्या मांडीवर डोकं टेकलं नि तो तिथेंच लवंडला. मी

त्याच्या केसांवरून बोटं फिरवीत होते ...

पण ...

त्या स्पर्शात उन्माद नव्हता. अनुनभूति नव्हती. असं कां ?

बाळनं मला कितीतरी वेळ चुंबलं. पण माझ्या कसल्याच्च भावना उचल खाईनात. मला कसलीच जाणीव होईना. मला त्याच्या स्पर्शसुखाचं–चुंबनाचं–हर्षाचं कांहींच वाटेना. मी वाचलं होतं खूप– मला माहीत होतं, एवढंच नव्हे तर मला माझ्या कित्येक मैत्रीणींनीं आपल्या अनुभवांचं सुख माझ्या कानांत ओतलं होतं ...

पतीच्या स्पर्शात जादू असते म्हणे ? त्याच्या आलिंगनानं शरीरांतील रोमन् रोम चमकून उठतो ना ? कसल्यातरी विलक्षण भावनेचा उन्माद चढतो ना ? प्रियकराच्या चुंबनासाठीं प्रेयसी किती हपापलेली असते ? त्या सुखासाठीं ती किती झुरत असते कीं प्रियकरानं आपल्याला हृदयाशीं कवटाळावी, आपलं अविरत चुंबन घ्यावं–त्याला आपण सोडूं नये– आपणाला त्यानं सोडूं नये ! असं सारखं वाटतं ना ? मग—

तोच तो उन्माद माझ्या नसांनसांतून कां खेळूं नये ? माझ्या भावनेला भरती कां येवूं नये ? माझं मन असं स्तब्ध कां व्हावं ?

कां...कां...बाळ माझा प्रियकरच नव्हे ?...

छेः ! असं कसं असेल ? तो काय मला आवडत नव्हता ? त्याची काय माझ्यावर प्रीति नव्हती ? पण...पण...

त्याच्यातरी डोळ्यांत माझ्याविषयीं अतुरता-अतृप्तता

कुठं होती ? डोळ्यांतील ती मादकता-ती मोहिनी–ती–जादू ती चंचलता–ती अधीरता कुठं होती ?

माझं डोकं अगदीं भणाणून गेलं ! चंद्राला शीतल म्हणतात पण तो दाहक वाटूं लागला. गारगार वारा खेळत असूनही मला उकडल्यासारखं होत होतं...

' चलायचं ना घरीं आतां ? '

असं म्हणतांच तो उठला. घरीं आलों आम्ही !

' मथुरा, मला कुशींत घे ना– '

बाळ माझ्या कुशींत शिरला. लहान मुलासारखं मी त्याला थोपटूं लागले ? क्षणांतच तो गाढ झोपीं गेला...

मला मात्र झोंप आली नाहीं. विचारांचं थैमान चालूं होतं. सैतानाचा नंगा नाच चालूं होता माझ्या भोंवतीं. त्या भेसूर नि भयानक अंधारांतून कुणीतरी मला विचारी...

' कुठंय तो तुझा उन्माद ? कुठंय तो तुझा दाहकपणा ? अशी पुतळ्यासारखी शांत कां तूं ? उठ...उठ... बाळला उठव-चुंब त्याला- हाच का तुझा हनी-मून ? '

रात्रीच्या जागरणानं माझे डोळे भारावले होते. तारवटले होते. मुखकमलाचं निर्माल्यांत रूपांतर झाल होतं. मी बाहेर येतांच श्यामा मला दिसली. मत्सर वाटला मला. अन् कां वाटूं नये ? ...

तिच्या मुखावर कसल्यातरी दिव्य सुखाची कांती झळकत होती ! रोमरोमांतून हर्षाच्या जणुं उकळ्या फुटत होत्या ! नयनांतून कामिनीची अधीरता चमकत होती ! कसं उजाळलं होतं तिचं मुख ! जणुं नुकतंच उमललेलं गुलाबाचं कोवळं टवटवीत पुष्पच तें !

‘ अगबाई ? मथुरा का ? ’

मला पाहातांच ती उद्गारली. माझ्या जवळ आली, मला गदगदां हलवल तिनं नि म्हणाली...

‘ पतिपत्नींनीं इतक्या लवकर उठणं चांगलं नाहीं अं !’

अन् अल्लड पोरीप्रमाणें नाचत नाचत ती भुर्रदिशीं पळाली! कसला आनंद झाला होता तिला कुणास ठाऊक! तिची ती हंसरी नयनं पाहून कां मत्सर वाटूं नये मला ? तिच्या त्या तसल्या वृत्तीनं माझ्या दुःखावर डागण्या दिल्या कुणीतरी ! मी होरपळले ! मनांतील मनांत जळफळे ! मनाची ती कहाणी-ती आग–ती दाह असह्य झाली मला !

संबंध दिवसांत एक अक्षरही बोलले नाहीं मी !

पण लगेच माझी चूक मला कळून आली. आपलं दुःख जगाला दाखविण्याची सोय नाहीं तें मनांतच ठेवलं पाहिजे. एवढंच नव्हे तर मन आनंदित आहे असं दाखविलं पाहिजे. श्यामासारखं कारण नसतां नाचायला हवं. बोलायला हवं. कित्ती कित्ती प्रयत्न केला मी !

पण छेः ! कुठलं जमायला ? अभिनय करणें, मनांतील दुःखांच्या सागरावर झांकणं ठेवणं, सुखाच्या फाटक्या गगनाला ठिगळ लावणं कां सोपं असतं ? मी तरी काय करूं ? नाहीं नाहीं ते विचार माझ्या मनांत येत. माणसानं सोसावं तरी कुठंवर ? अन् सांगावं तरी कुणाला ? बाळला ? श्यामला का माझ्या शरदला ? अन् सांगूनही त्यांनीं मला वेडीच ठरवली तर ? खरंच जगाच्या दृष्टीनं मी वेडीच नव्हते का ? स्वतः निवडलेल्या प्रियकरापासून प्रेयसीचं सुख नाहीं असं कुणाला खरं वाटणार ? पण तसं होतं खरं.. जगांत

कांहीं कांहीं कटुसत्यें असतात ना ? त्यांतींलच हें एक..

बाळ माझ्याशीं किती प्रेमळपणें वागे ! मला हंसवण्याचा रंजवण्याचा किती प्रयत्न करी. आपल्या दुःखानं त्याला कां दुःख द्यावयाचं ? म्हणून मी हंसे ! त्याची कोटी उलटून टाके ? त्याच्या प्रत्येक आघाताला प्रत्याघात, क्रियेला प्रतिक्रिया देत आले ! केवळ त्याला वाईट वाटूं नये; त्याला दुःख होवूं नये म्हणूनच. अन् मी ! माझ्या दुःखाला कुठं सीमा होती? अन तें दुःख कसलं. कुणालाच न सांगतां येण्यासारखं, सांगूनही न समजण्यासारखं. सांगून न सांगून सारखंच तें ? दुःखांच्या होळींत जाण्याव्यतिरिक्त काय होतं माझ्या हातीं ?

कुणाला जरी समजलं नव्हतं तरी तें मला समजत होतं. बाळही माझ्यासारखाच झुरत होता मनांतून. उगीचच माझ्या समाधानासाठीं म्हणून ज्यांत कांहीं अर्थ नाहीं नि दोघांनाही सुख नाहीं असं प्रियाराधन ती करी. तो हंसे ! मी हंसत असे ! एवढंच दोघंही दोघांना फसवत होतो ! दोघांनाही तें कळत होतं अन दोघांनाही तें उघडपणें बोलतां येत नव्हतं! काय विचित्र फसवणूक !

बाळ हा बोलून चालून पुरुष होता. मी स्त्री होते. मनांतील दुःखाचा विसर पाडण्यासाठीं त्याला काय वाटेल ते करतां येत होतं. एवढंच नव्हे तर तो करीत होता. पूर्वींपेक्षां दुप्पट उत्साहानं त्यानं साक्षरताप्रसाराकडं पाहिलं पूर्वींचंच कार्य - पण कसं व्यापक प्रमाणांत करणार आहोंत आम्ही ! कशी एक संस्था काढली आहे, त्याला एक धनाढ्य मारवाडी किती सहाय्य आहे–किती शिक्षकांची जरुरी आहे–

त्यांना पगार किती द्यावयाचा, शिक्षण कसं द्यावयाचं— त्यासाठीं गांवांतील सोप्यांत योजना कशी आरंभली आहे— तशा प्रकारची पुस्तकंही तसेंच चित्रेंही किती छापावयास दिलीं आहेत—ती किती दिवसांत मिळतील नि मग ही योजना कशी अंमलांत आणली जाईल नि या योजनेमुळें कसा साऱ्या प्रांतांत शिक्षण प्रसार होईल -

अशा तऱ्हेची बडबड तो सारखी करी. त्याला आतां या योजनेशिवाय कांहीं दिसत नव्हते नि सुचतही नव्हते. नुसते हुं हुं करण्यापलीकडे मी तरी काय जास्त करणार? मनांतून मात्र म्हणत होते.

'जा बापडा, त्यांत तरी गुंतव तुझं मन...'

कामाच्या व्यापामुळें बाळ आतां घरीं नसे. आला तरी फारच थोडा वेळ असे. अन् आला कीं,

'कसं काय राणीसाहेब! काय आहे आज्ञा!' असं हंसत हंसत माझं चुंबन घेऊन विचारी.

'राणीसाहेब उपाशी आहेत. महाराज.'

'अस्सं! चुंबनानं पोटं नाहीं वाटतं भरलं?'

असा प्रश्न विचारला कीं मला भडभडून आल्या-शिवाय राहात नसे! पण तें मनांत कितीही रडले तरी बाहेर हंसू दाखविणं क्रमप्राप्तच होतं.

'पुरे हं चावटपणा—अशानं तुझी माझी गट्टी 'फू' होईल हं!'

'अस्सं!'

तो मान वेळावून नि हात हलवून विचित्र अभिनय

करे कीं मला मग हंसूं आंवरत नसे ! मी हंसले कीं स्वारी खुशींत येई, अन चटकन मला कवटाळून म्हणत असे—

'अन मग एका रागावलेल्या माणसाची समजूत अशी काढीन मी !'

पुन्हां चटकन तो माझं चुंबन घेई, नि माझ्याकडं पाहून हंसे...

अश्या कितीतरी प्रकारानं तो माझी कलिका खुलवी! पण एका भिकाऱ्यानं दुसऱ्या भिकाऱ्याला मदत केल्या-सारखीच ती ! त्यानं कसलं होणार डोंबलाचं समाधान !

तो निघून गेला, कीं मी अगदीं एकटी पडे ! मग पुन्हां तेच ते असमाधानाचे विचार मला छळून घेत.

'काय बाई हा सासुरवास !'

अशी स्वतःशीच चिडे मी, नि मग मन कशांततरी लागावं म्हणून कुठली तरी कादंबरी हातांशीं घेई. पण--

भडक रंगानं सुवर्णित असे तें प्रेम—प्रसंग--नायक नायिकांचीं ती आलिंगनें, त्यांना होणाऱ्या त्या सुखद संवेदना, त्यांच्या तो उन्माद, एकमेकांना कवटाळण्याची अधीरता नि मीलन...

वाचावयास लागले कीं माझ्या डोळ्यांत उष्ण अश्रूंचे कढत पूर येत !

कुणाला सांगू हें दुःख ? किती अभागी मी ! दुःखी माणसाला त्याची शल्यें जाणून घेणारा तरी मिळतो. पण मला ! अभागिनीमधील अभागिनी मी ! तेवढाही सुखाचा विरंगुळा नव्हता मला ! हो ! होता—श्यामा— अशावेळीं नेमकी श्यामाची आठवण येई मला ! पण ती किती शेकडों

मैल दूर ! कसं सांगणार मी तिला माझं हृदय ? अन्-अन् ती किती तरी सुखांत होती ! परवांच तिचं पत्र आलं होतं. काय बरं तिनं लिहिलं होतं...

' मथुरे ! माझ्या प्राणप्रिय मथुरे ! तूं फार फार सुखांत असशील नाहीं ? माझी आठवण देखिल होत नसेल तुला. खरं ना ? अन् कशी होणार ? त्याचा दोष तुला नाहीं हं मथुरा ! माझी मथुरा किती भाग्याची ! बाळ-सारख्या प्रियकराच्या आलिंगनांत साऱ्या जगाची विस्मृती पडल्याशिवाय का राहील ? हे अनुभवाचे बोल आहेत हं मथुरा !

खरंच मथुरा ! किती किती सांगू तुला असं झालंय मला ! इतकं सुख माझ्या तर नव्हतं बाई वांट्याला आलं ! माझे शरद ? कित्ती कित्ती प्रेम करतात माझ्यावर.

थट्टेनं मला ते नेहमीं म्हणतात.

मी तुझा सर्वांत मोठा लाडका मुलगा हं !

अग्गबाई ? काय हें भलतंच लिहिलं मी ! तूं अगदीं हंसत असशील मनांतून नाहीं ? हांस बापडी ? पण खरंच सांगते मथुरा— मला इतकं सुख होतंय कीं कुणाला तरी सांगितल्याशिवाय चैनच पडत नाहीं ग !

शरदचं नि माझं लग्न होवून का थोडं थोडके दिवस झाले ! पण त्याच्या अंगांतील बालिशपणा कसा तो अजून जात नाहीं. बघ ! जसं कांहीं मी त्याला भेटलेच नाहीं कधीं. त्यांनीं मला चुंबलंच नाहीं कधीं. अशा अधीरतेनं ते माझ्याशीं वागतात नेहमीं ! जणुं दर दिवशीं उगवत्या सूर्यकिरणांबरोबरच आम्ही एकमेकांचे नवीन-अपरिचित प्रियकर नि प्रेयसी होतो

प्रीतीचा पहिला भर, पहिला उन्माद अजून ओसरलाच नाहीं. दररोज वाढतोच आहे तो ! दररोज त्यांच्या सहवासांत नवीन हर्ष. नवीन सुख अनुभवतें मी ? तुला आश्चर्य वाटेल. पण आम्ही रात्ररात्र एकमेकांच्या गळ्यांत गळा अडकवून गुलुगुलु गप्पा मारीत असतो ! शरद किती छान बोलतो ग ! सारखं ऐकावसं वाटतं. पुन्हां पुन्हां त्यानं मला उराशीं धरावंसं वाटतं. थोडासा विळखा सैल पडला, कीं मी चुळबुळ केली कीं ते हंसून मला म्हणत...

'लागली का चुळबुळ करायला ! थांब असं घट्ट धरतो तुला !'

अन् मला देखिल केवढं सुख वाटतं ! वाटतं कीं त्यांनीं असंच घट्ट धरून बसावं नि मी त्यांच्या छातीवर मान विसावून जगाच्या अंतापर्यंत असंच बसावं.

माझ्याशिवाय झोंपच येत नाहीं हं स्वारीला ! कुठं थोडा उशीर झाला कीं लगेच मला असेल तशी उचलून नेतात नि माझ्या कुशींत शिरून म्हणतात.

'थोपट ना मला श्याम !'

एकएक सांगायला गेलं तर तुला आश्चर्य वाटेल.

'तुझं माझ्यावर प्रेमच नाहीं'. असं म्हणून स्वारी एके दिवशीं जी गुरफटुन बसली ते सांगतां सोय नाहीं. कितीही समजावून सांगितलं तरीही समजूत निघेना. मी तरी बाई रडकुंडीला आले अगदीं ! अन् खूप समजावल्यावर रागानं मुलं जशी गाल फुगवतात तसं लटक्या रागानं गाल फुगवून म्हणाले.

' माझ्यावर प्रेम असतं तर माझं चुंबन नसतं का घेतलंस तूं ! आम्ही इतकी चुंबनं घ्यावीं नि तुम्ही मात्र आमचं एकदांही घेवूं नये? जा. माझ्यावर तुझं प्रेमच नाहीं खरं... '

बघ बाई मथुरा ! असला विचित्र हट्ट घेऊन बसतात ते एखाद्या वेळीं ! अश्या वेळीं कसं समजावयाचं गं? सांग ना मला गडे ! बाळही तुझ्याशीं असंच वागतो कां ग?

एके दिवशीं मी अशीच चिडले नि म्हणाले—

' एवढे मोठे डॉक्टर झालांत नि असं काय वागतां पोरासारखं ? '

' हो जा ! आम्ही आहे पोर ! '

अन् जे रागारागानं निघून गेले ते तीन दिवस दवाखान्यांतून आलेच नाहींत घरीं. बघुं तरी या काय होतंय तें ! असं म्हणून मुद्दामच दुर्लक्ष्य केलं बरं का मी मथुरा !

चौथ्या दिवशीं झक्कत आली स्वारी ! नि तीही तीन दिवसाची रजा घेऊन !

अन् तीन दिवसांतील एक क्षणही रिकामं सोडलं नाहीं बघ मला शरदनं ! काय ग माणसांची ही असली विचित्र वागणूक ? आतां बाळ भाऊजींना चांगले कान उघडायला सांग हं शरदचे ! मी तरी कितीवेळ सोसूं बाई हा छळवाद ? '

तिचं तें पत्र वांचून माझं दुःख दुप्पट वाढलं मात्र ! श्यामनं मला भाग्यवान् म्हटलं पण.. पण.. किती दुर्भागी होते मी !

‘ मथुरा ! काय होणार तुला ? मुलगा कीं मुलगी ? ’

‘ इश्श ! मला रे कसं कळणार ते ? ’

‘ मुलगाच होणार, ’

‘ कशावरून ? ’

‘ बघ तरी, मुलगीच होईल ’

‘ हें तरी कशावरून ? ’

‘ मला मुलगीच हवी म्हणून ’

‘ बरं बुवा, नांव काय ठेवणार आपल्या लाडक्या लेकीचं ’

‘ तें काय करायचं तुला ? ’

‘ पण सांग ना. मला नाहीं सांगणार ? ’

‘ पण तुला आवडेल कां तें ? ’

‘ हो कां नाहीं आवडणार ? ’

‘ सांगू ? ’

‘ हूं ’

‘ श्यामा ! ’

‘ मोठं गोड नांव शोधलसं ! हूं ’

‘ असू दे पण मुलगा झाला तर तूं काय नांव ठेवशील ? ’

‘ मला नाहीं बुवा सुचायचं असलं गोड नांव ’

‘ सांगायचं नाहीं असंच सांग कीं ’

‘ हे काय बरं ? रागावलीस ?’

असं म्हणून त्यानं मला झटकन उराशीं कवटाळलं

नि म्हटलं

‘ शशीकांत ठेवीन मी त्याचं नांव.’

‘ शीः! कसलं नांव रे हे ! मी नाहीं ठेऊं द्यायची?’

‘ कां ? जी मुळी शशी सारखी शीतल आहे तिच्या मुलाला......’

‘ हं...हं...पुरे हं...’

मला दिवस गेले होते. कांहीं अंशानं मी आनंदातही होते. बाळला तर केवढा हर्ष झाला होता. मी त्याला हे गोड गुपीत ज्या दिवशीं सांगितलं त्याच दिवशीं शांताबाईच्या देखत त्यानं पटकन दोन्ही हातांनीं उचलून मला गरगरां फिरवलं.

‘ आई ग ! ’ म्हणून मी ओरडणार तोंच त्यानं माझे ओठ आपल्या ओठांनीं बंद करुन टाकले !

त्या दिवसापासून तो मला अगदीं फुलासारखं वागवे. माझ्या प्रकृतीची अतिशय काळजी घेई. थोडंसं दुखलं खुपलं की डॉक्टरकडे धांव घेई, सारखं सारखं माझ्या-भोवतीं घोटाळे, मला सारखं बोलत ठेवण्याचा हंसवत ठेवण्याचा तो प्रयत्न करी. अन् त्यामुळेंच कीं काय कोण जाणे—पण हे दिवस मला पूर्वीपेक्षांही बरे वाटले.

बाळनं शरदकडे हे कळवलं होतं. श्यामाचं मोठं गोड पत्र आलं होतं ...

‘ अगदीं गोजिरवाण बाळ होणार हं मथुरे, सांगून ठेवते तुला ! मला बाई तुझा फार फार मत्सर वाटायला लागलाय् ! किती लबाड आहेस ग तूं ! एका अक्षरानंही मला कळवलं नाहींस अं !

काय ग लबाडे ? मनुष्य आत्मसुखांत असला कीं जवळपासच्या माणसाचाही त्याला विसर पडतो काय ग ! पण मी तुला मुळींच विसरूं देणार नाहीं अं ! शरद तर तुझी आठवण वारंवार काढतोच काढतो. अन् मलासुद्धां तुझी नेमकी आठवण येते हं !

पण काय ग ? तुला हल्ली डोहाळे लागले असतील नाहीं ? कळतील का आम्हांला ते ? अन् बाळ तुझं अगदीं कोडकौतुक करत असेल नाहीं ? आज काय हवं. उद्यां काय हवं...राणीसाहेबांना कशाची इच्छा झाली आहे ? असं विचारून भेडावून सोडत असेल बाळ. अन् तुला तर स्वर्ग दोनच बोटं उरला असेल. मी म्हणतेय ते खरं ना ? अन्... अन...मुलगा किं मुलगी यावर भांडण करतां का नाहीं तुम्ही दोघेजण ?...'

किती गोड होतं हें पत्र ! इतकं मी वाचलं नाहीं तोंच...

कुणीतरी माझं नयन हळूवारपणें झांकले ! किती गार वाटला मला तो स्पर्श.

'सोडं हं उषा ! कां सांगू अक्कांना ? अक्का...'

पण माझे हे शब्द ओठांवरच जिरले ! मला वाटलं होतं कीं उषा असेल ! पण- तो बाळ होता ! त्यानंच माझ्या ओठांना हें कुलुप घातलं होतं...

'इश्श ! हें काय ? '

असं म्हणून मी तो हात सोडवला.

गालांतील गालांत बाळ हंसत होता.

'सांग कीं अक्कांना ? '

‘ अंऽहं ! मला वाटलं उषा असेल असं...’

‘ वाटायचं, तुझ्या गालावर उषा खुलली आहे ना ? ’

‘ आज माझ्यावर काव्य रचणार कीं काय ? ’

‘ बायकोशीं काव्यशास्त्रविनोद ’ नाहीं करायचा तर मग ... ’

‘ हं समजलं हं ! ’

‘ काय समजलं ? ’

‘ कांहीं नाहीं ! ’

‘ पण मला समजलं कीं ’

‘ काय ? ’

‘ आज एका माणसाला किती आनंद झालाय तें ? ’

• • •

— ९ —

‘ वेडी रे वेडी ! कुणी सांगितलं तुला हें ? ’

‘ या इकडं ! ’ असं म्हणून कांतानं बाळला धरलं नि आरशापुढें खेचत म्हटलं.

‘ ह्या माणसानं.. ’

‘ पण हा माणूस तर फसवा आहे ’

‘ विषय बदलूं देणार नाहीं अं मी असा. तें कांहीं चालायचं नाहीं बाळ, सांगणार नाहींस का तूं मला ? ’

‘ काय सांगू तुला ? ’

‘ असं काय बरं वेड पांघरून पेड गांवला जायचं तें ! अशानं रागवेन अं ! ’

‘ अग पण मला कांहींच होत नाहीं तर काय सांगू तुला ? ’

‘ माणूस इतका फसवा असतो कां रे बाळ ! कशानं तरी तुझं मन दुःखी कष्टी झालंय हें खास. एवढंही न कळायला काय मी मूर्ख आहे बाळ? पण तुला तें माझ्यापासून लपवून ठेवावयाचं आहे, होय ना ? अन् तूं तरी कां सांगावंस म्हणा. माझ्यावर कुठं तुझा विश्वास आहे ? ...’

कांतेनं साडीचं एक टोक हातांत धरलं नि दुसऱ्या हाताच्या बोटाला त्याचे वेटोळे घालत तिनं एक दीर्घ उसासा सोडला...

कांहीं कांहीं वस्तु अशा असतात: कीं थोड्याश्या आंचेनंही त्या विरघळतात. बाळचं मनही तसंच होतं. स्वतः तर आपण दुःखी आहोंतच पण आपल्यामुळें आपण एका आपल्या प्रिय माणसालाही दुःखी करीत आहोंत...ही जाणीवच अशी होती कीं त्यामुळें त्याचं मन आपोआप दुभंगलं...

कदाचित् त्याच्या मनांत असाही विचार आला असेल...

‘ मथुरेचं फूल आपण निर्दयपणें कुस्करलें अन् आतां जाणून बुजून कांतेचें ही... ’

मथुरेची आठवण होतांच त्याला कसंसंच झालं. आपल्या समोर कांता बसली आहे हें तो जणुं विसरलाच. वरच्या आढयाकडे शून्यपणें तो पाहूं लागला. मथुरेच्या त्या

दुःखद स्मृती झटकन त्याच्या डोळ्यांपुढून गेल्या...

त्यानं मथुरेला सुखी करण्याचा काय कमी प्रयत्न केला ? पण...माणसाला साऱ्या गोष्टी प्रयत्नानं मिळतातच असं कुठं आहे ? त्याचं नि मथुरेचं लग्न होऊन वर्ष दीड वर्ष सहज लोटलं होतं. मथुरेशीं त्याचं लग्न झालं, त्या दिवशीं त्याला कोण आनंद झाला...

'आपल्या भाग्याला आतां काय कमी आहे ? मथुरे-मुळं आपल्या जीवनांत माधुरी उत्पन्न होणार, जणुं स्वर्गाचं द्वारच खुलं होणार, मथुरा न् मी ! मी न मथुरा ! जीवनांतील साऱ्या सुखाचं यथेच्छ प्राशन करूं. जें कुणाला कधीं मिळालं नाहीं आणि जें कधीं मागून मिळत नाहीं तें आपल्याला मिळालं. अन किती सहजासहजीं ? बाळपणापासून जीं स्वप्नं आपण रेखाटलीं...ज्या स्वप्नांच्या स्वरूपांत आपण आनंदानं बेहोष होत असूं. मथुरा आपली होईना कां. या चिंतेनं कधीं हुर-हुरत असूं. ती आपली झाली तर...या कल्पनेनं कसं सौख्याच्या पुरांत डुंबत असूं. मी अन् मथुरा...एक होवूं. हें करुं तें करुं...अशी किंती मनोराज्यं केलीं आपण !

मथुरेला ती बोलूनही पण दाखविली. तें ऐकून तिला तरी काय कमी हर्ष होत असे ?

'मी तुझीच होईन हं बाळ...आपलं हें सुखस्वप्न खरं केलं हं बाळ ! '

या तिच्या उद्गारानं–या तिच्या संमतीच्या उत्तेजनानं आपल्या देहांतील कण न कण कसा रोमांचित होत असे...

अन् 'मथुरा ! आपण दोघं एकमेकांचें नाहीं झालों तर अशी शंका काढतांच मथुरा कशी आपल्या मुखावर

हात ठेवीत असे ! नि म्हणत असे.

'असं बोलूं देणार नाहीं हं बाळ मी तुला !'

ज्या सुकुमार वेलीचं बीज मी माझ्या हृदयांत रुजत घातलं.–तिला अंकुर फुटले...त्या इवल्याश्या अंकुचित आशेची जोपासना मी किती हळुवारपणें केली ! वाऱ्याच्या झोतानं कदाचित ते उपडून जाईल म्हणून कसं जपलं ! प्रेमाची पांखर कशी घातली ! त्याला वाढवलं ! माझ्या हृदयांत आंदोलन झालेली ती वेळ पाहून माझ्या हर्षसिंधूला कशी भरती येई...वेल वाढली ! हंसली ! खेळली !! माझी झाली ! तिला एक सुगंधित पुष्पही पण आलें...

पण...अपेक्षा साफल्यानंतरहि माणसाच्या वाटच्या भोग कधीं संपत नाहीं तो असा...

सत्यसृष्टी नि स्वप्नसृष्टींतील अंतर उघडं पडलं. मला तें दिसलं. दचकले ही मी ! पण नाहीं सोडला धीर. मनाला ग्वाही दिली. शंकेचं निर्भर्त्सना केली.आनंदानं प्रीतीचं स्वरूप उज्वल करण्यासाठीं झटलों. पण...

मी नुसती स्वप्नच रंगवलीं. रंगानं भुललों. भुलीनं ईर्ष्येला पेटलों नि पेटल्या आगींत होरपळून निघालें. स्वप्नसृष्टी असती तर.. ?

मथुरेचं माझ्यावर प्रेम होतं ! माझंही तिच्यावर प्रेम होतं. मला मथुरेवांचून करमत नव्हतं. मथुरेसही माझ्यावांचून करमत नव्हतं. मला तिचा सहवास हवा होता. तसाच तिलाही माझा. सारं कांहीं आमचं कसं सुखानं चाललं होतं. प्रेम होतं. राग होता. अनुराग होता. सारं कांहीं होतं. पण कां कुणास ठाऊक. माझ्या मनांत शांती नव्हती. तिच्या ही मनांत

नव्हती. कसली तरी विचित्र हुरहुर दोघांनाही लागून राहिली होती. कारण कुणालाच कळत नव्हतं. सांगतां येत नव्हतं. पाहाणाराला वाटे जोडपं असावं तर असं ! प्रेम असावं तर असं नि संसार असावा तर बाळ सारखा ! ' अन् खोटं होतं कां तें ! आम्हांला काय कमी होतं ! दोघांच्याही मनांत होतं नेमकं तेच घडलं होतं. पण तसं होऊनही आम्हांला सुख नव्हतं. कसली तरी विचित्र हुरहुर मनांत दाटदाटून येत होती. तिला जसं मी सुखी ठेवण्याचा– हंसवत ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो– तसंच तीहीपण करीत होती.

पण कसं कृत्रिम होतं सारं ! नैसर्गिकरीत्या एकमेकांना पाहून आम्ही कधींच हंसलों नाहीं. एकमेकांच्या स्पर्शानं कधीं एकमेकांच्या भावना उचंबळून आल्या नाहींत. कधीं म्हणून प्रीतीचा पहिला उन्मादकारी क्षण आम्हांला दिसला नाहीं. उलट आमच्या प्रीतीला ओहोटीच लागली. दिवसेंदिवस ती वाढतीच अमावास्येची रात्र कधींच संपली नाहीं. भरतीची पौर्णिमा कधींच उगवली नाहीं किंवा पौर्णिमेचा हंसरा चंद्र मथुरेच्या ठिकाणीं मी पाहिला नाहीं. दोघांनाही हें समजत होतं. दिसत होतं. पण असं कां व्हावं हेंच कळत नव्हतं. एकांतांत दुःखाचे दीर्घ उसासे टाकण्यावांचून दोघांनाही कांहींच करतां येत नव्हतं.

दिवस उगवत होता. रात्रीं सरत होत्या. मनाची ती विचित्र हुरहुर वाढत होती. तशांतच उषःकाळचे आशेचे किरण मला दिसले ! केवढा आनंद झाला मला ! आतांतरी आमचा भाग्यसूर्य उगवेल अशी केवढी आशा बाळगली होती मी! मथुरेला दिवस गेले होते! तिही विलक्षण आनंदांत होती. तिचा आनंद पाहून मलाही मनांतील हर्ष उफाळत होता.

एक छोटासा जीव उत्पन्न होईल, गोडगोड हंसेल तो. खुदकन त्याची कळी उमलेल— एक बाजूनं मथुरा नि एका बाजूनं मी त्याचा गोड पपा घेऊं नि एकदम त्याला विचारूं...

'किती गोड गोड पपा दिला माझ्या राजानं !'

हेंहि स्वप्न अर्धवटच राहिलं. सुखाचे ते दोन क्षणही जणुं देवाला पाहावले नाहींत ! मथुरेला अपुरेच दिवस गेले. नि बाळ जन्मला. किती त्रास झाला होता मथुरेला ! तिचं तें पहिलं बाळंतपण होतं ना ! मला राहवेना. नर्सनं सांगितलं. मुलगा झाला ! वास्तविक हर्षानं मी नाचायलाच हवं होतं ! पण माझ्या मथुरेची मला काळजी होती.

'तिची प्रकृती कशी आहे ?' मी विचारलं.

'छान आहे'

'मला भेटतां येईल कां ?'

'आतां नाहीं.'

'कां ?'

माझ्या त्या विचित्र प्रश्नानं नर्स गोंधळली. पण तिच्या भावनेची पर्वा मला कुठं होती ! मी पटकन आंत घुसलों.

'मथुरा !'

'बाळा'

आमचं नेत्रमीलन झालं. एक क्षीण हास्य मथुरेच्या मुखावर चमकलं. मी जवळ गेलों. तिच्या मोकळ्या केसांवरून प्रेमभरानं हात फिरविला. कशी क्षीण झाली होती ती !

'बरं वाटतंय ना आतां ?'

'हुं !'

तिच्या कुशींत तें इवलंस बाळ डोळे मिटून पडलं होतं. दुपट्यामध्यें जरी त्याचा देह गुंडाळलेला होता तरीपण त्याचे लाल लाल इवलेसे चरण हळुंच डोकावत होते. माझी नजर तिकडे होती. नजरेंतील भाव मथुरेनं ओळखला. तिनं त्याच्या मुखावरचं दुपटं दूर केलं.

‘ अगदीं तुझ्यासारखा झालाय हं ! ’

‘ अहं ! तुमच्यासारखा. ’

नर्स केव्हां आंत आली कुणास ठाऊक. ती म्हणाली.

‘ ही वेळ भांडायची नाहीं अं ! ’

मथुरा खुदकन हंसली. मीही हंसलों नि समाधानानं बाहेर आलों.

एक चिमुकला जीव आमच्यांत आला. हर्षानं कांठोकांठ भरलेले चार सौख्याचे दिवस त्यानं आम्हांला दाखवले अन पांचव्या दिवशीं जसा आला तो तसाच अचानक सोडून गेला.

झालं ! चार दिवसाची दिवाळीं ओसरलीं. होळी पेटली ! नि त्यापुढें सारा जीव उठवून गेला. पण मथुरेला जगायचे होतं ना ! धीर सोडून कसं चालेल. चारसहा दिवस मी कुठं गेलों नाहीं. आलों नाहीं. सारखा मथुरेच्या उशाशीं बसलों. तिच्या नयनांतून वाहणारे अविरत अश्रू पुसूं लागलों. उगीचच्या उगीचच.

‘ मथुरा ¡...अशी केविलवाणी हांक मधूनच मारूं लागलों. क्षणभरच आंसवांनीं डबडबलेले डोळे मथुरा उघडी माझ्याकडे पाही. तिच्या पाणावलेल्या डोळ्यांतूनही दडलेली

निराशा दुःख उदासवाणेपणा मला स्पष्ट दिसे ! माझं हृदय कळवळें. अन्

‘ सहन नाहीं रे होत बाळ हे ! ’

असे शब्द अैकतांच ते पिळवटून निघे !

‘ मला मरूं दे रे बाळ! आतां जगवत नाहीं रे ! ’ अशा प्रकारचे हृदयाला घरे पाडणारे तिचे शब्द ऐकले कीं मला कसंसच होई, ज्याला अर्थ नाहीं असे शब्द मीं पुटपुटतो,

‘ उगी मथुरा ! असं बोलूं नये अं ! ’

‘ बाळ जाण्यापेक्षां मीच गेले असते तर...’

‘ असं काय तिनं करावं बरं वेड्यासारखं ? माझ्याकडे पहा ना जरा ! ’

अन् तिनं पाहावयच्या आंत मी तोंड फिरवून डोळे डाव्या हाताच्या बाहीनें पुसून घेत असे !

रजा संपतांच कामावर जाण्याशिवाय मला गत्यंतर नव्हतं. रजा वाढवून घ्यायला एक मन सांगे. दुसरं म्हणे काय करायचीय ती वाढवून ! कामांत तरी मन रमेल. थोडा वेळा कां होईना पण खास रमेल तें !

नर्सला बजावून मी कामावर आलो. नेमकी त्याच दिवशीं कांता मी पाहिली.

‘ साहेब ! साहेब ! ! ’ माझा शिपाई घाईघाईनें म्हणाला.

‘ काय रे ? ’

‘ साहेब, एक बाई आलीय बाहेर ? ’

‘ मग ? ’

‘ आपल्याला भेटायचंय तिला. ’

‘ घेवून ये तिला आंत... ’

अन कांता आंत आली. ती मला दिसली. ज्या क्षणीं दिसली त्या क्षणीं माझ्या मनानं एक विलक्षण ओढ घेतली. जी मी कधींच अनुभवली नव्हती. जी ओढ मथुरा मला लावूं शकली नव्हती. ती ओढ तिला पाहतांच मला लागली. कारण कांहीं कां असेना ? कदाचित कांता लावण्यवती असेल म्हणून—कदाचित तिचे सारे अवयव रेखल्यासारखे असतील म्हणून—पण...पण

माझी मथुरा कांहीं कमी सुंदर नव्हती !

उगीचच्या उगीचच मथुरेशीं माझं मन तुलना करूं लागलं. कांता काळीसांवळी होती, तर मथुरा केतकीलाही लाजवणारी—कांतेचे अवयव रेखीव खरे—पण मथुरेचेही तसेंच, किंबहुना तिच्याहीपेक्षां यास्त रेखीव होते. सौंदर्याची तुलनाच करावयाची झाली तर मथुराच सरस. सरस नि सुरेख ठरली असती.

असं असूनही असं कां व्हावं ?

माझं मन मथुरेला सोडून कांतेकडं कां ओढावं ? तिला पाहातांच माझ्या मनाचं आदोलन कां व्हावं ? माझी छाती कां धडधडावी ? मथुरेपेक्षां हिच्यांत कांहींतरी जास्त आहे, असं कां वाटावं ? कांतेनं माझ्या जीवाला चटका कां लावावा ? मथुरेचा कां लागूं नये ?

कधीं न उलगडणारं असंच तें कोडं खरं ?

कांतेला पाहातांच चटकन हे विचार माझ्या मनांत आले ! मी गडबडून गेलों ! ‘बसा’ असं म्हणण्याचा शिष्टाचार सुद्धां मी विसरलों. एवढंच नव्हे तर असभ्यपणें मी तिच्याकडं

कसल्या तरी आसुसलेल्या नजरेनं पाहात राहिलों.

ती आली केव्हां? बसली कशी? काय बोलली ती? आपण काय बोललों तिच्याशीं? कांहीं कांहीं आठवलं नाहीं मला.

'आपण तिच्याशीं असभ्यपणानं वागलों' ही काय ती चुटपुट माझ्या जीवाला लागली. त्यानंतर मला कांहींच सुचलं नाहीं. कामाकडं तर बिलकूल लक्ष लागेना, कसली-तरी चुटपुट जीवाला लागून राहिली. कांहींतरी हरवल्यासारखं वाटूं लागलं—कांहींतरी विसरल्यासारखं वाटूं लागलं.

राहून राहून कांतेचा तो हंसरा, मुग्ध, मधुर चेहरा दिसूं लागला.

क्षणोक्षणीं तिचे ते लाडीक नेत्र माझ्यासमोर हंसू लागले. तिचं ते बांधेसूद शरीरसौष्ठव दिसूं लागलं.

मन ओढ घेवूं लागलं.

'कांता! कांता!!' उगीचच तें तहानलेल्या चातका-सारखं ओरडूं लागलं! काय झालं ते माझं मलाच कळेना. मी भ्रमिष्ट झालों. वेडा झालों? पागल झालों? दिवाणा बनलो! कळलं मला ते एवढंच...

'वेडाच्या लहरींतच मीं घरीं गेलों ...

जातांना कांतेचा धावा मन करीतच होतें.

मथुरेजवळ मी गेलों—बसलों, नि तिच्याकडे निर-खून पाहिलं मात्र.

छेः मला वाटलं. छे! आपली ही मथुरा नव्हेच कांताच आहे ही. हो! हो!! कांताच...

ही काळीसावळी मुग्ध मनोहर आकृती.

लाडीक पण मोहक डोळे...

अन्..अन् हंसणाऱ्या त्या इवल्याश्या दोन कालिका...

ते पाहातांच मी सुन्न झालों. ' कांता ! ' अशी हळुं-वारपणें हांक मारावी, तिच्या ओठांवर आपले ओंठ टेकवा-वेत असं कितीदां वाटलं मला ! कसं बेलगाम अनावर झालं होतं माझं मन ! अन तें अनावर मन आवरायला केवढे प्रयास करावे लागले मला...

आज काय होतंय तुला बाळ ?

माझ्या मनाची चलबिचल चाणाक्ष मथुरेनं तेव्हांच ताडली अन तिनें हें विचारलं. सणसणीत मुस्काटांत बस-तांच दारूची धुंदी पार वितळावी ना ? तसंच झाल माझं.

या प्रश्नानं हरपलेलं भान मी मिळवलं अन् पुन्हां म्हणालों.

' अं ? काय म्हणालीस ? '

' आज कांहीं होतंय का मला ? '

' हो ! हो !! फार होतंय '

' काय होतंय ? '

' फार आनंद झाला मला '

' हो ! कां ? '

' तूं लवकर बरी होणार म्हणून. होशील ना ? हो ! हो !! होणारच मुळीं, होय ना ? '

'होईन अं ! माझ्या बाळासाठीं लवकर बरे होईन...'

सफाइनं मी तिला फसवलं. माणूस दुसऱ्याला सहज फसवितो. पण स्वतःला तो फसवूं शकत नाहीं. माझं मलाच

वाईट वाटलं. मी उठून दुसरीकडे गेलों. पण काय लबाड होती ती कांता ! तिची मूर्ती डोळ्यांपुढून हालेनाच ! '

मनीं बसे ( किंवा लपे ) तें स्वप्नीं दिसे असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. त्या दिवशीं रात्रीं असंच झालं. कसलं विचित्र स्वप्न पडलं मला...

मी नि मथुरा एका सुंदर उद्यानांत बसलों आहोंत. गार गार वारा एकाद्या लहान मुलासारखा अंगाला झोंबतो आहे. वसंत ऋतु बहरला आहे. वरील आंब्याच्या वृक्षाला मोहोर आला आहे. त्याचा सुगंध दरवळत आहे. त्याच वृक्षावर कुहुऽकुहु कोकिळा आपल्या मंजुळ-आवाजानं आपल्या प्रियकरासच जणुं बोलावत आहे! सूर्याचीं कोवळीं कोवळीं उन्हं वृक्षांच्या माथ्यावर चमकत आहेत. जणुं 'दीर्घायु भव' असा आशीर्वादच ते त्याला देत आहे....

' काय पण सुंदर समय आहे ! मथुरा उद्गारली.

' खरंच ते ? '

' असं माझ्याकडे काय बघतेस ! जरा वर तर पहा कीं ! '

' इतका अरसिक आहे मी मथुरा ! मूर्तिमय सौंदर्य उजव्या माझ्या हाताला असतांना असं डावीकडं कोण पाहील ? '

' इश्श ! इतकी कां मी सुंदर आहे ! '

' प्रश्न आहे की काय ? '

' पण बाळ, तुला काय आवडते ? मी की माझं सौंदर्य ? '

तुझ्यामुळें सौंदर्य नि सौंदर्यामुळें तूं '

‘ यांना विचार की. ’

‘ काय विचारूं ? ’

‘ तूं मला कां आवडतोस ते ! ’

‘ सांग की तूंच. ’

‘ सांगू ? ’

‘ तूं प्रेम करतोस माझ्यावर म्हणून ’

‘ हो ! हो ! ! ! माझं तुझ्यावर प्रेम आहे मुळीं.’

अन् एवढ्यांत एक चमत्कार झाला !

कुठून कसं कोण जाणें ?

पण एक मोठं गेंदेबाज गोंडस गुलाबाचं फूल आम-च्यांत येवून पडलं. मी तें हळूवारपणें उचललं. हृदयाशीं कव-टाळलं. प्रेमभरानं ओठाशीं लावलं नि मथुरेच्या डोक्यांत तें घालणार तोंच...सळकन वारुळांतून साप बाहेर पडावा तसं त्या फुलांतून एक नागीण बाहेर पडली.

‘ मथुरा ! ’

“ ‘ मथुरा ! मथुरा !! ’ मी ओरडलों - पण शब्द ओठांतच जिरले.

मंत्रमुग्ध झालों मी -

त्या नागीणीनं मथुरेच्या गळ्याला मिठी मारली नि ती डाकीण आतां तिला डसणार तोंच - मला रहावेना.

चटकन् मी तिची मान घट्ट पकडली. अन् ती आतां दाबणार तोंच ...

ती नागीण लुप्त झाली - अन् काय आश्चर्य !...

नागीणीच्या ऐवजीं मथुरेचाच गळा माझ्या पकडींत

होता नि मी दाबीत होतो तो ..

कसलं तरी भयानक, भयंकर, कणखर हास्य माझ्या कानीं पडलं. मी दचकलों - नि पाहिलं.

मथुरेच्या पाठीमागें कांता खदखदून हंसत होती -

मी भ्यालों - नि ओरडलों -

'मथुरा ! मथुरा !!'

नि ताड्दिशीं उठून बसली !

डोळे चोळले .. तो तो ...

खोलींतील दिवा लावला होता - मथुरा माझ्या शेजारीं होती.

'बाळ ! बाळ !!' ती हांका मारीत होती—केवढ्यांदा ओरडलास रे ?'

'कोण ? मथुरा ? तूंच कां ?'

'होय बाळ ! स्वप्न कां पडलं तुला !'

'होय ग - भयंकर - भयानक - भयानक ..'

'छे ! वेड्या !!'

असं म्हणून तिनं मला कुशींत ओढलं नि माझ्या मस्तकावरून तिनं हर्षभरानं नि प्रेमभरानं हात फिरवला. शंकरानं आपल्या शिरावर चंद्र कां बसविला ह्या कोड्याचा उलगडा झाला मला. भ्यालेलं मूल जसं आईला घट्ट मिठी मारतं तसं मी केलं नि माझं तोंड मथुरेच्या कुशींत लपवलं !

सकाळीं मीच अगोदर जागा झालों. मथुरेनं मला आपल्या उराशीं घट्ट धरलं होतं. मिटल्या कमलिनीच्या किंवा श्रांत कामीनीची कमनीयता तिच्या ठिकाणीं दिसली

मला. ती जागी न होईल अशा बेतानं मी माझं मस्तक उचललं नि तिच्या मिटलेल्या ओष्टकलिकेचें चुंबन घेतलं! किरणांच्या ओझरत्या स्पर्शानंही कमिलिनीची कलिका खुलावी तसंच झालं! कमळाच्या दोन पाकळ्या उमलल्या, आंतील बुबुळांचा भ्रमर गुंगू गुणगुणूं लागला.

' अंहं! इतक्यांत नाहीं अं उठायचं!' असं म्हणून तिनं मला पुन्हां घट्ट उराशीं आवळलं नि माझ्या शिरावर आपलं शीर ठेवीत तिनं उद्गार काढला.

' झोपेंत केवढ्यांदा तरी दचकलास रे?'

मी जें विसरायचा प्रयत्न करीत होतो त्याचीच नेमकी आठवण मथुरा काढीत होती! पुन्हा तिनंच विचारलं.

' स्वप्न पडलं होतं?'

' हुं!'

' कसलं?'

' महा भयंकर'

' मला नाहीं सांगणार?'

' हुं'

' काय दिसलं तुला?'

' एक डाकीण!'

' डाकीण?'

' हो!'

' काय केलं तुला तिनं?'

' मला नाहीं तुला.'

' हो तुझ्या अंगावर धांवून आली ती!'

‘ हत् वेड्या ! अन म्हणून तूं भ्यालास होय ? ’

‘ हुं ! ’

‘ त्याच्याऐवजीं जर... ’

‘ काय ? ’

‘ तिची नरडी दाबली असतीस तर... ’

‘ हुं ऽऽऽऽ ’

असा एक दीर्घ उसासा सोडल्यावांचून मी कसा काय करणार होतों ? तिला हें सारं सांगून काय उपयोग होता ? तें स्वप्न पुन्हां मला आठवलं, कसले तरी भीतीचे शहारे माझ्या अंगावरून चमकून गेले. मी थोडीशी चुळबुळ केली. मथुरेनं ओळखलं वाटतं तें. ती हलक्या आवाजांत माझ्या कानांत कुजबुजली.

‘ पुन्हां भ्यालास होय ? ’

‘ मला फार फार भीति वाटते ग ’

किंचित सैल केलेली गळ्याची मिठी तिनं अधिकच आवळली. मला पुन्हां तिनं उराशीं ओढलं.

पण...रात्रीसारखं माझं समाधान मुळींच झालं नाहीं. थोड्या वेळांत मी तिला विचारलं,

‘ माझ्यावर तुझं प्रेम आहे नाहीं ! ’

‘ हो ! फार फार आहे ! ’

‘ अन माझंही तुझ्यावर अतिशय प्रेम आहे ! ’

नेमकीं स्वप्नांतील वाक्यं होतीं हीं ? मला पुन्हां आठवण झाली त्याची, मी घोगऱ्या आवाजांत तिला म्हणालों.

'मला फार फार भीति वाटली !'

'कशाची ?'

'त्या स्वप्नाची !'

'इतकं कां भयंकर होतं तें ?'

'फार फार भयंकर ! ती बघ. ती डाकीण. ती... नागीण. ती का......क......का......'

ओठ आवळले मी नि डोळे घट्ट मिटून घेतले ! अन माझं मस्तक मी पुन्हां मथुरेच्या कुशींत खुपसलं !

नि काय आश्चर्य !

मला झोंप लागली !

मी ज्यावेळीं उठून बसलों...त्यावेळीं माझ्या शेजारीं मथुरा नव्हती ! असं झालं कसं ? म्हणून मी डोळे चोळणार तोंच.

ठण...ठण...ठण...

घड्याळानं दहाची वर्दी दिली ! खडबडून उठलों मी, नि वेड्यासारख्या हांका मारीत सुटलों...

मथुरा ! मथुरा !! '

माझ्या हांका ऐकून मथुरा आलीच नाहीं, आली ती उषा. अन तीही हंसतच...

लाडीकपणें तिनं माझ्या गळ्यांत हात घालून विचारलें,

'काय हवंय तुला ?'

'मथुरा कुठंय ?'

'तिचा डोळा लागलाय'

'किती वाजले ग ?'

‘ दहा.’

‘ बापरे !’

असं म्हणून मी आळोखे पिळोखे दिले. उषेच्या गालांवर एक टिचकी मारून म्हटलें.

‘ आम्हांला एक गोडगोड चहा देणार कां करून ?’

‘ किती गोड हवा ?’

‘ अगदीं तुझ्या इतका !’

‘ इश्श ! हें रे काय ? अशानं आम्ही नाहीं जा !’

‘ ओहो ! किती गोड लाजतेस ग तूं ? ’

‘ बघ हं बाळ...’ तिनं गाल फुगवले !

‘ बरं नाहीं जा ! चहा तर करशील ?’

अन् ती पोरगी धांवली.

मी पुन्हां कामावर गेलों नाहीं. ‘सिक रिपोर्ट’ पाठविला. तीन दिवसांची रजा काढली नि ठरवून टाकलं कीं...

पण छे ! जें ठरवलं होतं तें इतकं का सोपं होतं ? वास्तविक जें आपण ठरवतो तें कधींच सोपं नसतं अन् मला तर......

तें विचित्र स्वप्न. ती मुग्धमयी कामीनी कांता. तिची स्मृतिशय्या.

सारं सारं विसरायचं होतं. पण काय दैवदुर्विलास पहा ! मी तें कधींच विसरूं शकलों नाहीं. चेंडू आपटला कीं दुप्पट वेगानं उसळतो ! मी आठवण विसरण्याच्या उद्योगास लागलों की नेमकी आठवण येई. तिचा स्फोट होई. तिला धक्क्यानं माझ्या निश्चयाचे तुकडे तुकडे होत ! कश्या विचित्र

परिस्थितींत ते तीन दिवस मी घालविलें तें माझं मलाच माहीत - जिवाला चैन नव्हती. डोळ्यांत झोप नव्हती. जिव्हेला चव नव्हती. मनाला उसंत नव्हती.

'कांता ! कांता !!' असं माझं मन घोकूं लागलें कीं त्याच्या दुप्पट जोरानं मी.

'मथुरा ! माझी मथुरा !!' असं ओरडे !

त्यानेंही शांती होईना म्हणून मी वेड्यासारखं 'मथुरा ! मथुरा !!' असं कागदावर - हातावर भिंतीवर अन् जिथं लहर लागेल तिथं लिहित सुटलों. तें पाहून मथुरेला हंसूं फुटलं. नाहीं तरी मी हास्यास्पदच झालों होतों म्हणा ! मन करुणास्पदही !

'मथुरेचं बरंच वेड लागलंय हं !'

'खराच मी वेडा झालोय ग !'

'पण हें कांहीं बरं नव्हे'

'काय बरें नव्हे'

'असं वेड लागणं'

'कां ?'

'वेड म्हटलं कीं तें वाईटच कीं !'

'खरंच तें !'

मथुरेला वाटलं आपल्यालाच तो होकार दिला, पण खरंच तें ! हे उद्गार निराळ्याच अर्थी होते. कांतानं मला वेडं केलं होतं - तेंच खरं होतं. अशी ती कबुली होती, वेड्या मथुरेला कशी समजावून सांगू मी !

क्रियेस प्रतिक्रिया झाली नि विशेषतः क्रियेपेक्षां प्रतिक्रिया

हिणकसं ठरली तर क्रियेचा जोर दुप्पट होतो कीं काय कुणास ठाऊक !

पण तसं कांहींसं माझं झालं एवढं मात्र खरं !

कामांत तरी मन द्यावं म्हणून मी कामास गेलों ! एक दिवस बरं वाटलं. माझं मन उल्हासित झालं, पण ...

हा पण ... माणसाच्या जीवनांत जिथं तिथं नडतं ! नडणारं थोडंच आहे तें एक !

नेहमींप्रमाणें मी कॉंग्रेस कचेरींत कामावर आलों नि नेमक्या दुसऱ्या दिवसाची गोष्ट—

कसल्यातरी गुंतागुंतीच्या कामांत मी गुंतलों होतों. तोंच शिपाई आंत आला.

'साहेब !'

'हुं !'

'एक बाई भेटायला आल्याती'

'कोण ?'

'बाई .'

मी केवढ्यानदां दचकलों होतों. मला वाटलं पुन्हां कांताच येणार. बाई भेटायला आली असं म्हटलं कीं मला वाटायचं बाई म्हणजे कांतेशिवाय कोण असणार ? अन् कांतेची आठवण झालीरे झाली कीं मन असं दचके ! आतांही तसंच दचकलं तें. पण समोर पट्टेवाला उभा होता. त्याच्यासमोर असला भाव दाखविणं बरं दिसणार नाहीं ह्या विचारानं मनांतील विचार मनांतच दाबले नि थोडंसं हंसल्यासारखं करून त्याला सांगितलं.

' हं ! जा. घेवून ये आंत तिला ! '

अन् नेमकं ज्याला मी दचकत होतों, घाबरत होतों, विसरण्याचा प्रयत्न करीत होतो, अन ह्या साऱ्यावर ताण करून जिकडे माझं मन ओढ घेत होतं तीच ती कांता माझ्या समोर येवून उभी राहिली.

मी तिच्याकडे डोळे ताणताणून पाहिलं.

गालांतील गालांत ती हंसत होती अन तश्यांतही मनाच्या स्थितींत.

हंसण्यामुळें तिच्या गालावर पडणारी खळी म्हणजे जगांतील अदृश्य असलेली सौंदर्यवस्तु वाटली मला.

मी गोंधळलों. ती शांत होती.

' नमस्कार ' ती म्हणाली.

' बसा ! ' म्हणणं मला भाग होतं. मी कांहींसं तिच्याकडं–कांहींसं टेबलावरील कागदपत्रांकडे पहात होतों.

' मला देण्यासारखी आहे ना जागा ? ' माझ्या ऑफिसांत संगीत सुरूं झालं.

नाग डोलावा तशी मी मान डोलावली !

' कुठें ? '

' इथंच '

' अगबाई ! ह्या इथें ? '

तिच्या त्या अभिनयानें मला हसवलं. मी म्हटलं.

' इथंच म्हणजे ह्या ऑफिसांत. आमचा टायपिस्ट नुकताच गेला ` कायमचा. ती जागा आहे रिकामी, किती स्पीड ( Speed ) आहे तुमचा ? '

'अंऽऽ स्पीड होय?' तिची ती स्वतःशींच उच्चारलेली वाणी एकाद्या बालकासारखी मनोहर वाटली मला. लगेच ती हंसली. तिच्या गालावर खळी फुटली. तिकडं पहायला सांपडावं म्हणून मींच म्हटलं.

'टायपिंग येतं ना?'

'अय्या! म्हणजे? धांवणाऱ्या झऱ्याचा खळखळाट कुणी ऐकलाय कां?'

'मग विचार कसला करताय्?'

'नाहीं म्हटलं, स्पीड सर्टिफिकेट प्रोडयूस करायला हवं कां?'

'छेः! छेः!! तुमच्यावर माझा विश्वास बसेल कीं, केव्हांपासून यायचं कामावर?'

'ह्या क्षणापासून'

माझी तरी थट्टा नाहीं ही?'

'भलतंच!'

माझ्या ह्या उद्गाराचे तिला काय नवल वांटल कुणास ठाऊक! पण तिच्या शुभ्र दंतपंक्ति पाहाण्याचं भाग्य लाभलं मला!

'मग?'

'चला तुम्हांला दाखवतो सारं.'

एक अलभ्य लाभ झाला म्हणजे लहान मूल जसं आनंदानं उड्या मारूं लागतं ना? अगदीं तसंच झालं मला. विलक्षण आनंदाच्या उर्मींचं वर्तुळ माझ्या मनांत उत्पन्न झालं. दुःख पळालं. संकोच सरला. भीति भ्यायली, विचार अवि-

चारी झाले. मन आनंदलं...

मी ऑफिसांत आलों, मला भास झाला, जणुं पुन्हां पट्टेवाला आला होता. 'बाअी आल्याती असं पुन्हां सांगत होता. मी पुन्हां दचकलों.. 'अ ऽऽ स्पीड होय? पुन्हां कांतेच्या गालाला खळी पडली होती. कधीं कधीं चंद्राला खळं पडते ना? तसं वाटलं मला. पुन्हां मी निरखून पाहूं लागलों. पुन्हां साऱ्याचा मुग्ध मधुर विचार ऐकूं आला मला. भलतंच ! 'हे माझे शब्द मी पुन्हां ऐकले...

अन मी पुन्हां झोंपेंतून खडबडून जागा झालों...

''काय केलं मी हे? केलं ते बरोबर आहे का?' कुठून कुणास ठाऊक मला कुणीतरी विचारलं, खाडदिशीं माझी सुखस्वप्नं, मंगल अन कसल्यातरी वेदनेनं माझं हृदय विव्हळलं!

झालं ते योग्य कां? कांतेशीं आपण जी सलगी केली ती योग्य होती कां?

कां तें स्वप्न होतं? सत्य नव्हतं?

हजारों इंगळ्या कडकडून चावूं लागल्या मला. दुखावलेल्या सापाला मुंग्या लागल्या म्हणजे साप जसा तडफडतो ना? तसं माझं मन तडफडूं लागलं.

'पाप आहे हें! मथुरेशीं—प्राणप्रियेशीं केलेल्या विश्वासघाताचं पाप आहे हें! मथुरेला मी फसवलं. तिचा गळा कांपला! केवढा घोर अन्याय हा!...'

अन चटकन मला तें रात्रीं पडलेलं स्वप्न आठवलं- भयकर स्वप्न ते.

जिवाला चैन पडेना! स्वस्थता लाभेना. काय करावं

हे सुचेना. काय केलं ते आठवेना. काय झालं हे कळेना. माझ्या कानांत कानठळ्या बसत होत्या.

'पाप!'

'विश्वासघात !!'

'अन्याय !!!'

'फसवणूक......'

आणखीन् कितीतरी!

माझं डोकं भडकलं. मी उठलों, नि सरळ घरीं आलों.

दरवाज्यांतील एका खुर्चीवर मथुरा बसली होती. कांहींतरी चाळा हवा म्हणून ती विणीत होती. माझी नजर तिच्याकडे गेली...

तिची नजर सुयांशीं एकजीव झाली होती. तिचं तें चंद्रानन.

किती निष्पाप,

किती सरळ,

नि किती सुंदर, भासत होतें.

अन्...अन्...

अशा माझ्या प्राणप्रियेशीं कारण नसतां मी प्रतारणा केली होती.

'प्रतारणा? हो! हो!! प्रतारणाच नव्हे तर काय?'

गाडीला ब्रेक लागावा तशी माझी नजर खाडदिशीं खाली पडली! तिच्या नजरेला नजर द्यावयाचं धैर्य माझ्यांत

उरलं नाहीं ? कुठल्या नजरेनं पाहाणारं मी तिच्याकडं ? ह्या...ह्या...सुकुमार कोमलांगी पुष्पाचा धिक्कार. तिच्याशीं प्रतारणा केली होती ना मी ?'

हाय ! हाय !!

जिच्यावर मी अपरंपार प्रेम केलं ! बाळपणासून जिला मी माझ्या हृदयांत साठवलं ! तरुणपणीं जिची पूजा मी मनोभावें केली ! जिला मी आपली म्हणून जवळ केली! जिच्याशीं मी लग्न लावलं नि जिचं माझ्यावर प्राणापलीकडे प्रेम होतें अशी अशी - मथुरेची ती निष्कलंक तेजोमयी- प्रेम मयीं मूर्ती मी माझ्या हातांनीं दुभंगवली नव्हती काय ?

चोरासारखा खालच्या मानेनं मी घरांत शिरलों. मला आठवलं - मला पाहातांच मथुरा मधुर स्मित करी मीही करी पण आज...

दुर्दैव माझं !

त्या मधुर स्मितालाच नव्हे -तर त्या बाळपणांतील सौख्याला - तरुणपणांतील प्रीतीला - प्रीतींतील सौजन्याला कायमचा तर मी मुकलोंच मुकलों -

पण तारकाची शोभा - चंद्रिकेची शीतलता दुरून देखिल मला पाहवत नव्हती. तें ध्येय कुणीतरी चोरून नेलं होतं जणूं -

गुपचूप मी चोरासारखा आलों. मथुरेची नजर चुकवली. तिच्या अंगावरून अपराध्यासारखा निघून गेलों ..

आतां मात्र सारा मनःस्ताप असह्य झाला !

मी धांवलों ! बिछान्यावर जामानिम्यासरसी जाऊन पडलों ! हो ! कोण आतां मला माझे कपडे हौसेनं उतरण्यास

मदत करणार होतं ? अन पुरुषासारखा पुरुष असूनही मी एकाद्या अबलेप्रमाणें उशींत मान खुपसून रडत सुटलों !

काय रे माझ्या दुर्दैवा !

मला कांहींच समजत नव्हतं ! माझं शरीर जणुं बधिर झालं होतं !

पण ...

कुणाची तरी चाहूल मला लागली. हलक्या पावलानं कुणीतरी आलं. हळुं आवाज न होतां कुणीतरी माझ्या खोलीचं दार बंद केलं. अन् किती जवळ ती चाहूल ! निश्चित् ती माझ्या कॉटजवळ उभी होती ! ती कोण ? माझ्या मथुरेशिवाय दुसरं कोण असणार ?

' कोण ? मथुरा ? '

एकप्रकारच्या भीतीनं माझं अंग शहारलं.

क्षण्– दोन क्षण् हालचाल कसलीच झाली नाहीं. मग मात्र मथुरा कॉटवर हलकेच बसली. कॉटचा झालेला कर्र र्र र्र आवाज देखिल केवढा मोठा वाटला ! जणुं बॉम्बचा स्फोटच तो ! माझी छाती धडधडूं लागली. मला भीती वाटूं लागली. आतां काय होणार ? कसं होणार ? याची भयंकर धास्ती वाटूं लागली.

तिनं उशी दूर सारली नि हांक मारली

' बाळ ! '

काय नव्हतं तिच्या त्या हांकेंत ! आईची वत्सलता-प्रणयिनीची प्रीति– सखीची सहानुभूति– जिवलगाचा जिव्हाळा नि ममता ...

मला अगदीं गहिंवरून आलं ! एक जोराचा हुंदका

मी दिला ! नि नजर लपविली !!

मथुरेनं माझी आंसवं पुसण्याचा प्रयत्न गेला.

पण त्यावेळीं जणुं माझ्या अंगीं सैतान शिरला होता.

मी झटकन तिचा हात दूर लोटला.

मला वाटतं या करण्यानं तिला वीजेचा शॉक बसला ? पण ही वेळ आश्चर्य करण्याची नव्हे हेंही तिनं जाणलं. पुन्हां त्याच त्या ममतेनं तिनं हांक मारली.

' बाळ ! ' नि माझ्या केसांवरून हात फिरवूं लागला.

तोहि हात एका हिसड्यासरशी मी झटकला नि कांहींशा रडक्या स्वरांत— कांहींशा हुकमी स्वरांत— कारण त्यावेळीं माझ्या सुरांतील अर्थ कसा होता हें माझं मलाच सांगता येणार नाहीं. मी ओरडलों.

' कां छळतेस मला तूं ? जा. जा. इथून ताबडतोब जा. मला एकलेपणा हवाय. जा. तूं जा. '

तरीही मथुरा हलली नाहीं.

तिच्या स्वरांत पूर्वीपेक्षांही ममतेची माधुरी आली नि ती म्हणाली.

' असं काय बरं बाळ ? काय झालंय तुला ? '

' आग लागलीय. समजलं ? '

' बाळ मला नाहींच कां सांगणार तूं ? '

' आधीं बाहेर हो पाहूं तूं ! एक अक्षरही बोलूं नकोस माझ्याशीं ! '

' पण बाळ... '

' तूं बहिरी आहेस का ग ? '

...तिचं बोलणं बंद झालं खरं ! पण माझी काहली कांहीं केल्या थांबेना. थोड्या वेळानं ती उठून गेली नि मोठ्या प्रयासानं आवरून धरलेले हुंदके मी मोकळे केले.

'मथुरा ! मथुरा !! सारखं माझं मन जपूं लागलं नि हुंदके देऊं लागले...

ती रात्र कशी घालविली मी ? माझ्यासारखीं माझ्या जीवाची सारखी तडफड फडफड चालली होती. हजारों विचार मोहोळच्या माशासारखे उठत. त्या कडकडून डसत नि नको नकोसं करून टाकत.

'क्षमा !'

मी कुठल्या तोंडानं हा प्रश्न उच्चारूं ? कुठल्या नजरेनं मी मथुरेकडं पाहूं ? तिनं मला क्षमा कां करावी ? तिचा केवढा अपराध करून बसलों होतों मी अन तिच्याशीं मीं कधींच इतक्या निष्ठुरपणें वागलों नव्हतों. तिलाही माझ्याही दुःखाची आंच नव्हती कां लागली !

असा. असा प्रसंग आला होता का कुणाच्या जीवनांत ? केवढं दुर्भाग्य हें ?

किती नि कसा धिक्कार करावा स्वतःचा हेंच समजलं नाहीं. मला 'नीच ! पापी ! विश्वास घातकी !' सारी सारी जगांतील वाईट विशेषण मला बरोबर लागूं पडत नव्हती कां ?

पश्चात्तापेन शुद्धती !

छे !! कुणा लेका महामूर्खानं हें लिहिलंय कुणास ठाऊक ? ज्यावेळीं त्याला हें वाक्य सुचलं त्यावेळीं बहुधा त्याची सारी अक्कल पार लयालाच गेलेली असली पाहिजे !

कारण कारण...मला काय पश्चात्ताप होत नव्हता ! त्या आगीनं मी काय होरपळत नव्हतों ! पण पण...शुद्धती !

नीच झालों मी. पापी ठरलों. विश्वास घातकी बनलों. अन...अन...असा तसा पापी नव्हे तर प्रिय माणसांवर मी निर्दयपणें प्रहार करणार होतों. माझ्या आत्म्यालाच मी जगांतून पारखा करणार होतों. माझ्या आवडत्या ताजमहालावर मी तोफ डागली होती. ज्या वृक्षांचं लालनपालन केलं त्या लतेला मी उन्मळून टाकणार होतों. तिच्या जीवनाचं मातेरं करणार होतों. तिला दुःखसागरांत मी लोटत होतों,

पण—

ह्या जाणीवेंत कशी शुद्धी होणार ? जें पाप मी केलं त्या पापाचा उच्चार करण्याचं धैर्य त्यामुळं कसं येणार ?

मी स्वीकारलेल्या—मी मथुरेनं विश्वासानं दिलेल्या प्रीतीधनाला अव्हेरणार...

कसं नि काय सांगू तुम्हांला ?

ती भयानक रात्र—ते भयानक विचार—सारं सारं कसं चक्क डोळ्यासमोर उभं राहातं नि आतां घेरी येणार खचित असं वाटतं...

एका शतकानं जणूं ती रात्र सरली. दिवस उगवला, प्रकाश फांकला. पण माझ्या हृदयांत अमावास्येचा गडद काळोख नाचत होता. प्रकाशाच्या किरणांचा एक कवडसाही त्या ठिकाणीं नव्हता!

हा अंधःकार घालविणार कोण? प्रकाश देणार कोण? माझ्या शुष्क झालेल्या हृदयाला शीतलता आणणार कोण? कोण माझं समाधान करील? कोण ही हृदयांत उफाळलेली

आग विझवील? कोण...कोण करील हें सारं? हो! केलं असतं–माझ्या मथुरेनं माझं शांतवन केल असतं–पण तिच्या नजरेला नजर द्यावयाची देखिल लाज वाटत होती तिथं...

ठण् ... ठण् ... ठण् ...

घड्याळांत दहाचे ठोके पडले! माझी विचारमालिका तुटली. मी उठलों. अंगावरचा सूट तसाच होता, तोच थोडा नीटनेटका केला ... नि बाहेर पडणार तोंच ...

मथुरा आंत आली ...

ती कांहीं बोलणार तोंच मी दार उघडून बाहेर सटकलों गेलों!! भ्रमिष्ठासारखं कुठेंतरी हॉटेल गांठलें! तें वेंचक अन्न कसंबसं घश्याखालीं उतरवलं नि मुकाट्यानं ऑफिसचा रस्ता धरला.

पट्टेवाल्यानं एक पाकिट आणून पुढ्यांत ठेवलं.

पाहातांच तें मी ओळखलं. माझ्या शरदचें तें पत्र होतें. अधीरतेनें तें मी उघडलं. अनावर आसक्तीनं तें भराभर हावऱ्यासारखं वाचलं. अन् काय आश्चर्य! तें पत्र एकदां नव्हे तर दहादां वाचलं मी. पण समाधानाचं नांव नव्हतं. चिंतेची सांवली नव्हती. कांहीं कांहीं नव्हतं. होतं नव्हतं तें सारं जणूं त्या पत्रानं माझ्या मेस्मेरिझमचे प्रयोगच सुरू केलें होतें. एवढेच नव्हे तर ..

मला समाधान मिळालं, शांतता लाभली नि चटकन् तोंडांतुन उद्‌गार गेला, खरा वीर आहेस तूं शरद!'

तें पत्र होतंच मुळीं तसं. बंगाल प्रांतिक सरकारनं त्याला जाणलं होतं.

तो एम्. एस्. फर्स्ट क्लास फर्स्ट होता. तो त्याच्या जीवनांतील क्रांतीचाच-विजयाचा—कार्याच्या सुरवातीलाच क्षण होता, त्यानं सारं मिळवलं होतं. अन मी...

सारं घालवून बसलों होतों. अन...अन तेहि स्वतः-च्याच मूर्खपणामुळं !

त्यानं लिहिलं होतं.

मला जे हवं होतं तेच कसं नेमकं मिळालं बघ. माझ्या जीवनांतील काव्याची नि कार्याची सुरवात एकदम करणार मी ! सुखाचा स्वर्ग—आनंदाचं नंदनवन. सारं, सारं कसं अपुरं ठेंगणं वाटूं लागलंय मला ! बाळ ! बाळ !! काय सांगू तुला मी ! हर्षाच्या हिंदोळ्यावर वरच्या गतीनं हेलावत असलेल्या माझ्या हृदयांतील हर्ष सुखाच्या साऱ्या सीमा ओलांडून परीसीमा गांठलेल्या माझ्या आत्म्याला सजीव करतां आलं आणि त्यानं जर आत्म्याच्या आनंदांतील उन्मादाचं चित्रण केलं तरच समजेन तुला तें...

अन्...अन्...शरद ह्या तुझ्या वाक्यांतील गोड गोड शब्दानं माझा हरवलेला खजिनाच जणूं पुन्हां मिळा-लाच मला.

माझ्या मनानं एकदम उचल खाल्ली...

आपल्याला नाहीं का हें सुख मिळवितां येणार ?...

कां ? कां नाहीं येणार ? आपल्या हाताशीं-आपल्या ताब्यांत नाहीं का तें ? अन् असं असूनही त्या सौख्याला आपण कां भ्यावं ? ...

' कांता ? जिच्या विषयींच्या अनावर आसक्तीनं माझं मन वेड झालं आहे—जगांतील साऱ्या सुखाची गुरु-

किती माझ्या जवळ असतांही वेड्यासारखं मी माझ्या मनाला का लगाम घालीत होतीं ? कुठल्या आशेनं ? कुठल्या पापानं ? नि कोणत्या पुण्याईनं ? ”

छेः !, कां भ्यावं मी मथुरेला ? असेल माझ्यावर तिचं प्रेम, माझंही असेल तिच्यावर प्रेम, म्हणून काय झालं ? ज्या प्रेमांत काडीचंही सुख नाहीं तें कवटळण्यांत काय अर्थ ? मथुरेविषयींच्या अनावर आसक्तीनं माझं मन कधीं असं अनावर झालं होतं ? बरं, मथुरेचं तरी ? नको - नको - ज्या प्रेमांत काडीचाही खळखळाट नाहीं - ज्या प्रेमांत उन्मादाच्या गगनचुंबी लाटा उसळत नाहींत, ज्या प्रेमाच्या स्पर्शानं साऱ्या शरीरांवर थरारून रोमांच उठत नाहींत तें कसलं प्रेम ? ज्या ठिकाणीं प्रीतीचा प्रवाह संथ असतो - ज्या वेळीं प्रेमानं भारलेलीं मनं - वादळापूर्वीच्या शांततेंत चूर असतात अन् ज्या प्रेमांच्या अलिंगनांतून काडीचाही उन्माद तरुण-तरुणींना होत नाही तें प्रेम सुखेनैव नि सुखासाठीं कां लाथाडूं नये ? नव्हे लाथाडलं पाहिजे.

माझी कांता ..

लाडीकपणें लुकलुकणारे तिचें ते दोन नयन -

सदा प्रीतीच्या आवेगानं थरथरणारे तिचे ते दोन ओठ ...

अन् .. अन् ..

कधीं कवटाळीन असं वाटवणारे तिचें ते दोन भरदार डौलदार उरपोज ..

ही आसक्ती - हा उन्माद - हा मान कधीं कोठें मथुरेच्या बाबतींत झाला होता काय ? असेल मथुरा सुंदर !

हा पण नुसतं सौंदर्य काय कामाचं ? जें सौंदर्य मनांतील भावनांना गदगदा हलवूं शकत नाहीं तें सौंदर्य सौंदर्य नव्हे मुळीं ! तें सौंदर्याचं सोंगच ! प्रीतीच विडंबनच ! हो हो ! विडंबनच ! कसली आमची ती प्रीति ! कुणाला पटो वा व पटो - तें विडंबनच यांत शंका नाहीं ! अन् नुसती विटंबना नव्हे तर प्रतारणाही ! जीवनभर का अशीच करायची प्रतारणा ? मरेपर्यंत का त्याच त्या कुट्ट नि कुजट डबक्यांत हात मारीत बसायच ? तेंच ते रडके सूर का पुन्हां पुन्हां अैकायचे ? त्यापेक्षां त्यापेक्षां ..

मथुरेला सारं सांगावं,

बाजूला सारावं,

नि कांतेची प्रीति— प्रीतीचं सौंदर्य नि सौंदर्याचा उन्माद हृदयांशीं कवटाळावा !

बस्स ठरलं !!

ह्यापुढें विचार नाहीं ! अविचारच !

ह्यापुढें लगाम नाहीं ! बेलगामीच !

कांता ! कांता !! कुठं आहेस ग तूं माझ्या लाडक्या कांते ! ये, ये ना अशी जवळ एकवार कडकडून मिठी मारूं दे मला. नि मग... मग...

या विलक्षण आनंदानं शरीरावरील शीरन् शीर कशी तट्ट फुगून गेलीय ! त्या मुर्खबुद्धीला जेवढा आनंद झाला असेल बुद्धावेळीं—तेवढा आनंद झाला होता मला ! चार दिवस दोनच दोन गोष्टींचा विचार मी केला.

एक म्हणजे मथुरेला न दुखवतां तिला कसं सांगून

समजावयाचं ?

नि दुसरा म्हणजे मला हवी असली कांता कशी जिंकायची ?

तिची ती कमनीय नि रेखीव शरीरयष्टी. अंगांत मुसमुसलेलं तारुण्य. खळबळून राहणारा तिच्या अंगांतील तो उन्माद. तिच्या अवयवांच्या ठिकाणीं ती रसरसलेली परिपक्वता...

कसा लुटायचा तो ? तिची प्रीति कधीं जिंकायची ? तिच्यावर मालकी केव्हां गाजवायची ?

या विचारानं मी ताळतंत्र सोडला. कांता कचेरींत कुठं दिसली रे दिसली कीं माझ्या अंगांतील रक्त सळसळूं लागे ! जोराची उसळी घेवूं लागे ! अनावर होई तें ! अन् वाटे, कशाचीही लाज बाळगूं नये, भीडमूर्वत ठेवूं नये नि ती दिसल्या ठिकाणीं भर कचेरींत तिला हृदयाशीं घट्ट कवटाळावं नि तिच्या लवलवणाऱ्या ओठांचं दीर्घ चुंबन घ्यावं !!

देवा ! कसंही करून येवढं धर्य देच मला !

देवानं खैर केली ! दैवानं हात दिला ! प्रीतीची परिसीमा संपली ! अन् आजचा हा क्षण...आज मी नि कांता. हो ! कांता नि मी.

एकाच खोलींत एकमेकाजवळ नि पूर्ण ऐकांतात होतो. सुवर्णसंधी होती ही मला ! कांताही माझ्यावर अनुरक्त होती हें खास. मी तिला जिंकलं होतं हें निश्चित अन् आज युद्धांतील शेवटचा डाव टाकायचा होता. माझं मन मला उघडे करायचं होतं !

आणीबाणीच्या ऐन प्रसंगीं मोठमोठे रणझुंझार देखिल

कच खातात म्हणे !

कांतेला—जी माझ्याजवळ होती नि जिच्यावर माझी नव्हे माझ्यावर जिची पूर्ण हुकमत होती त्या कांतेला शेवटचं सांगायचं होतं मला.

काय ? हेंच कांते ?...

माझ्या लाडक्या कांते! तूं एक लावण्यवती स्त्री, चतुर सहचारी, अन् माझी आवडती प्रेयसी आहेस ! माझं तुझ्यावर प्रेम आहे, तूं मला हवी आहेस. आकर्षक शरीर तसंच तुझं प्रेमळ हृदयही हवंय मला. तुझ्याशीं लग्न करावयाचं आहे मला. तुझ्या धनावर आसक्तीन, तुझ्या मुसमुसलेल्या नि रसरसलेल्या तारुण्यानं—तसंच तुझ्या हळुवार, सहृदय, प्रेमळ हृदयानं मला अगदीं हळव करून सोडलंय ! मला तुझं वैषयिक शरीर हवं. तसंच मानसिक सौंदर्य हवं ! 'स्वतःच्या नैसर्गिक भावनांना बंधारा न घालतांना, निर्धास्तपणें आपल्या प्रिय-करांच्या गळ्यांत गळा घालणारी निष्कपट, प्रामाणिक ललना मला प्रिय आहे. तीन तरुणी !— अशा ललनेपैकीं तूं आहेस ! अशा ललनेच्या शोधांत मी रात्रीचे दिवस घालवले आहेत. अशी ललना नव्हती म्हणून मी सुखी होऊं शकलों नाहीं. तशी तूं मला सांपडलीस. नुसतं तुझं प्रमत्त शरीरही नको वा नुसतं 'प्लॅटोनिक' हृदयही नको. दोन्ही हवीत मला. चल कांते मला रुकार दे. जगांतील कुठलीही शक्ती आतां आड आणूं नकोस. आपण लग्न करूं. एकमेकांच्या गळ्यांत गळां घालूं—जीवनाचा स्वर्ग करूं.—बागेचं नंदनवन करूं—उठ कांते ! मला रुकार दे—मला अलिंगन दे—देशील ना ? हो ! हो !! देच दे ! अनिवार झालोय मी !'

असंच कांहींतरी काव्यमय बोलायसाठीं माझी जीव्हा वळवळत होती. त्याच फिकीरींत ती होती ? कसं बोलावं हेंच सुचत नव्हतं. बोलावंसं वाटत होतं पण बोलवत नव्हतं. भावना निव्वहळ झाली होती पण धजत नव्हती.

हृदय उचंबळून आलं होतं पण गात्रं शिथिल झालीं होतीं.

त्यामुळं त्रासिक झालों होतों मी : ...

अन् माझी लाडकी कांता मला विचारीत होती...

'कशानं तरी तुझं मन दुःखी कष्टी झालंय हें खास ! पण माझ्यापासून तुला हे लपवून ठेवावयाचं आहे ! होय ना ?...'

अगदीं माझ्या हृदयांतील बोललीस तू कांता !

किती चतुर-लबाड-लाडीक आहेस ग तूं !

आपलीं मनं कशी एक आहेत नाहीं ?

पण...पण...

वेडे ! हे कसं मी तुला सांगू ? कुठल्या शद्बानं तुला मी समजावूं ? सांग कांते ? अन् हें सांगायला कां हवं ?

स्त्रियांना म्हणे दिव्य दृष्टी असते...

तुला नाहीं का ही ?

तुझ्या दिव्य दृष्टीला माझं हें उफाळलेलं हृदय नाहीं का दिसत ? माझ्या भावनेना आलेला पूर तुला नाहीं का ओढावत ?

सांगू कांते ! वेडे ! कसं सांगू मी तुला ?...

• • •

श्याम नुकतीच नोकरीवरून आली होती. श्रमांमुळं तिचा चेहरा किंचित् म्लान झाला होता. थकली होती ती. अन् थोडी हुशारी यावी यासाठीं मुखावरून गार पाण्याचा हबका मारीत होती.

तोच मोलकरीण घाईघाईनं धांवत आली नि ओरडली.

'बाई ! बाई !!'

'काय ग ?'

'बाहेर कुणी आल्याती.'

'कोण आलंय ?'

'एक बाई हंय बघा'

'एक बाअी ?'

'हं !'

'आलेच हं !'

तिनं तोंड पुसलं. ती व्हरांड्यांत आली नि चकितच झाली.

मथुराच ! हो ती मथुराच कोचावर बसली होती.

क्षणभरच ती विस्मयचकीत झाली नि तिनं हांक मारली.

'मथुरा !'

‘ श्यामा ! ! ’

दोघींजणींही थांबल्या नि परस्परांच्या आलिंगनांत बद्ध झाल्या.

‘ मला चकित करायचं होतं वाटतं ? ’

‘ नाहीं ग ! ’

‘ मग कशी ग न कळवतांसवरतां आलीस ती ! ’

‘ अय्या ! न कळवतां नव्हतं ! ’

‘ छे ग ! कळवलं असतं तर मी नसते आले स्टेशनावर ? ’

‘ मी किती बाई घाबरून गेले होते ! ’

‘ कां ? ’

‘ अग, स्टेशनवर तुमच्यापैकीं कोणीच नाहीं, मला शहराची माहिती नाहीं. नवखीच मी ! म्हटलं– एवढ्या मोठ्या शहरांत माझी श्यामा कशी भेटणार मला. ? ’

‘ आतां भेटली ना ? ’

श्यामाच्या डोळ्यांत हर्ष लकाकला.

हो ! अशी होकार देऊन मथुरेनं लाडिवाळपणें तिच्या मानेभोवतीं हात टाकले.

‘ किती खराब झालीस ग तूं मथुरे ! ’

‘ मी ? एक माणूस किनई सुटायच्या बेतांत आहे म्हणून वाटतंय त्याला तसं. नाहीं ? ’

‘ चल ! इतकी का ग मी सुटलेय ? ’

‘ कलकत्याच्या पाहुणचाराची पद्धत वेगळी आहे का ग ? ’

' म्हणजे ? '

' अग- मी आलेली दमलेली ... '

' समजलं. समजलं हं ! पाहुणा म्हणायला वाटतं का कांहीं ? '

' त्यांत ग काय वाटायचंय ?'

' हं ! ' श्यामानं तिच्या गालांवर चापट मारायचा आविर्भाव करून म्हटलं - ' मी नाहीं हं तसं म्हणून देणार तुला ! ' अन पुन्हां लगेच श्यामा म्हणाली -

' केवढा आनंद झालाय मथुरे, मला - चल येतेस का माझ्या खोलींत ? '

श्यामाची खोली अगदी साधी नि सात्विक शृंगारानं सजवलेली होती. अष्टकोनी मेज होतं खोलींमध्यें ! त्याच्या भोंवतीं चार खुर्च्या ठेवल्या होत्या. एका कोपऱ्यांत पलंग होता. नीटनेटका अंथरलेला पलंगपोस स्वच्छ नि पांढरा शुभ्र होता. उशीवर गुड-लक कोरलेलं मोठं मोहक दिसत होतं. पलंगावर बसलं कीं पाठीमागच्या बाजूला एक खिडकी होती तिचा पडपा बाजूला सारला कीं खालीं सजवलेल्या बागेची मंद हालचाल दृष्टीस पडे. बागेंतील सुगंध वाहून आणणारा मंद वायु खोलींत जोरानें प्रवेश करी ! नि मग माणसाचं त्रासलेलं मन उल्हसित करी. अगदीं समोरच्या बाजूस उत्तम फ्रेम केलेल्या पांच तसबिरी हारीनं अडकवलेल्या होत्या. मथुरेची, बाळची, शरदची, श्यामाची नि सर्वांची मिळून ग्रुप तसबिरही होती तिथं -

खोलींत पाऊल टाकल्याबरोबर मथुरेनं चटकन न्याह-ळलं नि -

"दमले बाई!" असा उद्गार काढून ती पलंगावर आडवी झाली.

श्यामानं चटकन खिडकी उघडली, पडदा सारला नि मंद वाऱ्याची सुगंधी झुळुक आंत घेतली. ती अपुरी वाटूं लागल्यामुळंच कीं काय तिनें विजेचा वेड पंखा चालू केला नि पलंगावर येऊन मथुरेपाशीं ती बसली.

वाऱ्यामुळें मथुरेचे केस भुरुभुरु उडत होते! तिच्या कपाळावर येत होते वरचेवर. श्यामानं हळुवार हातानं ते मागें सारले, नि ती म्हणाली.

'किती सुंदर आहेत ग तुझे केस!'

एकीकडं ती बोलत होती. एकीकडं ती तिचं मुख न्याहाळीत होती नि दुसरीकडं मनांत विचार करीत होती.

'किती वाळलीय ही मथुरा? कशानं बरं? हिच्या नयनांतील चापल्या कशानं गंभीर झालं एवढं? हिच्या नस-नसांतून खळखळणारा परकऱ्या पोरीचा अवखळपणा कुठें गेला? अन तिच्या डोळ्याभोवतीं ही निळीकाळी दुःखानं भाजलेलीच जणूं वर्तुळं कुठून आली? दीडवर्षांत काय माणसं इतकी बदलतात? किती सुकलीय ही? अन खूपशीं दुःखें जीवनभर सहन केलेल्या आजीबाईसारखी छाया का हिच्या मुखमंड-ळावर? कशानं बरं दुःखी असेल ही? काय झालं असेल हिला?...

'श्यामा!' श्यामाची साखळी मध्येंच तुटली.

'आपला शरद...'

तिच्या मुखांतूनं एवढे शब्द बाहेर पडताहेत नाहींतं तोंच...

‘ श्याम ! श्याम !! ’

असा हांक मारीत अर्धवट चालत नि अर्धवट धांवत शरदच तिथें अवतरला.

अन खोलींत मथुरेला पाहातांच तो दचकून उद्गारला

‘ ओहा ! कोण ? मथुरा ? ’

‘ तुला अगदीं शंभरावर पांच हं शरद ? ’

‘ कशासाठीं ? ’

‘ अरे तुझें नांव काढायला नि तूं यायला एकच गांठ पडली ! ’

‘ तूं राहूं दे, केव्हां आलीस तूं ? कशी आलीस ? कळवलं का नाहींस ? अन् बाळ कुठंय ? ’

‘ अरे हो पण...किती घाई करशील तरी ! एकेकं प्रश्न विचार कीं. मी कांही पळून नाहीं चालले लागलीच.’

‘छेः ग ! पळून चाललीस तरी सोडतंय कोण तुला आतां ? ’

‘ म्हणजे काय इथंच अडकवून ठेवणार ! ’

‘ होय किनई ग श्यामा ? ’

‘ तें तुमचं तुम्ही घ्या बाई बघून. मी जरा आंत जावून येते. तोंपर्यंत बसा बोलत तुम्ही दोघंजणं ! ’

श्यामा उठतांच शरदनं तिचं मनगट पकडून ओढलं नि तो म्हणाला.

‘ बैस ग, कुठं चाललीस तूं ! ’

‘ जरा आंत.’

‘ कशाला काय नडलंय ? ’

‘ कमाल आहे बाई तुमची ! ’ मथुरा मध्येंच म्हणाली..
‘ अजूनही तुम्ही भांडतां वाटतं असं ? ’

तिच्या त्या उद्‌गारावर श्यामा खुदकन हंसली. हळूंच तिनं हात सोडवला नि धूम ठोकली आंत !

अन् ते चार दिवस कसे निघून गेले हे मथुरेला समजलं देखील नाहीं ! चुकून आपण स्वर्गात तरी नाहीं ना आलों असंही वाटलं तिला. ते चार दिवस म्हणजे...जीवनांत अत्यंत उत्कट सुखाचा क्षण—नव्हे अकल्पीत लाभलेलं धन—किंवा चूकून स्वप्नसृष्टींतून सत्यसृष्टींत उतरलेलें कल्पना रम्य स्वप्न तर नव्हे ना ? शरद नि श्यामाचा हेवाच वाटला तिला. काय तें त्यांचं प्रेम. तें रम्य सुख खळखळून वाहणारा तो हर्षाचा मुग्ध मधुर झरा, तें रुसणं फुगणं नि पुन्हां हेंच तें आदर्श जीवीत.

असं वांटल्यावाचून राहिल नाहीं तिला.

मथुरा तिच्याशी कितीतरी बोलली ! पतीपत्नींच्या एकांतांतील न सांगतां येण्यासारख्या गोष्टी देखिल तिनं सांगून टाकल्या नि प्रत्येक वेळीं ती विचारी.

‘ असंच वागतो का ग बाळ तुझ्याशीं ? ’

प्रत्येक वेळीं आवंढा गिळून मथुरा म्हणे, ‘हो ! ’

ह्यावर श्यामा गाल फुगवून लटक्या रागानं म्हणे.

‘ काय तरी बाई असलं पोरासारखं वागणं ! बाहेर बघावं तर सदा गंभीर वागणं—बेताचं बोलणं. धीराचं बोलणं. जसं कांहीं अगदीं मोजून तोलून सारी गोष्ट चाललीय. पण घरांत आलं रे आलं कीं सार तंत्र कसं बिघडतं कुणास ठाऊक बाई ! अगदीं पोराहून पोर बनतो शरद तरी ! ’

‘ आवडत नाहीं तुला ? ’

‘ कधीं कधीं अस्सा राग येतो बघ. ’

‘ राग नसेल हो. अनुराग असेल. ’

‘ चल् ! ’ डोळे वटारून ती म्हणे, आली वाटतं थट्टेची लहर तुला ? ’

‘ नाहीं ग ! मला सुद्धां वाटतं श्यामा—खरंच सांगते—कीं तुझी धाकटी बहीण व्हावं नि अस्सं तुझ्या कुशींत पडावं... ’

‘ आतां काय लहान आहेस तूं मथुरे ? ’

‘ पण लहान व्हावंसं वाटलं तर... ’

‘ समजलं हं ! तूं नाहीं शरदची बाजू घेणार तर...’

‘ अन् तुला नाहीं तो आवडणार तर... ’

अशा कितीतरी प्रकारच्या थट्टेत दिवस कसा भुर्रकन् उडून जाई ! अन एक दिवस सारंच ‘ ऑफस् ’ झालं !

श्यामा एक दिवस जरा उशीराच दवाखान्यांतून आली.

‘ किती उशीर ग ? ’

‘ काय करायचं बाई—एका माणसाला खूष करायचं होतं ना ? ’

‘ शरदला ? ’

‘ अंऽहं ’

‘ मग ? ’

‘ ओळख पाहूं ? ’

‘ तें कसं बाई ? ’

‘ अगदीं सोपं आहे बघ.’

‘ मग सांग ना तूंच ! ’

‘ सांगेन पण एका अटीवर... ’

‘ कोणती ? ’

‘ सांगितल्यावर काय देणार बोल ? ’

‘ काय हवंय तुला ? ’

‘ मला हवंय तें देशील ? ’

‘ हो ! ’

‘ मग हें घे ! ’

असं म्हणून तिनं एक पाकीट मथुरेच्या हातीं दिलं अन् म्हणाली--

‘ झालं क़ीं नाहीं एक माणूस खूष ? ’

‘ पण काय आहे हें ? ’

‘ आपल्या पतिराजांचं एक गोड गोड पत्र आहे. कळलं ? ’

‘ खरंच ? ’

‘ हो ! तूं वाच, तोवर मी आलेच हं ! ’

अन् ती आंत गेली. मथुरा कोचावर बसली नि धडधडत्या अंतःकरणानं तिनं पत्र फोडलं !

श्यामा ज्यावेळीं पुन्हां खोलींत आली त्यावेळीं जें दृश्य तिला दिसलं तें अकल्पितच.

मथुरेची नजर त्या पत्राकडे लागलेली होती खरी; पण ती शून्य नि आंसवांनीं डबडबलेली होती. हो ! तिचे अश्रू तिला असह्य झाले होते. डोळ्यांतून ते तिच्या गालांवर

नि गालांवरून पत्रावर टप् टप् असा आवाज करीत उड्या मारीत होते.

श्यामा स्तंभितच झाली !

श्यामा पुढें सरकली. तिनं तिच्या हातांतील तें पत्र बाजूला काढलं होतं.

एकवार तिनं मथुरेकडं पाहिलं.

छे: मथुरा नव्हतीच जणूं ती ! चित्रकाराचं चित्र रेखाटल्यासारखंच तें ! होय ! होय !! मथुरा एकाद्या निस्तब्ध पुतळीसारखी शून्य हृदयानं बसली होती ! तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. श्यामानं पत्र घेतलं ह्याचीही जाणीव तिला झाली नाहीं.

श्यामानं पत्रावरून नजर फिरवली. पत्रांत होतं–

प्रिय मथुरा !

एक अक्षम्य अपराध घडलाय माझ्या हातून ! अन् त्यासाठीं अगदीं केविलवाणी क्षमा मागण्यासाठींच हें पत्र पाठवितोय मी ! कुठल्या तोंडानं मी तुला सारं सांगू असं झालंय मला. लेखणी उचलत नाहीं-शब्द उमटत नाहीं ! काय लिहावं तो मजकूर जुळत नाहीं ! जीवाचा नुसता थरकांप होतोय ग ! तुझ्यासमोर माझा अपराध सांगण्याचं धैर्य माझ्यांत नाहीं, म्हणूनच मी तुला शरदकडे पाठविलें नि आतां पत्र लिहितोय...

काय वाटेल तें म्हण तूं ! माझ्यातरी मनाला कुठं रुचतंय नि पटतंय तें ? पण तसं केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. अगदीं नाइलाज झाला मथुरे, करशील ना क्षमा ?

कर अगर न कर. माझं हृदय मी तुला ह्या पत्ररूपानं सांगणार आहे. किती दिवसाची मळमळ सांठलीय तिथं. अन् तुझ्या-सारख्या मैत्रीणीजवळ ही नाहीं ओकायची तर कुणाजवळ मथुरे ? त्याशिवाय कसं बरं वाटेल मला ? तूंच सांग ना...

तुझं माझ्यावर निरतिशय प्रेम होतं—अजूनही आहे ! माझेहा तुझ्यावर तसंच प्रेम आहे ! आपल्या प्रेमाची पूर्ती 'प्रेम विवाहांत' झाली. 'केवढं भाग्य माझं' असं वाटल्या-वांचून राहिलं नाहीं मला !

सांगायला अतिशय शरम वाटते मथुरे ! पण सांगतोच तें. त्याशिवाय कांहीं राहावत नाहीं मला !

- माझ्या भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला ! मातीनं बांधलेला मनोराज्यांतील महाल मातींत मिळाला ! केवढं दुःख झालं मला !

माणसाला मनही असतं नि शरीरही ! त्याला दोहों-चंही समाधान हवं असतं एवढेंच नव्हे तर तसं असल्या-शिवाय त्याची जीवित नौका पैलतीरावर पोंचतच नाहीं ! तुझ्याशीं मी लग्न केलं ! माझं मानसिक समाधान झालं. पण त्या मानसिक समाधानांतच शारीरिक समाधानाची होळी पेटली.

मनुष्य नुसत्या मनावर - मनाच्या समाधानावर जगूं शकत नाहीं हें मला लवकरच कळून चुकलं ! तुझ्यापासून माझं शारीरिक समाधान होईना-शरीराची तहान भागेना. तुझ्या गाढ अलिंगनांतही मला कसली तरी उणीव जाचूं लागली ! हंसूं येईल तुला मथुरे ? वेडा म्हण हवं तर मला ! पण .. पण ... कळून चुकलं मला कीं -

आपण लग्न केलं तोच गाढवपणा झाला !

कारण .. कारण ... आपलं प्रेम मानसिक होतं - शारीरिक नव्हतं !

जश्या मनाच्या तश्या शरीराच्याही गरजा असतात. दोन्हींच्याही भागल्या पाहिजे. Sound mind in Sound body.

मथुरे ! क्षमा करशील का मला ? अगदीं स्पष्ट बोलतो हं !

आपलं प्रेम निरागस, वासनारहित, निष्कलंक होतं अन अन म्हणूनच तें प्रेम नव्हतं. प्रेमापोटीं जी वासना असते तीं आपल्यांत नव्हती. ज्याला Sexual Attraction ( लैंगिक आकर्षण ) म्हणतात तें तुझ्या माझ्यांत नव्हतं ..

अन...अन मनुष्याला राहावयाचं असेल तर शरीर नि मन दोन्हीही निकोप हवींत. शरीरच जर नसेल तर मनाचं वास्तव्य कुठलं असायला ? वासनेची भूकच जर नसेल तर तें प्रेम—नवराबायकोचं जीवन यशस्वी करणारं प्रेम नव्हे-तर तो स्नेह झाला ! दोन मित्रामधील अकृत्रिम स्नेह झाला. प्रेम आलं कीं आकर्षण म्हणजेच लैंगिक आकर्षण. प्रेमापोटीं वासना असतात. वासनेविरहीत प्रेमानं नवराबायको जगूंच शकत नाहींत. जगांतील ते भाऊबहीण, मातापुत्र, पतिपत्नी नव्हे. फार उशीरा मला हें कळलं !

तुझ्या सहवासांत माझ्या कसल्याच भावनांची हालचाल कां होत नाहीं ? तूं नि मी जवळ असलों तरी कुठल्याच शक्तिला चेतना का येत नाहीं...सारखं चुकल्या चुकल्यासारखं कां वाटतं. समाधान कां लागूं नये. एवढा प्रेम

विवाह करूनही ही अशांती कां...

त्या नि असल्या अनेक प्रश्नांनीं माझं डोकं भंडावून गेलं होतं ! तें मी तुला दिसूं दिलं नाहीं. तुला हंसविण्याचा सारखा प्रयत्न करीत होतो !

एके दिवशीं अचानक हें प्रमेय सुटलं ! कांतानं तें सोडवलं !

कोण ही कांता ?...

हो तेच तर तुला सांगण्यासाठीं हें पत्र लिहितोय.

एक मॅट्रिक झालेली, भर यौवनाच्या महालांत असलेली एक काळी सांवळी परंतु जीवनाला वेड लावणारी एक गोड छोकरी आहे ती ! आमचा परिचय फार तर फार महिन्याचा असेल पण तिला पाहतांच माझ्या मनानं ओढ घेतली. मला ती हवी हवीशी वाटूं लागली. अन तूं हवी असूनही माझ्या मनाला कां समाधान मिळत नाहीं ह्याचं उत्तरही तीच देऊं शकली ! प्रथम माझी मनःस्थिती विचित्र झाली अन त्यामुळेंच मी तुझ्याशीं तुटकपणें वागूं लागलों !

तुला मी फसवलं. पण स्वतःला किती दिवस फसवूं ?

हें सारं तुला कसं सांगावं हेंच कळेना मला ! युक्ती योजली. तुला दूर पाठविलं, नि पत्र लिहिलं.

मथुरे ? खरंच मी दुबळा आहे ? तुझ्या निरागस, गाढ प्रीतीचा आस्वाद मला घेतां आला नाहीं ! मी नालायक ठरलों !

मला क्षमा करशील का मथुरा ? करशील ?

मी घटस्फोट ध्यायचा ठरवलंय ? कांतेशीं पुन्हां लग्न करीन म्हणतो. तुझी परवानगी नि आशिर्वाद ह्या दोन

गोष्टींची जरुरी आहे मला.

रागावूं नकोस मथुरे! तुझ्या ह्या दीन-दुबळ्या-लाचार बा-वर रागावूं नकोस. रागावशील का? करशील का मला क्षमा?...

बस्स! बस्स!! ह्यापुढें लिहिवत नाहीं ग!

तुझा स्नेहांकित

बाळ!

श्यामानं एक दीर्घ उसासा सोडला! वळून मथुरेकडं पाहिलं.

अजूनही ती होती त्याच स्थितींत होती!

सज्ञाहीन– बधीर– निश्चल पुतळ्यासारखी अगदीं!

काय करावं हें समजेना श्यामाला! अन् हें समजायच्या आंतच ...

'मथुरा!'

असा उद्गार काढून ती थांबली. झटकन तिला तिनं घट्ट उराशीं कवटाळलं! नि पुन्हां तिच्या कानांत ती उद्गारली, 'मथुरा, बोल ना ग माझ्याशीं.'

एकाएकीं मथुरेचं सारं सर्वांग शिरशिरलं–नि तिनं हुंदका दिला. श्यामाच्या खांद्यावर मान टेकून ती धाय मोकलून रडूं लागली!

* * *

अन् नेमकं ह्याचवेळीं हॉस्पिटलमध्यें शरदहि रडकुंडीला यायच्या बेतांत होता.

त्याचं असं झालं...

कधीं न येणारं बंगाल-प्रांतिक सरकारचं पत्र त्याला आलं. शिक्का पाहातांच त्यानं उत्सुकतेनं उघडलं तें...

' अन् वाचलं ...

रा. रा. शरद साठे यांसीं ...

बंगाल प्रांतिक सरकारचा तुम्ही एक भयंकर गुन्हा केला आहे ... अजूनही करीत आहांत, या तुमच्या लांचखाऊ वर्तनानं प्रांतिक योजनेलाच नव्हे तर बंगाललाहि काळीमा फांसला आहे. आम्हाला वाटलं नव्हतं की तुम्ही अशी वर्तणूक ठेवाल.

–तुमच्यावर दोन आरोप आहेत.

१)...शेठ हिरालाल यांच्याकडून पांचहजार रुपये लांच खाल्ली तुम्ही !

२)...शांताबाई नांवाच्या नर्सवर तुम्ही बलात्कार करण्याचा प्रयत्न केला आहे...

सरकारजवळ लेखी पुरावा आहे. आपलं ऐकून घेण्यास सरकार तयार नाहीं.

दोनच दिवसांनीं तुमच्या वर्तणुकीची छाननी करण्यासाठीं एक ' Enquiry Board ' येईल. त्याच्याहातीं सारी कागदपत्रं आहेत. ते तुमची चौकशी करतील...

कळावें...

त्यानं हें पत्र वाचलं मात्र...

आपल्या भोवतालचं जग गरगर फिरूं लागल्याचा भास झाला त्याला. आपल्या पायाची जमीन दुभंगत आहे.

पायाखालीं एक मोठी भेग पडत आहे...त्यांत आपण खोल खोल चाललों आहोंत...वरून श्यामा आक्रोश करीत आहे. सारं जग आपणांकडं बघून खदखदां हंसत आहे...

किंवा...

आपण सुखानं गाढ झोपीं गेलों आहोंत. शामाच्या छातीची ऊब सुखाच्या गुदगुल्या करीत आहे. आपल्या शिरावर 'इच्छावृक्ष' आहे...हजारों रोग्यांना आपण हंसवीत आहे... जादूची कांडीच जणूं आपल्या हातीं आहे...इतक्यांत कुठून तरी एक काळाकुळकुळीत भयानक—राक्षस अवतरला—नि—नि त्यानं त्या वृक्षावर प्रहार केला जोराचा...

कडाड्...काड्. काड्...ड्. ड्.

आवाज झाला. काणठाण्या बसल्या नि नेमका तो वृक्ष आपल्या नि श्यामच्या अंगावर कोसळला...

असेंच कितीतरी त्रास त्याला झाले असते कुणास ठाऊक... पण...

'May I come in sir ?'

कुणाचा तरी शब्द शरदच्या कानीं आला. त्यासरसी तो जागा झाला. एकवार त्यानं डोळे चोळले नि पुढें पाहिलं...

' लांच...'

' बलात्कार ' ...

तीं अक्षरं त्याच्या डोळ्यासमोर विजेसारखी लखकन चमकलीं...

क्षणभर त्यानं डोळे मिटले, मन कठोर केलं नि अडखळत्या वाणीनं तो म्हणाला.

" Yes, Come in !"

दार उघडलं नि अविनाश आंत आला...

" Good evening Sir ?"

" Good evening Avinash "

अविनाश बसला खुर्चीत. चट्कन त्याची नजर टेबलावर पडलेल्या लिफाफ्याकडं गेली.

" What's this?"

असं म्हणून त्यानं तो लिफाफा उचलला, नि पत्र वाचलं ...

एक क्षीण नि मिस्किल हास्य त्याच्या ओठांवर चमकलं !

शरदला कांहीं तें दिसलं नाहीं. तो आपल्याच विचारांत गढून गेलेला होता पण चटकन तो बोलून गेला -

" what is this nonsense ! Let that Commission come and go sir ! Don't worry ! Don't worry ! This is all hunbuk, nonsense I will try for you sir ! "

" Thank you for your kindness. But I care me alone now, I care me alone--"

अविनाश उठला. कडवट चेहेरा करून उठला ... पण त्याच्या अंतर्यामीं आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या - जणुं तो म्हणत होता.

" भली खोड मोडली ! असंच हवं होतं !! "

बिचारा शरद ! त्याला काय कल्पना ? ऐन उमेदींत होता ! तोंच हें गडांतर ...

विचार करून तरी काय उपयोग होणार ? झाल्या गोष्टी होऊन चुकल्या होत्या ... धनुष्यापासून निघालेला बाण वाटेंत आडवतां येईल पण हृदयांपाशीं आल्यावर तो कसा चुकणार ? घुसणारच तो हृदयांत ... जखम कर-करणारच तो - त्याचा तोच धर्म ना ?

• • •

— ११ —

‘ पण नुसती चौकशी तर करशील ? ’

‘ नुसत्या चौकशींत काय होणार श्यामा ? ’

‘ मग काय असं रडत बसून होणार ? ’

‘ काय होईल ते खरं... ’

‘ असं हातपाय गाळून बसणें म्हणजे पुरुषार्थाची नि शहाणपणाची लक्षणं वाटतं ? अन शरद लाखांची होत असलेली राख पाहून तुझा जीव उफाळून रे कसा येत नाहीं ? ती सांगते तेच खरं आहे. त्या दिशेस गेलास कीं... ’

‘ पण अविनाशचं असं मी काय घोडं मारलंय्! ’

‘ तूं नसशील पण मी मारलंय ना ! ’

‘ ते कसं ? ’

‘ तुझ्याशीं लग्न करून. ’

‘ म्हणजे ? ’

‘ त्याला करायचं होतं माझ्याशीं लग्न. म्हणे प्रेम होतं

माझ्यावर, पण माझं प्रेम होतं तुझ्यावर. मी दिलं धुडकावून तेव्हां चिडलीय स्वारी. नुसतं बोलत देखील नाहीं माझ्याशीं. कॉलेजांत कसं हाडवैर धरलं होतं त्यानं तें विसरलास वाटतं ? अन् आतां आपल्या दवाखान्यांत आलाय् तो कशासाठीं ? तो आल्या दिवशींच मला वाटलंच तें. केव्हांतरीं संकटं उभी राहणार ह्याची कल्पना मला आलीच. पण म्हटलं अगोदर कशाला करा वाच्यता ? अन् शिवाय तुझीन् त्याची झालेली दिलजमाई माझ्या आगीनं होरपळून निघेल. मला तर हवीच होती ही मन मिळवणी. माझंच चुकलं, त्याच वेळीं तुला सावध करायला हवं होतं. म्हणून म्हणते...'

'पण माझी खात्री आहे कीं अविनाश असलं भलतं कांहीं करणार नाहीं अशी !'

'सज्जन माणसांना वाटतं की जगही सज्जन आहे. पण असतं उलटंच तें. दिसतं तसं नसतं बरं महाराज.'

'मग काय करूं मी ?'

'कांहीं करूं नकोस असंच हातपाय आंवळून गार-ठल्यासारखं बैस. लांच खाल्ल्याचा नि बलात्कार केल्याचा नसता आरोप मोठ्या भूषणानं मिरीव. सरकारनें टाकलं काढून कीं खुशाल उजळ माथ्यानं निघून जा नि माग कुठं तरी नोकरी ताबडतोब मिळेल बघ ती !'

'असं काय ग श्यामा ?'

'मग आतां काय सांगू रे मी तुला ? काय वाटेल ते कर तूं. माझं जर ऐकायचंच नाहीं, मी जें जे सांगेन तें तें सारं खोटं नि आपलंच खरं असं वाटत असेल तर मला विचारलेस तरी कशाला ? आणखीन काय सांगू मी

तुला ? अशी सूडघेवूं माणसं प्राणघेवूं असतात. तूं जरी कांहीं केलं नाहींस त्याचं तरी मी केलंय ना. माझ्यावर कसा जळफळतोय तो ! माझा सूड घ्यायला बसलेला तो बोका आहे नुसता. माझा सूड घ्यायचा म्हणजे काय ? तर तुला छळायचं. तुझी प्रतिष्ठा कमी करायची. तुझी कीर्ति हिणकस करायची. बिब्बा घालायचा. त्रास द्यायचा. तूं त्रासलास कीं त्याचा राग माझ्यावर काढशील अशी अटकळ असावी स्वारीची अन् खरीच आहे म्हणा ती ! '

'कधीं ग तुला मी त्रास दिलाय ? '

'हा असाच नाहीं तर काय ? तुला झालेला त्रास माझा नाहीं वाटतं ? '

'ते सारं खरं पण...'

'पण ती तोंड वेडावून म्हणाली. 'आली का हरि-दासाची कथा मूळपदावर ? '

'माझा विश्वासच नाहीं बसत ग '

'ज्यावर विश्वास बसेल ते करावं माणसांनीं नि ज्याच्यावर विश्वास नाहीं त्यालाही त्रास देवूं नये उगाच. समजलं ?'

'पण माझ्या ऐवजीं तूंच जावून विचारलं तर...'

'मी नाहीं बाई ! ज्याचं काम त्यानंच करावं. '

'अन् आपण नुसते ज्ञानामृताचे डोस पाजावेत नाहीं ? '

'बरं बरं... झोप आतां. जाऊं मी ? '

'कुठें ? '

'मथुरेपाशीं.'

'मी उद्यां मथुरेला पाठवून देणार आहे.'

'ते कां?'

'ती आल्यापासून मला झोंप येईना म्हणून.'

'म्हणजे?'

'सारखी तिच्याजवळ झोपतेस. मग मला कशी येणार झोप?'

'इश्श! हे रे काय? माझ्या जवळ काय झोपेचें औषध आहे?'

'नाहीं कां?'

'कुठलं?'

'अशी बैस माझ्याजवळ. थोपट मला. अन्...'

'लहान कां आहेस तूं थोपटायला आतां?'

'हो! आहे.'

श्यामाच्या मुखावर एक मधुर स्मित झळकलं. त्याचं पांघरुण छातीपर्यंत वर सरकावून ती म्हणाली.

'हं–आतां स्वस्थ निजायचं हं! अगदीं डोळे नाहीं उघडायचे...

अन् इतक्यांत...

कुठून तरी मंजूळ स्वर त्यांच्या कानीं पडले. गाण्याच्या लकेरींतून कसला तरी मुग्ध गुंगी आणणारा सुगंध उधळत होता. तें एक गोड गीत होतें. मथुराच गात होती...श्याम श्यामाला म्हणाला–

'बघ कसा गोड गळा आहे तो!'

‘ हुं !’

‘ असं येतं का तुला गातां ?’

‘ तूं कुठं शिकवलंस मला ? पण आतां बोलूं नकोस गडे. उगीच ऐक आतां.’

अन् तो ऐकूं लागला...

‘ येणार ? ये सुखानें-मानी धनी तुझा तूं.
ओठावरी असूं दे-हांसूं तुझ्या परंतू.
मिटणार मी न डोळे
भोळे न ते फसाया
रागावुनी रुसूनी
जावूं नकोस राया.
दे गात हात हातीं
अन् जा सुगंध जैसा
गाळीत मी न आंसूं
सोडी न तूं उसासा. ’

पूर्ण तन्मयतेनं घोळून घोळून मथुरा गात होती. स्वरा-स्वरांतून कसला तरी मुग्ध नाद घुमत होता. किंचित् कंपही होता आवाजांत...

श्यामला झोंप लागली.

गाणं चालूंच होतं. श्यामा ऐकत होती.

‘ येणार ? ये सुखानें- ज्ञानी धनीं तुझा तूं.
ओठावरी असूं दे- हांसूं तुझ्या परंतू.
जातोस तूं म्हणोनी—

भीती मला न वाटे

पेरीं न भीतिच्या तूं

पार्थि मी तिचे सराटे

पाण्यावरी प्रवाहीं

वाऱ्यावरीं वहाती

बेबंद तैं स्थिरावे

ती प्रीतिची प्रचीती

माझी मला मिळाली

म्हणुनीच हा दिलासा

दे गात हात हातीं

अन् जा सुगंध जैसा

ओंठावरी असूं दे

हांसू तुझ्या परंतू '

श्यामला झोंप लागलेली पाहून श्यामा मथुरेपाशीं येवून बसली. मथुरा गीत गाण्यांत तन्मय झाली होती. श्यामाचं आगमन तिच्या ध्यानींही आलं नाहीं.

'... ओंठावरी असूं दे.

हांसू तुझ्या परंतू '

गझलाच्या या ओळी म्हणतांच तिच्या नयनांतून अश्रूंच्या मौक्तिकमाळा पाझरूं लागल्या. तिच्या हृदयाला पीळ पडला. असह्य वेदनेनं तिनं गुडघ्यांत मस्तक लपवलं. तिच्या हृदयाला पीळ पडला नि आलेला हुंदका तिला आवरतां येईना.

तिची ती अवस्था पाहून श्यामाही गहिंवरली. तिच्यावर

ईश्वरानं कुठला वज्राघात केला होता हे श्यामा चांगलंच ओळखत होती. दीड वर्षांच्या प्रीतीचं नि संसाराच भांडं फुटलं होतं. फुटक्या नशीबाला घेवून ती त्याला जणूं अंगाईच गात होती. वैऱ्यावरही असा प्रसंग येऊं नये म्हणतात. अन् मथुरेवर: श्यामाची जिवाभावाची सोबतीण - मथुरेचं मस्तक तिनं उचललं; तिचे अश्रू पुसले, तिला जवळ ओढली नि ती म्हणाली.

'किती रडावं बरं मथुरा ?'

'रडण्याशिवाय काय राहिलंय ग आतां ?'

'अन् रडून तरी काय मिळणार तुला ?'

'रडूं नको तर काय करूं ग मी ?'

'माझ्याकडं पहा असं. हं! अस्से डोळे पूस. मन शांत कर. धीर धर नि मी विचारते त्याचीं उत्तरें दे...'

असं म्हणून श्यामानं तिला बिछान्यावर झोपवलं. तीही झोंपली. मथुरेला जवळ ओढून तिच्या मस्तकावरून प्रेमळपणें हात फिरवला तिनं.

ज्या गोष्टीचं समाधान शब्दांच्या योगें होत नाहीं तें समाधान माणसाला कधीं कधीं प्रेमाच्या स्निग्ध स्पर्शानं मिळतं.

मथुरेचंही असंच झालं.

श्यामाच्या प्रेमळ सहानुभूतीनं धगधगणारं तिचं मन थोडं निवलं. मथुरेच्या कपोलावर आलेले केस तिनें मागें सारले. किंचित् थोपटल्यासारखं केलं नि तिचं तोंड आपल्या मुखाजवळ आणून ती कुजबुजली.

'तुला एक विचारूं का मी मथुरा ?'

मथुरेनं नुसता हुंकार दिला.

‘ त्या पत्रावर तुझा विश्वास बसतो का ? ’

‘ हुं ! ’

‘ तुझं मन शांत झालं का ? ’

‘ हुं ! ’

‘ मग एक सांगशील तूं मला ? ’

‘ काय ? ’

‘ लग्न झाल्यापासून तो आतांपर्यंतची सारी हकीकत सांग ना मला ? ’

‘ सारी हकीकत ? ’

‘ हो ! सारी हकीकत...मला नाहीं सांगत ? ’

मथुरेनं एकवार तिच्या डोळ्याकडं पाहिलं. सहानुभूतीनं प्रेमानं ते थबथबलेले दिसले तिला. श्यामानं आणखीनच जवळ ओढून घेतलं तिला अन् आर्जवी स्वरांत ती म्हणाली.

‘ असं काय करतेस ग ? सांग ना ?’

मथुरा विरघळली. तिला राहवेना. तिच्या नयनांतून पुन्हा घळ्घळ् अश्रुप्रवाह चालू झाला.

‘ उगी ! उगी मथुरा ! अशी रडूं नकोस बाई. तुझे पाहून मलाही रडूं येत ग ’ थोडासा धीर धर ना मथुरा...

रडक्या सुरानं नि ओथंबलेल्या नजरेनं मथुरेनं सारी हकीकत सांगून टाकली. शेवटीं ती म्हणाली...’

‘ असं कां व्हावं श्यामा, हें माझं मलाच कळेनासं झालंय ग ! किती विचार केला मी ! पण कोडं कांहीं केल्या

सुटत नाहीं. विचार करकरून डोक्याला मात्र शिणवटा येतो. उगीच बाळवर माझं प्रेम नव्हतं म्हणावं तर तेही अशक्य. माझं तर त्याच्यावर प्रेम आहेच. अजूनही आहे. अन् असं एकमेकांचं एकमेकांवर जिवापाड प्रेम असूनही असं कां व्हावं ? समाधान कां लाभू नये ? एकट्या बाळचीच ही स्थिती नाहीं. माझीही आहे. तुला आठवतच असेल ती रात्र आपण लग्न केलं. नि नंतर सकाळीं एकमेकांना भेटलों त्यावेळची माझी मुद्रा तुला आठवते ना ? माझी मलाच लाज वाटून मी तुझं तोंड चुकवलं होतं. नजरेला नजर भिडविण्याचेंही धैर्य झालं नव्हतं. कारण काय म्हणून विचारशील तर तें हेंच. बाळच्या सहवासांत सुख कां लाभावं ? नि त्याच्या निकटच्या स्पर्शानं का समाधान लाभू नये? माझ्या कसल्याच भावना का उचंबळून येवूं नयेत? आमचा खूप वर्षांचा सहवास असला म्हणून काय झालं ? प्रियकराच्या स्पर्शांत–चुंबनांत–आलिंगनांत जे प्रेयसीला स्वर्ग-सुख लाभतं...जो एक प्रकारचा हळुवार आनंद होतो अन् जिवाला जी हुरहुर लागते ती कां लागूं नये मला ? तूं तरी सांगशिल कां याचं कारण ? '

'तें तर बाळच्या पत्रांतच आहे कीं ! '

'पण मला नाहीं तें खरं वाटत '

'कां ? '

'कारण पवित्र प्रेमांत का वासना डोकावतात ? '

'थोडावेळ ठेव ते बाजूस. पण दुसरं कारण तरी सांपडलंय तुला ? '

'अजून तरी नाहीं. '

'तुला कधीं बाळचं शारीरिक आकर्षण वाटलं होतं कां ? '

‘ नाहीं. ’

‘ बाळशिवाय दुसऱ्या कुणाचं ? ’

‘ छे : ’

‘ मग आतां ऐक तर. शरदची नि माझी ओळख कशी झाली हें तुला ठाऊक आहे ? ’

‘ हो ! ’

‘ कशी ? ’

‘ प्रथम भेटींत, ’

‘ ती कां ? ’

‘ तुला त्याच्यांत नि त्याला तुझ्यांत कांहींतरी विशेष असं आकर्षण दिसलं म्हणून. ’

‘ ते आकर्षण कसलं होतं ? ’

‘ हृदयाचं. ’

‘ साफ चूक. ’

‘ मग ? ’

‘ शरीराचं. ’

‘ शरिराचं ? ’ मथुरेला विजेचा शॉकच बसला !

‘ थांब अशी चाबूक मारलेल्या घोड्यासारखी चमकून नकोस जावूं. मला शरदविषयीं नि शरदला माझ्याविषयीं काडीचीही माहिती नव्हती. तो टांग्यांतून उतरल्याबरोबर अर्ध्या तासांनीं मी त्याला नि त्यानं मला पाहिलं, नि पाहिल्याबरोबर मला तो हवा हवासा वाटूं लागला. ते कां ? ’

‘ आज तुला भ्रम झालाय का ?

‘ नाहीं ! मुळींच नाहीं. चांगली शुद्धींत आहे मी. आतां तुला एक दुसरी गोष्ट सांगते हे ! नीट एक. चार वर्षांपूर्वी माझ्या जीवनांत एक तरुण आला होता. कांहीं विशिष्ट कारणामुळं त्याची माझी ओळख झाली. तो होता स्पोर्टस्‌मन अन्‌ मी होते तशीच. बॅडमिंटनच्या कोर्टवर आमची ओळख झाली. त्याचे व माझे गुणधर्म सारखे होते. जसे तुझे नि बाळचे. होतांहोता आमचा परिचय गाढ झाला, सहवास ही खूप वाढला, एकमेकांना एकमेकांविषयीं सारी माहिती होती, आमच्यांत चोर कप्पे नव्हते, आम्ही हंसत असूं, मनमोकळेपणानं बोलत असूं, वाटेल तिकडे भटकत असूं. अशी तीनचार वर्षें आम्ही घालविलीं. ज्याला जिवाभावाची मैत्री म्हणतात तशी मैत्री झाली आमची. मने एकवटलीं. पण एवढं होऊन सुद्धां मी त्याला नेहमीं चार हात दूर ठेवलं नि क्षणाच्या ओळखीवरून शरदला जवळ केलं. ते कां ?’

‘ हं, चालूं दे पुढें...’

‘ तसं पाहिलं तर शरदपेक्षां तो तरुण मला अधिक जवळचा. अधिक परिचयाचा. आमची मनं सुद्धां एक झालेली. एके दिवशीं त्यानं मला मागणी घातली नि ती मी साफ नाकारली. ’

‘ कां ? ’

‘ कां ? तुझ्यासारखा प्रसंग माझ्यावर येवूं नये म्हणून. त्या तरुणांविषयीं मला शारीरिक आकर्षण बिलकूल वाटत नव्हतं. भावाला बहिणीचं कसलं आकर्षण असतं कां ? तसलं आकर्षण आमच्यांत होतं. तसलंच आकर्षण तुझ्यांत नि बाळमध्यें होतें. अर्थातच तें आकर्षण निर्व्याज हृदयाचं

होतं. पवित्र, निरागस प्रीतीचं तें प्रतीक होतं. आम्ही दोघांनीं एकमेकांविषयीं काय वाटेल ते केलं असतं. अजूनही करूं. पण त्या नुसत्या पवित्र प्रीतीनं पतिपत्नी जिवंत राहूं शकत नाहींत. त्यांना समाधान मिळूं शकत नाहीं. जिवंत राहूं शकतात. समाधान पावूं शकतात ते बहिणभाऊ नि मित्र मित्र. पण पुरुष नि स्त्री यांचं जीवन जर सुखी व्हावयाचं असेल तर पवित्र प्रीतीबरोबर शारीरिक आसक्ती ही हवीच हवी. शारीरिक आसक्ति ही कितीही वाईट किळसवाणी असली तरी ती आवश्यक गोष्ट आहे. निदान पतिपत्नीच्या प्रेमांत आहे. ती आसक्ति मला शरदमध्ये दिसली नाहीं. ज्यांना एकत्र जन्म काढावयाचा आहे अशा स्त्री पुरुषांनीं आपल्या हरएक भुकेला शारिरिक नि मानासिक जिथं संपूर्ण वाव मिळेल अशीच ठिकाणं शोधलीं पाहिजेत. हे मला पक्कं माहित होतं अन् म्हणूनच मी फसलें नाहीं. तूं पवित्र, दिव्य स्वर्गीय नि वासनाविरहित प्रेमाच्या पाठीशीं लागलीस नि असं तुला पाठ फिरवून बसावं लागलं. बाळनं जें लिहिलं तें अक्षरशः खरं आहे मथुरा...'

पण नुसत्या शारीरिक वासनेनंच...

'हं थांब, तेंहि सांगायचं राहिलंच तुला. नुसत्या शारीरिक वासनेच्या आहारीं जावून पशू होतात माणसं हेंही मला ठाऊक आहे. असं म्हणणार ना तूं? कबूल -- पण हे कुणाच्या बाबतींत शक्य आहे? जी माणसं अडाणी असमजूतदार असतात त्यांच्याच बाबतींत अन् अशी माणसं ओळखूही येतात लागलीच. बरं. ज्याच्याविषयीं शारीरिक आकर्षण वाटतं त्यांच्याशीं आपण कांहीं एकदम विवाहबद्ध

होत नाहीं. तो माणूस कसा आहे? स्वभाव कसा आहे त्याचा? व्यसनी आहे का ? आपल्याला त्याच्यापासून सुख होईल कां? वगैरे गोष्टी त्याच्या सहवासांत राहून कळतातच कीं आपल्याला. अंबा नासका निघाला कीं देतोंच कीं आपण फेकून. अन् दुसरी गोष्ट म्हणजे त्याच्या सहवासांत राहून सहवासानं एकमेकांच्या मनांत आपुलकी उत्पन्न होतेच कीं. अन् अशी शारीरिक नि नंतर मानसिक आपुलकी निर्माण झाली कीं मगच त्याला प्रेम म्हणतात. प्रीति हा शब्द म्हणूनच पतिपत्नींतील ह्या दोन्ही आकर्षणालाच लावला पाहिजे. तुझं नि बाळचं हार्दिक संमिलन झालं, ती प्रीति नव्हे—'

'मग काय म्हणायचं त्याला ?'

'स्नेह — जिव्हाळा म्हणतात त्याला. तोच जास्ती पवित्र—अन् तोच जास्ती स्पृहणीय. असं जरी असल तरी नुसत्या स्नेहानं पतिपत्नी सुखी पावूं शकत नाहींत. पतिपत्नींत हा स्नेहही हवा--नि प्रीतीही हवी. जरी वासना असल्या तरी त्या दाबतां येतातच कीं अन् त्यांचा लगाम म्हणजे स्नेह—जिव्हाळा. जिथं स्नेह नसेल तिथंच बलात्कार उद्भवतो नि जिथं वासना नसेल तिथं पतिपत्नी नीरस होतात. मनाचं मीलन झालं कीं इंद्रियांचं दमन झालंच पाहिजे.

'आतां तुला एक विचारूं का श्याम '?

'खुशाल.'

'रागावशील तर...'

'तुझ्यावर कोण बरें रागावेल. विचार ना.'

'शरद् नि तूं शारीरिक आकर्षणांतूनच एकत्र

आलात...'

'हो! शारीरिक आकर्षणांतूनच मानसिक आकर्षण उत्पन्न होतें.'

'मग शरद् तुला त्रास नाहीं देत?'

'अग वेडे! शरदच काय मी देखील त्याला त्रास देतेच कीं.'

'अन् दोघांनाही हें आवडतं?'

'कां आवडूं नये?'

'अन मग...?'

'अन मग काय? असं असूनही आम्ही अजूनही पूर्णपणें ब्रह्मचारी आहोंत...'

'काय?'

'असं डोळे फाडून बघतेस? माझ्यावर विश्वास आहे ना तुझा?'

'हो?'

'मग झालं तर...शारीरिक आकर्षण, वासनापूर्ती किंवा उपभोगवृत्ती हें माणसाचं ध्येय असत नाहीं. तें एक सुखाचं साधन आहे, मनोमिलनाची एक पायरी आहे.'

'तरीपण काय झालं? एकांतांत-एकमेकांच्या गाढ सहवासांत तुम्ही भावना विवश होत नाहीं?'

'होतो तर...कधीं कधीं असं वाटतं कीं...अंगाचा असा दाह होतो कीं...पण जावूं दे ते! असं झालं कीं आम्ही लगेच एकमेकांपासून दूर होतो. तवढी सावधगिरी बाळगतो.'

'कां'

‘ आम्ही तसं ठरवलंय म्हणून! ’

‘ आतां मात्र शर्थ झाली बाई! ’

‘ त्यांत कसली ग शर्थ? मनाच्या कणखरपणाचा तो प्रश्न आहे!’

‘ तरीच हं! ’

‘ तरीच हं काय? ’

‘ तुला मातृपद नाहीं तें!’

‘ होईल की! एके दिवशीं तेंही होईल ’

‘ केव्हां? ’

‘ शरद्‌चा नीट जम बसल्यावर... ’

‘ आतां मात्र मला आश्चर्य वाटायला लागलंय. ’

‘ कशाचं ’

‘ तुझं नि शरदचं. ’

‘ तें कसं? ’

‘ आश्चर्यच नाहींतर काय? ज्यांचा पाया शारीरिक आकर्षण हाच आहे असे लोक ब्रम्हचारी राहूं शकतात नि ज्यांचा पाया हार्दिक मीलन आहे अशी मी माताही होऊन चुकलेय हें आश्चर्य नाहींतर काय? ’

‘ अन् अजूनही तूं सुखी नि समाधानी नाहींस हें तिसरं आश्चर्य नाहीं? ’

‘ कर बाई टवाळी! ’

‘ टवाळी नाहीं ग...’ तिला आणखीनच घट्ट कुशींत घेऊन श्यामा उद्गारली.

‘ ज्यांना स्नेह नि प्रेम ह्यांतील भेदाभेद समजत नाहीं

त्यांची कींव येते बघ. '

' टवाळी नाहीं, कींव कर माझी ! '

' रागावलीस होय ! '

' नाहीं ग. रागवायला काय झालंय मला. आज चांगले डोळे उघडलेस तूं माझे ! पण काय ग ! पुरुषांना म्हणे Every lass a Queen ! असं वाटतं. '

' पण स्त्रियांना कुठं Every Chap a King ! असं वाटतं ! तसं असतं तर तुझा नि बाळचा शेवट असा कां झाला असता ! पुरुषांना तसं वाटतं त्याचं कारण स्त्रियांच्या देहाविषयींचं कुतूहल हें आहे ! आकर्षण नव्हे ! अन तें कुतूहल संपलं.—तेवढी उत्सुकता मावळली कीं मग पुरुषाचं मन उडूं लागतं. त्यांत त्याला राम वाटत नाहीं. आकर्षणाचं तसं नसतं. दरक्षणीं तें वाढत जातं. दगड वर फेकला कीं खालीं पडतांना प्रत्येक क्षणीं जसा त्याचा वेग वाढतो ना तसं असतं आकर्षणाचं. तें सारखं वाढत असतं. अन त्याच्या वाढीवरच तर स्त्री—पुरुषाचं सौख्य अवलंबून असतं. ह्या आकर्षणाच्या जोरावरच स्त्री पुरुषांना बद्ध करूं शकते नि दोघांच्या जीवनांतील नौकेच्या शीडेंत हर्ष भरूं शकते म्हणून तर स्त्रीयांनीं हें आकर्षण वाढवावं लागतं. कांहींवेळ मृगजळासारखा भास उत्पन्न करावा लागतो नि पुरुषांपासून दूर दूर पळावं लागतं. हें आकर्षण विशेषतः समवयस्क तरुण तरुणींतच आढळतं. हें आकर्षण नसतं भाऊबहिणींत—पिता—पित्रींत. अन तोच खरा स्नेह ! ह्या आकर्षणासहित आपुलकीला प्रीति नि ह्या आकर्षणाविरहित आपुलकीस स्नेह म्हणतात. तुझ्यांत बाळांत स्नेह होता नि प्रीति नव्हती. आतां काय करणार आहेस तूं मथुरे ! '

' उद्यां अभिनंदनपर एक पत्र पाठविणार आहे बाळला ! '

' कशी शहाणी आहे माझी मथुरा ! '

' तर...तर...'मथुरा खुदकन् हंसली.

मनुष्याला नाना प्रकारचे आनंद होतात. त्यापैकीं आसुरी नांवाचा राक्षसी आनंद असा एक प्रकार आहे. हा प्रकार वाईट आहे कीं चांगला आहे हें मला तरी ठाऊक नाहीं. पण आमच्या अविनाशला आज ' आसुरी आनंद ' झाला होता. तो खदखदून हंसत होता. एकांदी पोरगी पळवावी नि तिच्यावर यशस्वी बलात्कार करावा... किंवा अजिंक्य शत्रूला विश्वासघातानं जिंकावें म्हणजे मनुष्याला जो सात्विक आनंद होतो तश्या प्रकारचा आनंद अविनाशला झाला होता.

आज त्याचा चेहेरा उजळला होता. डोळ्यांत कसली तरी क्रूर तकाकी विलसत होती. ओठ खद-खदून हंसत होते. विलग झालेल्या ओठांतून दातांच्या हिरकण्या लख्खकन् चमकत नि पुन्हां अदृश्य होत. सकाळचीच वेळ होती ती. सूर्य बराच वर आला होता. तरीही किरणांतील कोवळेपणा अजून मावळला नव्हता. त्याच्या बिछान्यासमोरील लतांच्या पर्णावरील दंवबिंदू अजून त्याच्या डोळ्यांच्या तकाकीशीं स्पर्धा करीत होते. बागेतील फुललेल्या फुलांना सूर्याचा दाह होत नव्हता. शीतल वायूच्या सांगाती तीं डुलत होतीं. वायु त्यांचा सौख्य लुटत होता. अविनाशला वाटलें आज सारी पृथ्वी जणुं हंसत आहे. त्याच्या कानावर एकाएकीं कुठूनतरी प्रतिध्वनि आदळले...

‘ अविनाश तुम आझाद हो ! अविनाशी हो ! ’

बस्स अविनाशला तरी काय हवं होतं ? त्याचं अंग अतुल हर्षानं आक्रसलं नि जोरानं तो ओरडला.

‘ अविनाश तुम आझाद हो ? जीते रहो पठे ! ’

अन एकाएकीं त्यानं जोरजोरानें हुकूम सोडले...

‘ देवांगनांनों ! स्वर्गांगनांनों ! हंसा ! माझीं गोड गीतं गा ! अंग मोडून नाचा ! हा अविनाश आतां अविनाशी आहे ! लतांनों, पुष्पांनों ! आज माझा वाढदिवस आहे ! आज माझी दिवाळी आहे. चला ! माझ्या जयगीतांचा सुगंध दोन्ही हातांनीं उधळा. अरे–विचार कसला करतां ? नाचा–गा–हंसा ! केवढा आनंदाचा दिन हा ! माहीत नाहीं तुम्हांला ? हा अविनाश आज विजयी झालाय-कृतकृत्य झालाय- प्रतिज्ञा पूर्त झालाय. ‘फेर धरा-मंगळ गीतं गा–गुलाल उधळा नि कंबर मोडेपर्यंत नाचा-नाचा... ’

‘ साहेब !’

इतक्यांत त्याच्या कानीं चपराशाची विनम्र हांक पडली, खिडकींतून तो दूर सरला, अन ओरडला.

‘ क्यू बे साले ! मजा करो ! मौज लुटो ! खुशीसे गाओ ! नाचो और हंसो ! क्यों ? ’

ही सलामी कांहीं और होती ! चपराशी एकाएकीं चमकला. वेड्यासारखं अविनाशकडं पाहूं लागला. त्यासरशीं अविनाश खो, खो करून जोरानं हंसला. चपराश्याच्या कानठळ्याच बसल्या. अन लागलीच त्याच्या पाठीवर एक जोराची थाप बसली. थाप कसली ती ? आसूडाचा फटकाराच !

' अबे ! ऐसे खडे क्यों ? मालूम नहीं ? आज हम् बहोत खूष है ! क्या चाहिये तुमको ? बोलो ! ' असं कांहींच बडबडून तो एकदम पुढें झाला. टेबलाचा ड्रॉवर खसदिशीं ओढला, नि त्यांतून मिळेल ती नोट त्यानं घेतली नि पुन्हां चपराश्याच्या खांद्याला धरून गदगदां हालवलं त्यानं नि त्याच्या समोर ती नोट धरली.

' क्या देखते हो ? ले लेव तुमको इनाम ! और सुनो ! आज दिवाली है दिवाली ! आज ऐसी सुन्दर चीज पकावो कीं देखते रहना, समजे ! '

अन त्यानं ती नोट त्याच्या खिशांत कोंबली. भानावर येऊन चपराशी म्हणाला.

' साहेब, चाओ थंडी हो रही है ! '

अविनाश टेबलापाशीं गेला. त्यानं कप, बशी, केटली उचलली नि भिरदिशी भिरकावून दिली. खळ्कन त्याचा आवाज झाला नि त्यांत ' साहेब ' ही चपराश्याची किंकाळी लुप्त झाली.

' हमको चाओ नही चाहिये ! हमको चाहिये व्हिस्की, समजे व्हिस्की ! जाव जल्दी ले आव और एक सुंदर नई चीज पकाई जाव... '

चपराशी गेला. त्यानं खिशांतलि नोट काढली, ती पाहिली,

' सौ रुपये ' त्याचे डोळे चमकले !

चपराशी जातांच अविनाशनं स्वतःभोंवतीं एक गिरकी घेतली, शीळ मारली नि एकदम तो म्हणाला -

' शरद्–श्यामा ! '

नि खदखदून हंसला तो पुन्हां !

खसदिशी हँगरला अडकवलेला कोट त्यानं ओढला, अंगावर चढवला. पँट पायांत सरकवली. हॅट डोक्यावर ठेवली नि आरशांत पाहून तो ओरडला,

' क्या ? कैसी है आजकी सूरत ?' स्वतःच स्वतःवर तो खूष झाला, मोठमोठ्यानं हंसला, नि धाड धाड जिना वाजवीत बाहेर पडला,

अजूनही तो धुंदींतच होता, अजूनही कानांत त्याच्या कोणी कुजबुजत होते,'अविनाश तुम आझाद हो ! अविनाशी हो ! ' नि त्यामुळें अजूनही त्याचे ओठ हंसत होते, डोळे तकाकत होते !

तो शरदच्या घरीं निघाला होता,

कमिशन आलं होतं. शरदनं त्यांची बडदास्त ठेविली होती, पण त्यांना फिकीर नव्हती. अविनाशनं त्यांना केव्हांच फितवून ठेवलं होतं. प्रत्येकाच्या खिशांत पांचपांचशें रुपये कोंबून त्यांची दांतखिळी बसविली होती.

अविनाशसारखा निकाल लागायला काय वेळ ?

चौकशीचा फार्स झाला, शरदला फांशी झाली, अन् अविनाशला हर्षवायू झाला.

न्यायानंच अन्याय केला !

शरदला बडतर्फ करण्यांत आलं. लांचलुचपत नि बलात्कार यांबद्दल खटले भरण्यांत आले...

शरदनं हें ऐकलं मात्र...

त्याच्या डोक्यावर जणुं कुणी शिळाच टाकली. त्याच्या डोळ्यांपुढें अंधारी आली. काजवे चमकूं लागले. त्याला वाटलें.

आकाश सारं मेघानं काळवंडून गेलं आहे. कडाड् काड काड–मेघगर्जना होत आहे. सळकन वीजा चमचम करीत आहेत नि भेसूर अंधःकाराला भकास करीत आहेत. सूं...सूं...वारा घोघावत आहे. धडाड्–धाड–धाड मोठमोठे वृक्ष उन्मळून पडत आहेत. भीतीनं सारी पृथ्वी थरथर कांपत आहे.

कडाड्...काड...काड...

धडाड्...धाड...धाड...

अन एकाएकीं मुसळधार पाऊस रप् रप् पडूं लागला आहे. प्रलयकाळ तर नव्हे हा? आभाळ तर मेघाच्छित झालंच आहे. सारी पृथ्वीदेखिल आतां जलाच्छित होणार काय? अन हें काय? पूर–महापूर...प्रलयकाळ...

अब ब ब ब !...

केवढा लोंढा हा ! सारी पृथ्वी–सारीं घरं–सारं–सारं कसं वाहून चाललंय...

शरदला कांहींच सुचेना. बोलवेना. चालवेना...

हा : हा : हा : हा : : ...

केवढा हास्य ध्वनी हा ! कोण हंसत आहे एवढ्या मोठ्यानं ! त्याला ते सहन झालं नाहीं. त्यानं डोळे घट्ट मिटले. कानांवर हात गच्च आवळले...

घरीं आला तो होकांड्या खातच...

'श्यामा !'

अंगांतील सारं बळ एकवटून तो कसाबसा ओरडला—नि धाड्दिशीं तो जमिनीवर कोसळला! उन्मळणाऱ्या वृक्षासारखा...

श्यामानं नि मथुरेनं त्याला कसंबसं वर पलंगावर निजवलं. त्याचं अंग धाड् धाड् उडत होतं. दांतखीळ खड्-खड् वाजत होती कपाळावरील शिरा ताड् ताड तडतडत होत्या. छातीचा भाता झाला होता. डोळे गच्च मिटले होते. कानांवर हाताची पक्कड घट्ट होती. अंगाला दरदरून घाम फुटला होता.

त्याचा तो अवतार पाहातांच श्यामाचं काळीज चर्रर झालं!

मोठ्या धीराची ती!

सारा शोकवेग तिनं आवरला नि शुश्रूसेस प्रारंभ केला.

तब्बल दोन तासांनीं शरद जागा झाला. जागा होतांच तो धडपडून उठला.

'श्यामा!...' जोरानं किंचाळला.

'शरद!' अशी कळवळून श्यामानं हांक मारली. त्यासरसी तिच्या गळ्यांत घट्ट मिठी मारून तो म्हणाला.

'तें पाहिलंस श्यामा! तीं भुतं...हो! हो तीं भूतं पाहिलीस श्यामा! कशी नाचताहेत बघ! कसा फेर धरलाय् बघ त्यांनीं. अन् किती बरं वाटतंय तें पाहून—पाहिलंस श्यामा...श्यामा...'

श्यामानं झटकन् त्याच्या मुखावर हात ठेवला.

'असं नाहीं हं बोलायचं!' ती म्हणाली.

त्या दिवशीं रात्रीं दहाबारा वेळा अशीच पुनरावृत्ती झाली.

शरद झोंपेंतून दचकून उठे ...

'ते ... ते बघ साप ! अ ब ब ब ! तो अजगर तरी केवढा केवढा मोठा आहे ! अन अन . ते मध्यें कोण आहे, आहे माहीत ? शरद - शरद आहे तो—अन अन त्याच्या अंगावर बघ ते साप कसे खेळत आहेत तें - किती छान वाटतंय मला श्यामा ! ...'

'...श्यामा ! श्यामा !! तें स्मशान हं ! त्या स्मशानांतील प्रेतं ! कुणाची आहेत तीं ? हं - हं -- ह ... कुणाची ? माझी नि तुझी — अन ती गिधाडं बरं ! ते कावळे बरं ! बघ कशी टोंचा मारीत आहेत ते ! अहाहा ! किती बरं वाटतंय श्यामा मला ! ...'

'तें युद्ध ! त्या तोफा - धडाड् - धाड — धाड — सूऽसूं सण ण ण — कडाड् - काड - काड — एक मेला—दुसरा मेला ! छान ! छान !! चल श्यामा ! आपणही दोघं जावूं या - किती बरं वाटेल मला ! ...'

तो उठायचा नि कुणीकडे तरी बोट दाखवावयाचा नि असं विचित्र बोलायचा. ते बोल ऐकलें कीं श्यामाच्या काळजाचं पाणी पाणी होई. ती त्याला घट्ट उराशी घेई ! बोलत नसे ! काय बोलणार ती ! कसं शांतवन करणार ती ? मुका नि जबरदस्त मार तो ! ...

कसली भयंकर भयानक रात्र ती ! प्रत्येक क्षण युगायुगाचाच जणुं ! सारीकडं स्मशान शांतता दाटली होती ! निस्तब्ध शांत, निष्क्रिय वातावरण तें ! स्मशानांत एकाएकीं

घुबडाचा घूत्कार कार्नी पडावा तशी जीव घेवूं घड्याळाची कर्णकटु किट् किट– चालूं होती ! मध्येंच एकादी टिटवी ट्यँव ट्यँव करी. एकादे मरतुकडें कुत्रे भूभूत्कार करी आणि त्यांतच शरद जीव घेवून उठे ! कांहींतरी दाखवे ! नि बड-बडत सुटे !!

बिचारी श्यामा ! हतबुद्ध झाली होती !

कशीबशी ती रात्र– ती भयानक रात्र उलटली, उषेचीं प्रणयगीतं मंजुळ स्वरांत ऐकूं येऊं लागलीं, पक्षांचा चिवचिवाट नि फडफडाट होवूं लागला. तांबडं फुटलं ! उषा लाजली ! कमळं फुललीं ! फुलं विकसलीं ! बाग हंसली ! वायूचं नृत्य सुरूं झालं, दिनमणीचं स्वागत झालं, सारीं उठलीं नि...

शरदला झोंप आली, त्याचा डोळा लागला. श्यामानं कोलनवॉटरची थंडगार पट्टी त्याच्या कपाळावर ठेवली ! नि–

आतां मात्र कोंडलेले निश्वास, दाबलेले हुंदके नि अडखळलेले अश्रु मोकाट वाहूं लागले. तिनं दोन्ही हातांनीं आपलं मुख झांकलं, नि ' हायरे दुर्दैवा ! ' असं म्हणून ती रडूं लागली !

मथुरा जवळच बसली होती. चटकन् तिनं तें अवनत मुख आपल्या उरांत लपवलं. सहानुभूतीनं तिच्या मस्तकावरून नि पाठीवरून ती हात फिरवूं लागली.

अन् कसं कुणास ठाऊक पण नेमका तिला त्यावेळीं कंठ फुटला–नि ती गावूं लागली...

× × ×

...अन् नेमका ह्याचवेळीं अविनाश पुढील चौकांत येऊन उभा राहिला...

अजूनही तो स्वतःच्याच धुंदींत होता. अजूनही त्याला ऐकूं येत होते.'अविनाश, तुम आझाद हो– अविनाशी हो– जीते रहो पठ्ठे ! '

तो असुरी आनंद अजूनही त्याच्या मुखावर विलसत होता—नव्हे उकळ्या फुटत होत्या. नयनांतील पाणी विचित्र-पणें तकाकत होतें. ओठ हंसत होते.

' श्यामा !' म्हणून हाक मारणार होता...

हो ! तेवढ्यासाठींच तर तो या ठिकाणीं अशावेळीं आला होता–

दुःखानं काळवंडलेला,

चिंतेनें करपलेला,

काळजीनें व्याकूळ झालेला,

नि या साऱ्या संमिश्रणानं–

भकास झालेला,

शामाचा मुखेन्दु त्याला पाहावयाचा होता.

हीच त्याची शेवटची इच्छा होती.

' माझा प्रेमभंग केलास काय ? कशी खोड मोडली?' असं तिला म्हणून एकदां खदखदून हसण्याचा आसुरी आनंद मिळवावयाचा होता.

अन् आतां तो हांक मारणार...

तोंच...

कुठल्यातरी अज्ञात व्यक्तीनं खाड्कन् त्याच्या

थोबाडींत मारली.

पाठीवर चाबूक ओढतांच जसा बैल चमकतो ना तसं चमकला तो. अन्...अन्...

त्या थोबाडीसरसी खाड्कन् त्याची निशा उतरली. वास्तविक ती थोबाडींत नव्हतीच.

त्याचं देहभान हरपणारे ते संगीताचे श्रुतिमनोहर सूर होते.

होय ! श्रुतिमनोहर मनाला झपाटणारे ते सूरच होते.

त्याची दांतखिळीच बसली नि मुकाट्यानें तो ऐकूं लागला—

होय ! तें संगीत दिव्य होतं ! कुणीतरी गन्धर्व—कन्यकाच जणुं गात होती —

अन—अन गाणारी श्यामाही नव्हती-

मग कोण ही ?

त्याला मोठं कोडं पडलं ? पण चटकन तो विसरूनही गेला.

पुरांत पडल्यावर माणूस नाहीं का वाहून जात ? तसा तो वाहवून गेला -

देहभान विसरला-नि जिवाचे कान केले त्यानें !

आंतड्याला पीळ पाडून कुणीतरी गात होतं नि कुणाच्या तरी आंतड्याला पीळ पडत होता —

तो क्रांतिचा क्षण होता —

गाणं गायलं जात होतं ...

'सुकलें-सुकलें ग — जीवन सुमन सुकलें ...॥धृ०॥

सुगंध प्रीतीचा सोडून गेला
सुगंध तरी कुठें हरपला ?
हाय ! हाय !! हें कोमजलें -
जीवन सुमन सुकलें ॥१॥
कशास जगूं जीवन हें असलें
ज्यांत कांहीं नाहीं उरलें ?
मातिमोल तें जाहलें
जीवन सुमन सुकलें ॥ २ ॥
फुलणार नाहीं कधींच आतां-
माजली चहुंकडे शांतता.
निर्माल्य ! निर्माल्य कीं जाहले.
जीवन सुमन सुकलें... ॥ ३ ॥

मथुरा गात होती. घोळून घोळून आळवीत होती. तिचं देहभान हरपून गेलं होतं,

अन् अविनाश ?...

त्याच्या हृदयांत तर हे शब्द काळीज कापीत कापीतच घुसले !

अन् एकाएकीं त्याच्यांतील सज्जनपणा खडबडून जागा झाला !

सूड घेतला मी !

पण...पण...

मला जें हवं होतं तें मिळालं का ?

उलट...उलट...

मीच दुःखी होतों ते होतोंच, पण आज या प्रेमळ-निष्पाप जीवांनाही नाहीं का दुःखी केलं !

धिक्कार ! धिक्कार असो माझा !!

काय केलं हें मी ?

माझंही जीवन सुकून गेलंय ना ? त्याचं निर्माल्यच झालंय कीं ! अन्...अन्...माझ्या जीवनांतील शांतता, मोकळेपणा दूर करण्यासाठीं मी काय केलं ? तर सूडाला मित्र केलं–जवळ बाळगलं...नि..

प्रेमाला मुकलों कायमचा...हो, कायमचा...

हाय ! हाय !! ......

या नि असल्याच विचारांची गर्दी त्याच्या डोक्यांत उसळली ! त्याला राहावलं नाहीं. –

एकेक पाऊल त्यानं पुढं टाकलं. गाण्याच्या अनुरोधानं त्यानं वाटचाल केली. दारापाशीं तो आला - त्यानं पाहिलं - तो हतबुद्धच झाला !

पत्थराला पाझर फुटावा - क्रूरांनाही कींव यावी असंच तें दृश्य होतं. !

पलंगावर श्याम अस्ताव्यस्त पडला होता. त्याची मान कलली होती. ओठाच्या कडेवर अतिशय बडबडल्यामुळें पांढुरका फेस आला होता. त्याच्या मुखावर उद्वेग, संताप, त्वेष नि दारुण निराशा यांचें बेमालून मिश्रण झालं होतं. अंगाला सारखे आळोखे पिळोखे दिल्यामुळें नि रात्रभर बडबडल्यामुळें त्या मिश्रणांतून शांततेची मलूल छायाही गडदपणें दिसत होती. त्याचं मस्तक श्यामाच्या मांडीवर होतं. श्यामाचा थर-

थरता उजवा हात त्याच्या मस्तकावर फिरत होता. खुद्द श्यामानं आपलं मस्तक मथुरेच्या कुशींत लपवलं होतं. तिचं वस्त्र ठिकठिकाणीं ढळलं होतं. केस अस्ताव्यस्त होते. ती तिरकी कुशींत असल्यामुळें तिच्या उभार उराची शोभा द्विगुणीत झाली होती. मथुरेनं श्यामाचं मस्तक स्वतःच्या उराशीं आवळून धरलेलं होतं. तिचा एक हात श्यामाच्या पाठीवरून ममतेनं फिरत होता. तिचंही वस्त्र अस्ताव्यस्तच होतं. तिनं आपली दृष्टी शून्यपणें आढ्यावर लावली होती. तिच्या मुखावरही काळजी, चिंता नि चीड यांच्या संमिश्रणानं एक विलक्षण भाव प्रकट झाला होता. तिच्या मीत नयनांत कारुण्याचा सागर जणूं उफाळून उठला होता. त्यामुळें तिचे डोळे नि पापण्या किंचित् ओलावल्या होत्या. तिचे ओठ हालत होते. विजेच्या त्या दोन तारा हृदयस्थ परमेश्वर आपल्या सुकुमार हातानें छेडत होता - तारेंतून सूर निघत होते.

'सुकलें ... सुकलें ग—जीवन सुमन सुकलें ......

'अरेरे !'

हा एकच उद्‌गार त्या दृश्याकडे पाहून कुणीही काढला असता. अन् जें कुणाही सहृदय माणसाला वाटलं असतं तेच नेमकं अविनाशलाही वाटलं.

त्याची माणुसकी जागी झाली. त्याच्या हृदयाच्या खालील कण्यांत बंदिस्त करून टाकलेला दया, क्षमा, शांती, करुणा वगैरे भाव पेटाऱ्यांत कोंडून ठेवलेल्या उपाशी नागिणीसारखे चवताळून उठले होते नि त्या नागिणीनं त्याच्या हृदयांत वावरणाऱ्या सूडाच्या भावनेचे उंदीर आधाशीपणें जणुं गिळंकृत केले होते.

त्याचं तें पाषाण हृदय कळवळलं—गहिंवरलं,

कधींही त्याच्या नयनांतून न गळणारे अश्रू चट्कन् त्याच्या गालांवर ओघळले !

उजव्या हाताच्या बाहीनें त्यानं तें पुसून घेतले.

' ह्या साऱ्या वाताहातीला कारण कोण ?...'

तूंच अविनाश तूंच...

त्याला कुणीतरी भेडसावून सांगत सुटलं.

पश्चातापाचे गरम गरम वारे त्याच्या हृदयांतून वाहूं लागले ...

तो होरपळून निघाला.

त्याची दृष्टी मात्र त्या नयनमनोहर, कारुण्यपूर्ण भावनांनीं त्या सुवर्णलतीकेवर खिळून गेली होती.

त्या लतेवर...

कसल्यातरी दिव्य—सात्विक नि गूढ तेजाचीं वलयें विकासलीं होतीं—अन् त्या वलयांनींच त्याच्या हृदयांत क्रांती केली होती !

गीत चालूं होतं—

गीत संपत आलं होतं...

गीत संपलंही...

मथुरेनं दृष्टी वळवली नि नेमकी खिळली ती अविनाशवर ...

ती घाबरली नाहीं. लाजली नाहीं. अस्ताव्यस्त झालेलं वस्त्रही तिनं सावरलं नाहीं. प्रशांत, स्थिर नि

कसल्यातरी हृदयाच्या गूढ संवेदनेनं विकल विवश झालेल्या नजरेनं ती अविनाशच्या नयनांचं अवग्राहण करूं लागली...

नयनांचें तें अपूर्व मीलन ..

नयनांचें तें मुग्ध भाषण...

आणि नयनांचे ते गुप्त संदेश...

एक क्षण–दोन क्षण–तीन क्षण...

चालूं होते !

दोघंही दोघांच्या दर्शनानं विद्ध झाली. कसल्यातरी अननुभूत–मुग्ध भावनेनं दोघांचेही नयन थरारले, एकदमच ते पाणावले,

नि त्यांच्या गालावर एकदमच ते अश्रु ओघळले...

अविनाशनं स्वतःच्या उजव्या हाताच्या बाहीनं स्वतःचे अश्रू पुसले.

मथुरेनंही तेंच केलें –

अन् ... अन् ...

श्यामालाही त्याचवेळीं संवेदना झाली. तिनं चुळबुळ केली. त्यासरसी मथुरेनं अविनाशवर रोखलेली दृष्टी काढून घेतली नि हांक मारली –

‘ श्यामा ! ’

श्यामानं वर पाहिलं नि तशाही स्थितींत तिला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलं नाहीं.

कारण ... कारण ...

अविनाश ! होय अविनाशच तो ! तिच्या दारासमोर उभा होता. श्यामानं क्षणभर त्याला आपाद मस्तक न्याहाळलं.

हळुवारपणें श्यामचं मस्तक उशीवर ठवलं नि उठली. अविनाशकडे गेली. तिनं हांक मारली

‘ अवी ’

त्या तिच्या स्नेहमयी मायावयी उद्‌गारांतून काय ओसंडत नव्हतं ?

तिथं पूर्वींचं तें निष्पाप प्रेम होतं. पूर्वींची ती निष्पाप मनोमीलनाची साक्ष होती. तो गाढ स्नेह दिग्दर्शित होत होता. नि मध्यंतरी उठवलेल्या वादळाची पूर्ण विस्मृतीही त्यांत होती.

‘ अवी ! ’

दोनच शब्द ते !

पण ... पण ...

त्या दोनच शब्दांनीं त्याच्या साऱ्या भावना भरभरून उठल्या. घळघळून त्याच्या नयनांतील अश्रू वाहूं लागले !

तो मूक होता, श्यामा मूक होती ! बोलण्याची जरुरीच नव्हती मुळीं.

अविनाश पुढें झाला, अविनाशनं तिचा हात आपल्या हातीं घेतला, नि तिला दुसरीकडं नेलं. ती श्यामाची शयन खोली होती.

तिथं पोहोंचल्यावर ...

चटकन् अविनाशनं श्यामाचे पाय धरले नि गदगदलेल्या स्वरांत तो म्हणाला,

‘ चुकलों मी श्यामा ! क्षमा कर मला ! ’

श्यामानं चटदिशीं त्याला वर उचललं, एकवार

त्याच्या पश्चातापानं धगधगणाऱ्या नयनांकडं पाहिलं प्रेमभरान तिनं. त्याच्या केसांवरून हात फिरवला नि...

‘ वेडा कुठला ! ’

असं म्हणून त्याला गाढ अलिंगन दिलं...

त्या स्पर्शांत अशी कांहीं विचित्र जादू होती, कीं त्यामुळें त्याच्या हृदयांतील उरल्या सुरल्या साऱ्या सूडाच्या भावनेचं राक्षसी मनोवृत्तीचं दमन झालं. साऱ्या शंकांचं निरसन झालं.

त्याला राहावेना. तो पुटपुटला,

‘ श्याम ! तुला तें शवटचं पत्र आठवतं ना ? त्यांत तूं लिहिलं होतंस– कीं– ‘ एक दिवस तुझ्या आयुष्यांत असा येईल कीं त्या दिवशीं स्नेह कशाला म्हणतात नि प्रेम कशाला म्हणतात हें नक्की उमजेल’ आजचा तोच क्षण आहे श्यामा ! ’

‘ मी चुकलों श्यामा, क्षमा करशील ना मला ? ’

‘ असं बोलायचं नाहीं अवी ! तूं न् मी काय दोन आहोंत ! वेडा कुठला ! कसली क्षमा घेवून बसला आहेस तूं!’

‘ तसं नव्हे ग...किती त्रास दिला मी तुला ?’

‘ ऊं ! त्यांत काय मोठसं? अग्निदिव्याशिवाय कुठलीच गोष्ट कसास लागत नाहीं अवी !’

‘ किती उदार आहे ग तुझं हृदय श्याम ! अन्... अन्... मी...’

चटकन् तिनं त्याच्या मुखावर हात ठेवला. त्याचें आंसूं आपल्या पदरानं पुसले.

‘ असं का कुठं मनाला लावून घ्यायचं असतं अवी! आतां कसलाही विचार करायचा नाहीं हं! बैस इथं. मी जावून येते आंत...’

‘ छेः! श्याम. बसणं आतां अशक्य! मी उभं केलेलं हें भूत मीच गाडलं पाहिजे!’

‘ कसलं भूत?’

‘ ज्यांनीं तुमची अशी दशा केली तें!’

‘ अस्सं होय! पण घाई का एवढी?’

‘ यावेळीं घाईच करायला हवी श्याम! तुला ठाऊक नाहीं श्याम? पण काय ग? मी विचारतो तें सांगशील मला?’

‘ अरे घाई झालीय ना तुला?’

‘ हो! पण...’

‘ ती मुलगी कोण?’

‘ कां?...’

‘ कां?...कां?...कसं सांगता येणार त्याला? अन् काय सांगणार तो?’

त्यानं एक मधुर स्मित केलं नि खालच्या मानेनं श्यामकडं पाहिलं.

‘ अस्सं होय!’ श्यामानं लाडीकपणें त्याच्या गाला-वर चापट मारीत म्हटलं —

‘ समजलं हं - समजलं - त्याची नको काळजी तुला. सारं कांहीं व्यवस्थित करीन मी!’

‘ खरंच!’

‘ हो!’

त्यासरशी एक टुणदिशी उडी मारून तो धांवला. त्याच्या त्या निरालस आनंदानं -

आनंदानं मारलेल्या त्याच्या उडीकडं नि उडी मारून दर्शविलेल्या त्याच्या त्या अनुपमेय हर्षानं —

' वेडा कुठला ! '

असा उद्‌गार श्यामाच्या मुखांतून बाहेर पडला.

... झालं द्वेष संपला, मत्सर संपला, सूड पळाला, हर्ष ओथंबला ...

क्षणांत पारडं फिरलं -

अन्यायाचा न्याय झाला ! अन्यायानं न्याय दिला !

ढगाळलेलं आकाश दिव्यत्वानं निळं निळं झालं !

नि एके दिवशीं मथुरेची खालील तार बाळला गेली.

' आतां लग्नाच्या नौबती - हर्षाच्या उकळ्या - नि प्रेमाच्या गुजगोष्टी यांना काय कमी ! '

मथुरा नि अविनाश -

श्यामा नि शरद -

कान्ता नि बाळ -

देव त्यांचं भलं करो ! त्यांना सुखी ठेवो !

**समाप्त**

# सुरस ग्रंथमाला

**पंढरपूर B. L. Rly.**

## आमचे प्रकाशन

टीप :----खालील पुस्तकें आमचे ग्राहकांस ½ किंमतीस मिळतील. टपालखर्च वेगळा


| | |
|---|---|
| जर्मन मोहीम | २।।= रु. |
| गहनगूढ | २।।= रु. |
| प्रेमपरीक्षण | २।।= रु. |
| सत्यमेव जयते व शैशव सहचरी | २ रु. |
| भयंकर स्वप्न [ ले. इनामदार B.A. L.L. B. ] | २ रु. |
| पितृप्रेम [ नाटक ] ले. परांजपे | ।।= |
| नयनतारा [ ले. नभोविहारी ] | २।· रु. |
| दैवदुर्विपाक व भयंकर [illegible]ल [ ले. सव्यसाची ] | ३।· रु. |
| मृगेंद्रलीला [ ले. प्रभंज[illegible] ] | ३।।। · रु. |
| ईश्वरीलीला व आशा[illegible] [ ले. नरवणे ] | ३।।।· रु. |

| | | |
|---|---|---|
| प्रेमाश्रम भाग १।२ [ ले. प्रभाकर ] | ७ | रु. |
| वीरात्मा भाग १।२ [ ले. गणेशशास्त्री फाटक ] | ७ | रु. |
| वणव्यांतलें फूल [ ले. समाजसुधारक ] | ३॥· | रु. |
| पावागडचा प्रलय [ ले. सौभद्र ] | ३॥· | रु. |
| विजय नगरची साम्राज्य-स्थापना [ ले. दातार ] | ३॥· | रु. |
| कुमार अशोक [ ले. लिमये ] | ३।· | रु. |
| जगाचा बाजार भाग १।२।३ एकत्र | ९॥· | रु. |
| ढोंगी गुरुच्या सैतानी लीला [ले. गणेशशास्त्री फाटक] | ३॥· | रु. |
| हा संशयाचा प्रताप [ ले. ग. वि. कुलकर्णी ] | ३॥· | रु. |
| पाटणची प्रभात [कै. मो. गु. व्होरा B. A. LL B.] | ३ | रु. |
| भाईबंद व नराचा नारायण [ ले. दातार ] | ३।· | रु. |
| कृष्णसर्प बंधनाचे अलीकडे [ ले. नरवणे ] | ३॥· | रु. |
| प्रेमबंधन [ ले. दातार ] | ३॥· | रु. |
| प्रतापादित्य ( ले. वा. शि. हडकर ) | ३॥· | रु. |
| देवी कल्याणी [ ले अज्ञात ] | ३॥· | रु. |
| भीषण सूड [ ले. अज्ञात ] | ३।· | रु. |
| अमृत कीं विष [ ले. हडकर ] | ३।· | रु. |
| रत्नगडची रंभा [ ले. सहृदय ] | ३।- | रु. |
| वैरपूर्ती [ ले. सरस्वतीभक्त ] | ४॥· | रु. |
| रक्ताचे गालबोट [ ले. परांजपे ] | ३।· | रु. |
| गुजराथचा नाथ [ ले. कन्हयालाल मुनशी ] | ३ | रु. |
| देशभक्त [ ले. अनंतवार ] | १ | रु. |
| लंडन येथील बड्या लोकांचीं गुप्तकृत्यें ( गोष्ट ३ री ) | ५ | रु. |

खालील पुस्तकें आमचे ग्राहकांस $\frac{3}{4}$ किंमतीस मिळतील.

टपाल खर्च वेगळा.

| | | |
|---|---|---|
| गृहदेवी ( ले. प. स. देसाई ) | २ | रु. |
| भावकला ( ले. ल. रा. पटवर्धन ) | २ | रु. |
| धरणीकंप ( ले. वा. वि. हडप ) | २ | रु. |
| देवता व कॉटनफिगर ( ले. अनंतवार ) | २।- | रु. |
| विद्या-विनोद ( ले. प्रो. गोरे ) | २ | रु. |
| दुर्दैवी हिरा, भाग १ ला ( ले. चोळकर ) | २ | रु. |
| दुर्दैवी हिरा भाग २ रा ( ले. चोळकर ) | २ | रु |
| गोषांतील सुंदर स्त्रिया ( ले. वा. स. कोठारी. B. A.) | ५ | रु. |
| सम्राट अशोक ( मोठी साईज, कापडी बांधणी ) | ६ | रु. |

फक्त एक रुपया प्रवेश फी भरून कायमचे ग्राहक होतां येते.

खालील आमचीं प्रकाशनें तूर्त शिल्लक नसून लवकरच छापत आहोंत.

लताकुंज—गूढ

निशाचराचा प्रेमविलास

पतिपत्नी प्रेम

इंदिरा व निरजा ( ले. कोठारी B. A. व पांगळ )

दैवाची विचित्र लीला ( ले. सहृदय )

चंद्रकांता ( ले. नभोविहारी )

उषा व प्रकार ( ले. शहा वकील व बापट )

लंडन येथील बड्या लोकांचीं गुप्त कृत्यें ( गोष्ट दुसरी )

छत्रसाल (ले. वा. ना. शहा, वकील)
चंद्रचूड व कुमुदिनीचा सुधांशु (ले. कुलकर्णी व रणदिवे)
खरी आर्यकन्या व भविष्य (ले. रणदिवे व बापट)
शशांक (ले. वि. सि. गुर्जर)
चंद्रिका (ले. कुशाग्र)
गौरमोहन (ले. कुशाग्र)
प्रणयी युवराज (नाटक) स्वर्गीय सौंदर्य (शहा व इनामदार)
ऐक्यांतच मौज (ले. रणदिवे)
कर्मसन्यास (ले. ग. वि. कुलकर्णी)
सोनेरी खंजीर (ले. कुलकर्णी)
हद्दपार (ले. गणेशशास्त्री फाटक)
मोहिनी
जन्मठेप (ले. ग. वि. कुलकर्णी)
श्वेतांबर (ले. महाराष्ट्र-भाषा-चित्रमयूर आठल्ये)
व्यापारी सृष्टी (ले. रणदिवे)
जटाशंकर (ले. रणदिवे)
मनोरमा (ले. रणदिवे)
गोरे देवदूत (ले. मार्मिक)
नगर तारका (ले. रणदिवे)
कुलांगना की वारांगना व कथागुच्छ
अजब कारस्थान (ले. अज्ञात)
खरी लोकसेवा (ले. इनामदार B. A., LL. B)
विजया (ले. मार्मिक)

रशियन राज्यक्रांती ( ले. अज्ञात )
अमर-सिंहाचा अत्मयज्ञ ( ले. कुलकर्णी
मयूर-सिंहासन ( कुलकर्णी )
कृष्ण कारस्थान व संगीतप्रबोध ( खानोलकर, कुलकर्णी )
भीषण भवितव्यता भाग १:२ एकत्र ( ले. बापट सं. प्रजापक्ष )
विखुरलेलें प्रेम ( ले. द. र. कवठेकर )
उमाडलेल्या भावना ,, ,,
उजेडांतील अंधार ,, ,,

---

## मालेचीं पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

सुरस ग्रंथमाला, पंढरपूर
नवजीवन व्होरा अँड सन्स, केमिस्ट, सोलापूर
परचुरे, पुराणिक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई ४
तुकाराम पुंडलीक शेटे, माधवबाग, मुंबई ४
बलवंत पुस्तक भांडार, गिरगांव, मुंबई ४
रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४
महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि. मुंबई ४
केमकर आणि मंडळी, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४
बापट आणि कंपनी, ठाकुरद्वार, मुंबई नं. २
बॉम्बे बुक डेपो, २१७ चर्नी रोड, मुंबई नं. ४
बालकृष्ण लक्ष्मण पाठक मिरझास्ट्रीट, पारशी गल्ली
मुंबई नं. ३

नवीन किताबखाना, पुणें नं. २
नेर्लेकर बुकसेलर, बुधवार चौक, पुणें नं. २
लेखन वाचन भांडार, गणपती चौक, पुणें नं. २
वीणा प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर
ठाकूर आणि कंपनी लि., सिताबर्डी महाल, नागपूर
अकोला; अमरावती
स्वस्तिक ग्रंथ भांडार, ४९५ शनवार पेठ, पुणें २
मॉडर्न बुक डेपो, पुणें २. आनंदाश्रमासमोर.
कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, अप्पाबळवंत चौक, पुणें नं. २
केशव कोठावळे प्रकाशन, गिरगांव, मुंबई ४
दादर बुक डेपो, रानडे रोड दादर, मुंबई ४
जोशी ब्रदर्स, गोलीगुडा, हैद्राबाद [ दक्षिण ]

---

दरमहा ३०० ते ९००
रुपये मिळवा

## ' आइस कॅण्डी प्लँट '

बसून घरचे घरीं
आरामानें पैसे मिळवा.
अधिक चौकशीसाठीं
भेटा अगर लिहा. माहिती आनंदानें पुरवूं

## अ भि न व
## औद्योगिक मंडळ

हॅच रोड, सोलापूर